बुधवार, ८ फेब्रुवारी २०२३
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१६६
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 8 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-166 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5




# विवाहित मुलींनाही आता अनुकंपा तत्त्वावर नोकरी

## मध्य प्रदेश सरकारचा ऐतिहासिक निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**भोपाळ : मध्य प्रदेशात विवाहित मुलींनाही आता अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती मिळणार आहे. यापूर्वी सरकारी अधिकारी किंवा कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर केवळ मुलास अनुकंपा नियुक्ती दिली जात होती. नव्या निर्णयानंतर मुलींनाही हा अधिकार देण्यात आला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर वैद्यकीय शिक्षण मंत्री विश्वास सारंग यांनी ही माहिती दिली.**

वैद्यकीय शिक्षण मंत्री विश्वास सारंग म्हणाले की, नवीन निर्णयानुसार शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या आश्रित मुला-मुलींना त्यांच्या मृत्यूनंतर अनुकंपा नियुक्ती देण्याच्या नियमात बदल करण्यात आला आहे. पूर्वीच्या नियमांनुसार केवळ मुलालाच अनुकंपा नियुक्ती दिली जात होती, परंतु मुलीचे लग्न झाले असल्यास अनुकंपा नियुक्तीची तरतूद नव्हती, असे मंत्री विश्वास सारंग म्हणाले.

मंत्रिमंडळाच्या नव्या निर्णयात अनुकंपा नियुक्तीसंदर्भातील तरतुदींमध्ये बदल करण्यात आला आहे. आता सेवेत असताना एखाद्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास मुलांबरोबरच विवाहित मुलगीही अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र असणार आहे. अनेकवेळा असे दिसून आले आहे की, कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर कुटुंबाला नोकरीची गरज असे मात्र कुटुंबातील मुले खूप लहान असली की अडचण येते. अशा परिस्थितीत विवाहित मुलींना नियुक्ती मिळत नव्हती. विवाहित मुलींच्या बाबत घेतला गेलेला हा निर्णय म्हणजे मध्य प्रदेश सरकारच्या महिला सक्षमीकरण उपक्रमालाच अधोरेखित करत आहे, अशी प्रतिक्रिया मंत्री विश्वास सारंग यांनी दिली आहे.

# लोक विचारायचे अदानी यशस्वी कसे होतात?

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** तामिळनाडू, केरळ, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटकमध्ये अदानी हे नाव सर्वत्र ऐकायला मिळाले. लोक भेटायचे त्यावेळी विचारायचे अदानी कोणत्याही व्यवसायात जातात तिथे यशस्वी होतात. स्टार्टअप चालवणाऱ्या युवकांनी सांगितले आम्हाला देखील त्यांच्यासारखे यशस्वी व्हायचे, असे सांगायचे. २०१४ मध्ये गौतम अदानी जगभरातील श्रीमंतांच्या यादीत ६०९ व्या स्थानावर होते. ते दुसऱ्या स्थानावर कसे पोहोचले. नऊ वर्षांमध्ये कसली जादू झाली की ते दुसऱ्या क्रमांकावर पोहोचले, असा सवाल करत राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या ६ व्या दिवशी लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या अभिनंदन प्रस्तावावर भाषण केले. राहुल गांधी यांनी यावेळी भारत जोडो यात्रेतील अनुभवांची मांडणी करताना महागाई, बेरोजगारी, अग्निवीर योजना, शेतकऱ्यांचे मुद्दे, पीक विमा योजना आणि अदानी उद्योग समूह आणि हिंडेनबर्ग रिपोर्टवरुन हल्लाबोल केला. भारत जोडो यात्रेत सैन्य दलातील निवृत्त अधिकाऱ्यांनी, माजी सैनिकांनी अग्निवीर योजना सैन्यदलानं आणली नसून ती थोपवण्यात आली असून ती अजित डोभाल यांनी थोपवली असून ती संकल्पना आरएसएसची होती, असे सांगितल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला. राहुल गांधी यांनी यावेळी गौतम अदानी यांच्या मुद्यावरुन देखील हल्लाबोल केला.

# पत्रकारांवरील दाखल गुन्हे तत्काळ रद्द करा; अन्यथा रस्त्यावर उतरू : वसंत मुंडे

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** शहादा पोलिस स्टेशन, जि. नंदूरबार येथे आमदार राजेश उदेसिंग पाडवी यांच्या तक्रारीवरून दैनिक पुण्यनगरी व दैनिक दिव्य मराठी वृत्तपत्राचे संपादक, जिल्हा प्रतिनिधी आणि शहादा येथील वार्ताहर यांच्याविरुध्द बदनामीकारक वृत्त प्रसिद्ध केल्याप्रकरणी पोलिस ठाण्यात दि. 6 फेब्रुवारी रोजी कलम 499, 534 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हा बेकायदेशीर गुन्हा तत्काळ रद्द करावा अन्यथा अन्यथा राज्यभरातील पत्रकार लोकप्रतिनिधी आणि पोलिस प्रशासनाच्या दडपशाहीविरोधात रस्त्यावर उतरतील याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील, असा इशारा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवदेनात पुढे म्हटले आहे की, शासनाकडून आमदारांना मतदारसंघातील विकास कामांसाठी दिल्या जाणाऱ्या आमदार निधीमधून शहादा येथील रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी आक्षेप घेत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग शहादा यांना लेखी निवेदन देऊन या कामाबाबत चौकशी करण्याची आणि निकृष्ट काम करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची मागणी केली. कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आलेल्या निवेदनाच्या प्रती निवेदनकर्त्या नागरिकांनी छायाचित्रासह प्रसिद्धीसाठी दैनिकांना पाठवल्या. त्यानुसार शहरातील प्रभाग 13 मधील नागरिकांकडून रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबतचा आरोप आणि कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिल्याबाबतची बातमी दैनिक पुण्यनगरी व दैनिक दिव्य मराठी सह अनेक वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली. सदरील बातम्यांमध्ये तक्रारकर्ते मा. आमदार महोदय यांच्याबाबत कोणताही आक्षेप अथवा बदनामीकारक टिपण्णी करण्यात आलेली नाही. केवळ आमदार महोदयांच्या स्थानिक विकास निधीतून हे काम झाल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. असे असताना आमदार राजेश पाडावी यांनी मात्र सदरील वृत्तातून त्यांची बदनामी झाली असा अर्थ काढून पोलिस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांची तक्रार असल्याच्या कारणावरुन कोणतीही शहानिशा न करता केवळ बातमी प्रसिध्द केल्याच्या कारणावरुन दोन प्रमुख दैनिकांच्या संपादक, जिल्हा प्रतिनिधी व वार्ताहरांवर गुन्हा दाखल करणे हे कोणत्याही नियमात आणि लोकशाहीतील स्वातंत्र्याच्या संकेतांना धरुन नाही. आमदारांच्या अशा तक्रारींमुळे वृत्तपत्रात काम करणाऱ्या पत्रकारांना मानसिक त्रास होऊन त्यांचे मनोबल खच्चीकरणाचा प्रकार आहे. त्यामुळे पत्रकारांच्या स्वातंत्र्याला अबाधित ठेवण्यासाठी सरकारने तात्काळ गुन्हे रद्द करावेत आणि केवळ बातमी प्रसिद्ध केल्याच्या कारणावरुन गुन्हे दाखल करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. अन्यथा राज्यभरातील पत्रकार लोकप्रतिनिधी आणि पोलिस प्रशासनाच्या दडपशाहीविरोधात रस्त्यावर उतरतील याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची राहील, असेही शेवटी निवेदनात म्हटले आहे.

# झाडांवर तिचं नाव कोरण्यापेक्षा 'ति'च्या नावाने झाडाचे संवर्धन करा

## 'व्हॅलेंटाइन डे' निमित्ताने 'वसुंधरा' प्रतिष्ठानचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

लातूर : आपल्या प्रियसीचे नावं झाडांवर कोरण्याची जणू काही सध्या स्पर्धाच लागलेली दिसते आहे. झाडांवर स्वतःच आणि प्रियसीच नावं कोरण्यासाठी चावी अथवा अन्य साधनांचा वापर केला जातो. यामुळे झाडांना मोठ्या प्रमाणावर इजा होते. कारण झाडंही तुमच्या आमच्यासारखी सजीवच आहेत. तिचे नाव झाडांवर कोरण्यापेक्षा तिच्या नावाने झाडं लावून त्या झाडाचे संवर्धन करावे, असे आवाहन वसुंधरा प्रतिष्ठानने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. आपल्या प्रियसीचे नाव झाडांवर कोरून स्वतःसह तिच्या नावाचे पहिले अक्षर लिहले जाते आहे. हा प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढत चालला आहे. झाडांवर प्रियसीचे नावं कोरण्यासाठी गाडीच्या चावीचा अथवा कटरचा वापर केला जातो. यामुळे झाडांना मोठ्या प्रमाणावर इजा होते आहे. यामुळे झाडांची वाढ खुंटते. झाडेही सजीव असतात त्यांनाही त्रास होतो यामुळे झाडांवर प्रियसीचे नाव टाकण्यापेक्षा तिच्या नावाने झाड लावून त्या झाडाचे संवर्धन करावे, असे आवाहन वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा, जिल्हाध्यक्ष उमाकांत मुंडलिक, कार्याध्यक्ष अमोल आप्पा स्वामी, कार्यकारिणी सदस्य शिवाजी निरमनाळे आदींनी केले आहे.





**झाडांसोबत साजरा होणार व्हॅलेंटाईन डे**

हृदयाशिवाय माणूस जगूच शकत नाही. माणसाला जगण्यासाठी ऑक्सिजन झाडे मोफत पुरवतात. मात्र, झाडांची खुलेआम कत्तल केली जाते, ही दुर्दैवी बाब आहे. झाड आणि मानव यांच्यातील नाते आणखी दृढ व्हावे यासाठी वसुंधरा प्रतिष्ठानकडून प्रत्येक सण-उत्सव झाडांसोबत साजरा केला जातो. येत्या 14 फेब्रुवारी रोजी व्हॅलेंटाइन डे झाडांसोबत साजरा केला जाणार असून, माणसाला वाचायचे असेल तर निसर्गाला जपायला हवे असे आवाहन या उपक्रमाच्या माध्यमातून केले जाणार आहे.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

२०३० पर्यंत या संख्येत दुप्पट वाढ होण्याची शक्यता आहे. म्हणजे आज जे विद्यार्थी दहावीत शिकत आहेत, उद्या त्यांनाही या समस्येला सामोरे जावे लागणार आहे. त्या विद्यार्थ्यांना ही जाणीव झाली की आपलाही समावेश त्या लोकांमध्ये असणार आहे. मग त्या मुलांना त्यांनीआपल्या घरातील, आपल्या आजूबाजूला असलेल्या मधुमेही लोकांच्या मुलाखती घ्यायला सांगितल्या. एकदोन दिवस त्या मुलांनी मग बिनसाखरेचा चहा, दूध आणि जेवण घेऊन पाहिले . मग त्यांना स्वतःच लक्षात आले की मधुमेही रुग्णांची अवस्था कशी असते, त्यांना खाण्याच्या बाबतीत कशा तडजोडी कराव्या लागतात, कसा संयम ठेवावा लागतो. या मुलांनी मग या संदर्भात तज्ज्ञ डॉक्टरांची मुलाखतही घेतली. ती मुलं यातून त्यांना असलेल्या जीवशास्त्रातील बरेचसे धडे आपोआप शिकले. शिवाय आपल्या घरातील कोणाला मधुमेह असेल तर त्यांना नियमित व्यायाम करा, व्यायाम टाळू नका असा प्रेमाचा सल्ला देऊ लागले. हे असते खरे शिक्षण. शिवाय जे काही आपण शिकतो, त्याचा वापर करणं किंवा करता येणं हे जेव्हा शक्य होतं, तेव्हा ते शिक्षण खऱ्या अर्थाने अंगात मुरले असे म्हणता येईल. ज्या शिक्षणाचा व्यवहारात वापर मुले करत नाहीत, ते शिक्षण म्हणजे नुसती पोपटपंची म्हणावी लागेल. व पु काळेंच्या पुस्तकात एक गोष्ट वाचली होती. एका शाळेत असेच आदर्श आणि ध्येयवादी शिक्षक असतात. ते मुलांना नागरिकशास्त्र शिकवतात. त्यात उत्तम नागरिक म्हणून वागताना आपण कसे वागावे, केवळ आपल्या घरचीच नव्हे तर आपल्या आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता ठेवणे हे एक नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे हे त्यांनी शिकवले. नंतर त्या मुलांची परीक्षा घेताना त्यांचे त्यांनी निरीक्षण केले. एका दिवशी दोन पेपर होते. एक पेपर संपल्यानंतर मध्ये थोडा वेळ होता. काही वेळाने दुसरा पेपर होता. या मधल्या वेळात काही मुले शाळेच्या बाहेर जाऊन आली . त्या वेळेस त्यांनी काही खाद्यपदार्थ विकत घेतले. **क्रमशः**



## आनंदी पहाट

### आहार आणि विहाराने बाह्य प्रहार थाबतात

आधुनिक केसरी

रोजच्या आहारात किमान ४ ते ५ थेंब गायीचे तूप वापरलं पाहिजे. रोज किमान एक ग्लास दूध प्यायलं पाहिजे, त्यातून प्रथिने मिळण्यास मदत होते. दिवसातून चार वेळा आहार घेणे महत्त्वाचं असून यामध्ये दोन वेळा नाश्ता आणि दोन वेळा जेवण यांचा समावेश असावा.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

नाष्ट्यामध्ये दूध, फळ, मोड आलेली कडधान्ये, गुळ-शेंगदाण्याचे लाडू आदींचा समावेश असावा. त्याचप्रमाणे जेवणामध्ये समतोल आहार म्हणजेच वरणभात, भाजीपोळी, आमटी, ताक यांचा समावेश असावा. जेवणापूर्वी सलाड आणि जेवताना कोशिंबीरीचादेखील वापर असावा. अलीकडच्या काळांत काळजीपूर्वक आहार घेण्याचं प्रमाण खूपच कमी झालेलं दिसत आहे. शारीरिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी का बरं दैनंदिन आहाराकडे आपण दुर्लक्ष करत असतो. त्याची जरुरी नसते, कि त्याचं गांभीर्य नसतं.

जसा आहार महत्वाचा तसाच विहार देखील महत्वाचा असतो. दिवसातून किती वेळ आपण विहाराला देतो ? मोकळ्या हवेतील विहाराचं महत्व आपल्याला माहितीन नाही का ? परंतू त्याच्याकडे सोयीस्करपणे आपण दुर्लक्ष करत आहोत ह्याची साधी जाणीवही होत नसते. विहार आपल्याला वाहनांतून करण्यांत अधिक स्वारस्य

असतं. जे विहाराच्या बाबतीत तेच निद्रेच्या बाबतीतही अनेकांकडून होत असतं. आवश्यक तितकी शारीरिक आणि मानसिक विश्रांती ही केवळ निद्रेच्याच माध्यमातून योग्यरीत्या मिळत असते. अपुऱ्या झोपेचा परिणाम सर्वप्रथम

आपल्या मनावर आणि कालानाताराने शरीरावर व्हायला सुरुवात होते. शांत झोप न लागणं, ती न घेतली जाणं ही निश्चितच साधी व्याधी असू शकत नाही. आहार आणि विहार ह्या दोन्हींची पथ्ये पाळली कि शारीरिक व्याधी निर्माण करणारे बाह्य प्रहार होणे बंद होते.



आधुनिक केसरी

**तुजवीण कोण | माय बाप ||**

**सांगू नये कधी | दुःख अंतरीचे ||**
**भोग संचिताचे || खेळ सारा ||१||**
**जाणतो सगुण | देव पाषाणाचा ||**
**भाव जो आत्म्याचा | एक व्हावा ||२||**
**भेटला जयासी | सखा तो श्रीकृष्ण ||**
**होतोच अर्जुन | समाधानी || ३||**
**मिळेना जोवरी | संगती सज्जन ||**
**दुर्दैवी तो जाण | नरजन्म ||४||**
**मौनातच कळे | मर्म जीवनाचे ||**
**ऊन-सावलीचे | मृगजळ ||५||**
**वाहतो चरणी | माझे हे मी पण ||**
**तुजवीन कोण | मायबाप ||६||**



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**विद्यार्थी ही स्वतः सिद्ध अशी महान शक्ती आहे. शिक्षकाने नेहमी त्या शक्तीचा आदर करावा. विद्यार्थ्यांना आपली मते मांडण्याची संधी अधिकाधिक वेळेस द्यावी. विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या व्यक्तिमत्वाचा आदर करावा पण याचा अर्थ शिक्षकाच्या प्रत्येक मतास मान्य करणे असा होत नाही. तसेच स्वतंत्र मताच्या अट्टाहासापायी प्रत्येक मतास विरोधही करू नये.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आधुनिक केसरी



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**मने सुरति ले उड़त है, बाहर दृश्य पसार ।**
**जिब भूले निज रुप को, भटकि रहे संसार ।।३३।। (स्वर्वेद पंचम मण्डल द्वितीय अध्याय) ०५/०२/३३**
**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
मन आत्म्याच्या चेतन शक्तीला (सुरतिला) घेऊन उडते आणि तीला बाह्य जगतातील दृश्ये दाखवते. जीव मनाबरोबर राहून आपल्या शुद्ध स्वरूपाला विसरला आहे आणि या जगरहाटीत भरकटत दुःख, कष्ट मिळवत आहे.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## बध्दमुक्तनिरूपण

आधुनिक केसरी

त्याचप्रमाणे एक माणूस स्वस्वरूपाचा अनुभव आल्याने संपूर्ण समाधानी झाला आहे मुक्त झाला आहे. त्याला कोणी बध्द, अज्ञानी म्हणले तरी त्याचे समाधान भंग पावणार नाही. स्वस्वरूपाच्या




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

साक्षात्कारात देहभाव मुळीचं नसतो. तेथे "मी बध्द का मुक्त" ?असे वाटत नाही. तिथे देहाचें भान असते तेथे बध्दपणा व मुक्तपणा असा भेद दिसतो. 50व्या ओवीत समर्थ म्हणतात की"जोपर्यंत अंतःकरणात देहबुद्धी असते तोपर्यंत ब्रम्हादिक देव देखील मुक्त होऊ शकत नाहीत. मग देहबुद्धी असेव तर शुक सुध्दा मुक्त होणार नाही. मी मुक्त आहे असे समजणे म्हणजे बध्दपणाचेच लक्षण मानले जाते. आत्मस्वरूपाच्या बाजूने विचार केला तर मुक्त आणि बध्द ही भाषा वापरणे योग्य होणार नाही. स्वस्वरूप स्वतः सिध्द आहे म्हणून ते बध्दही नाही व मुक्तही नाही. मी मुक्त आहे क्षहा अहंकार कधीही असु नये. कारणं देहबुद्धीचा अडसर घेऊन जर कोणी स्वस्वरूपाकडे जाईल त्याला अंतीम ध्येयापर्यंत जाता येत नाही. कारणं मी पणाचा अहंकार त्याच्या ठिकाणी सतत वास करत असतो. म्हणून समास लिहिताना सुरवातीलाच मी म्हणाले आहे की अहंकार हा माणसाचा सर्वात मोठा शत्रु आहे. सत्व,रज,तम हे तीन गुणांनी बंधन तयार होते. स्वस्वरूपाच्या ठिकाणी या तीनही गुणांना काही किंमत नसते. अहंकार त्याग ही शुन्यत्वाची पहिली पायरी आहे.

## परमेश्वराच्या भक्तीचा राजमार्ग

आधुनिक केसरी

परमात्म्याची ज्याने ओळख होते ते ज्ञान. अन्य ज्ञान ते केवळ शब्दांचे अवडंबरच होय. परमात्मा नुसत्या ज्ञानाने ओळखता येणार नाही. भक्ति केल्यानेच तो ओळखता येईल. जसे गाय आली म्हणजे तिच्यामागोमाग वासरू येते, त्याला निराळे बोलवावे लागत नाही. त्याप्रमाणे, भक्ति केल्यावर ज्ञान आपोआपच मागे येते. आता भक्ति कशी करायची हे पाहिले पाहिजे. जो देवापासून विभक्त राहात नाही तो भक्त. नुसते देहाला कष्ट दिल्याने वैराग्य प्राप्त होत नाही, तर ज्या स्थितीत आपल्याला देव ठेवील त्या स्थितीतच आनंदाने राहणे म्हणजे वैरागी होणे. सुखात ठेवले तर आसक्तिशिवाय राहिले म्हणजे झाले. वैराग्य प्राप्त व्हायला प्रपंच सोडावा लागत नाही. साधुसंत प्रपंच सोडून राहात नाहीत. किंबहुना, ते आपल्यापेक्षांही प्रपंच उत्तम करतात; पण मनातून त्यांना त्यात आसक्ति नसते. मनाने आतून जो आसक्तिरहित झाला त्यालाच खरे वैराग्य आले असे होते. अंगाला राख फासून राहिले म्हणजे वैराग्य येत नाही; तर देह प्रारब्धावर, भगवंताच्या भरवंशावर टाकून राहणे हेच वैराग्य. कशाचीही हाव न धरता, जी स्थिती प्राप्त होईल तीतच आनंदाने राहणे म्हणजे परमेश्वराची इच्छा मानणे होय. आणि तसे राहिले म्हणजे आपोआपच भक्त होतो. तसे व्हायला राजमार्ग म्हणजे नामस्मरण करणे. नामस्मरणावर विश्वास ठेवावा आणि ते



विश्वासाने घेत जावे. गुरूने जे नामस्मरण करायला सांगितले असेल तेच करीत राहावे. आणि त्यातच त्याला पाहावे, म्हणजे दिसेल ते गुरुरूपच दिसू लागते. असे झाले म्हणजे सर्व ठिकाणी गुरू दिसू लागतो; चांगल्या दिवाणखान्यात असलो म्हणजे गुरू दिसतो आणि वाईट ठिकाणी असलो तर तो दिसत नाही असे नाही. सर्व ठिकाणी गुरुरूप दिसू लागल्यावर जगात वाईट असे काहीच राहात नाही, कारण मग वाईटाला जागाच राहात नाही. नामस्मरण हेच साधन आहे आणि साध्यही तेच आहे. दुसऱ्या कुणीही काहीही सांगितले तरी त्यावर विश्वास ठेवू नये. नामस्मरण हेच सत्य. त्यावर इतका विश्वास ठेवा, की त्याशिवाय जगातदुसरे काही नाही. एवढा विश्वास अंगी बाणल्यावर देव काही लांब नाही, तुमच्याजवळ आहे. प्रपंचावर जी आसक्ति करता ती तिथून काढून परमार्थावर ठेवा, म्हणजे परमार्थ कठीण नाही. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजेच आपला मीपणा नाहीसा करणे होय. मीपणा समूळ मेल्याशिवाय अनन्य शरण जाता येणार नाही. मीपणा हा गुरूने सांगितलेले नामस्मरण करीत राहिल्याने जातो. म्हणूनच सतत नामस्मरण करीत असावे. वैराग्य हे वृत्तीत असते. भगवंताने जे दिले त्यात समाधान असून, इतर काही हवे असे न वाटणे, हे वैराग्य.

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**नाहीं तयाविण भुकेला विठ्ठल । येइल तैसा बोल रामकृष्ण ॥ध्रु.॥**
**देवापाशीं मागें आवडीची भक्ति । विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥२॥**
**तुका म्हणे मना सांगतों विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ॥३॥**
**सावध जालों सावध जालों । हरिच्या आलों जागरणा ॥१॥**
**तेथें वैष्णवांचे भार । जयजयकार गर्जतसे ॥ध्रु.॥**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ८ फेब्रुवारी २०२३





पाकचा प्रवास अण्वस्त्रांवरून थेट अन्न-वस्त्रांवर पान ७



भटक्या समाजाची भटकंती कधी थांबणार पान ९

# शिक्षक द्या, शिक्षक... आमच्या शाळेला शिक्षक द्या..!

## २०० विद्यार्थ्यांचे पैठण पंचायत समितीच्या शालेय विभागात आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** नको मोबाईल, नको विज, लाखेगाव शाळेला शिक्षक द्या असा अक्रोश करत जवळपास 200 विद्यार्थी पैठण पंचायत समितीच्या शालेय विभागात दाखल झाले होते. यावेळी पैठण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व गट शिक्षण अधिकारी हजर नसल्याने चुमुरड्याचा अक्रोश तब्बल दोन तास गट शिक्षण अधिकारी यांच्या दालनासमोर उभे होते. आमच्या शाळेला शिक्षक द्या ,नको आम्हाला मोबाईल  पण आमच्या शाळेला शिक्षक द्या म्हणत अक्रोश केला पण.. उपयोग काहीच झाला नाही. या चुमुरड्याचा आवाज ऐकण्यासाठी ना गट शिक्षण अधिकारी आले नसल्याने विद्यार्थीचा अक्रोश चालूच आहे.



# मंगळुरूमध्ये १३७ विद्यार्थ्यांना वसतिगृहातील जेवणातून विषबाधा

आधुनिक केसरी न्यूज



**मंगळुरु :** येथील शक्तीनगर भागातील सिटी नर्सिंग अ‍ॅण्ड पॅरामेडिकल कॉलेजमधील विद्यार्थ्यांना वसतीगृहाच्या कँटीनमधील रात्रीचे जेवण घेतल्यानंतर पोटदुखी, उलटी, अस्वस्थपणा असा त्रास जाणवू लागला होता. यानंतर या सर्व विद्यार्थ्यांना तातडीने शहरातील विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले. प्राथमिकदृष्ट्या हा अन्न विषबाधेचा प्रकार दिसत असल्याचे समोर आले आहे. मंगळरुच्या पोलीस आयुक्तांनी विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची पाहणी करण्यासाठी रुग्णालयांना भेट दिली. एकूण १३७ विद्यार्थ्यांवर सहा रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. पोलीस आयुक्तांनी या संदर्भात माहिती देताना सांगितले की, आम्हाला माहिती मिळाली पहाटे २ वाजेपासून सुमारे १३७ विद्यार्थांना अन्नातून विषबाधा झाल्याने पोटदुखी, उलटी, मळमळणे आदी त्रास जाणवू लागला आणि त्यांना सिटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. जवळपास १३७ विद्यार्थ्यांना विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. आम्ही या घटनेमागचे नेमके कारण शोधण्याचा प्रयत्न करत आहोत. याचबरोबर, अन्नातून विषबाधा झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आम्ही वसतीगृहास भेट देऊ, वॉर्डनशी संवाद साधू आणि सर्व माहिती घेऊ. सर्व विद्यार्थी धोक्याबाहेर आहेत. कोणतीही जीवितहानी झालेली नाही. असे जिल्हा आरोग्य निरीक्षक डॉ. अशोक यांनी सांगितले आहे. याप्रकरणी आतापर्यंत हे समजलेले नाही की विद्यार्थ्यांच्या जेवणात असे काय आले होत, की ज्यामुळे त्यांना अन्न विषबाधा झाली.

# पत्रकाराला मारहाण करणाऱ्यांविरुद्ध पत्रकार हल्ला विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**केज** : येथील बसस्थानकात पत्रकाराला मारहाण केल्या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याचा तपास स्वतः सहाय्यक पोलीस अधीक्षक पंकज कुमावत हे करीत आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, सुदर्शन न्यूज चॅनेलचे पत्रकार अभिमन्यू शिवाजी फड हे औरंगाबाद-अंबाजोगाई गाडीने प्रवास करत होते. केज बसस्टँडवर गाडी उभी असताना केजहुन एसटी बसमध्ये चढलेले डॉ. मोसीन शेख आणि त्याच्या सोबतच अनोळखी इसम त्यांना पाठीमागे सरक असे म्हणाला आणि तू सुदर्शन न्युजचा आहेस काय ? असे म्हणून काहीही करतोस का? असे म्हणून कॉलर धरुन खाली ओढुन मारहाण करत शिविगाळ केली. तसेच त्यांच्या सोबतच्या काळ्या रंगाचे कपडे घातलेल्या अनोळखी इसमाने फड यांचा शर्ट फाडुन शिविगाळ केली. त्या दोघांनी पत्रकार फड यांना लाथाबुक्क्यांनी व चापटाने मारुन जिवे मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत पत्रकार फड यांच्या हातातील घड्याळ तुटले. या प्रकरणी सुदर्शन न्यूजचे पत्रकार अभिमन्यू फड यांनी केज पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून डॉ. मोसीन शेख आणि त्याच्या साथीदारा विरुद्ध गु.र.नं. ७०/२०२३, भा. दं. वि. ३२३, ५०४, ५०६, ४२७, ३४ आणि यासह महाराष्ट्र प्रसार माध्यमातील व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था (हिंसक कृत्य) मालमत्तेचे नुकसान किंवा हानी यांना प्रतीबंधक अधीनीयम २०१७ या पत्रकार हल्ला विरोधी कायद्या नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पत्रकार अभिमन्यू फड यांच्या वरील मारहाण आणि हल्ल्याच्या गुन्ह्याचा तपास स्वतः सहाय्यक पोलीस अधीक्षक पंकज कुमावत हे करीत आहेत.

# महबुबा मुफ्तींचा मोदी सरकारवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** जम्मू काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीडीपी पक्षाच्या अध्यक्षा महबुबा मुफ्ती यांनी दिल्लीत सोमवारी एका पत्रकार परिषदेत बोलताना भारतीय जनता पार्टीवर हल्लाबोल केला. महबुबा मुफ्ती म्हणाल्या की, भाजपाने जम्मू काश्मीरचा अफगाणिस्तान केलाय! राज्यभरात अतिक्रमणविरोधी मोहीमेअंतर्गत गरीब आणि अल्पभूधारकांची घरं पाडली जात आहेत. त्यांच्या घरांवर बुल्डोझरचा फिरवला जात आहे. पीपल्स डेमोक्रेटिक पार्टीच्या अध्यक्षा मुफ्ती म्हणाल्या की, "मी देशातल्या सर्व विरोधी पक्षांना आवाहन करते भाजपाकडून काश्मीरमध्ये सुरू असलेल्या अत्याचारांकडे दुर्लक्ष करू नका. भाजपा त्यांच्या प्रचंड बहुमताचा वापर संविधानाची पायमल्ली करण्यासाठी करत आहे.

# तर मनपाच्या अधिकाऱ्यांना दूषित पाणी पाजणार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गेल्या पाच महिन्यांपासून प्रभाग क्रमांक दहा मधील सुभाष नगर भागातील सुपडू आप्पा कॉलनी मध्ये दूषित पाणीपुरवठा होत असल्याने महिलांनी मनपा विरोधात रोष व्यक्त केला आहे. महिलांनी दूषित पाण्याच्या बाटल्या घेत उपायुक्त विजय सनेर यांना चांगलाच जाब विचारला आहे. तर याच प्रसंगी प्रभागातील नगरसेवक चंद्रकांत सोनार यांनाही संतप्त महिलांनी घेराव व धारेवर धरत रोष व्यक्त केला आहे. तर नगरसेवक व उपयुक्तानी देखिल महिलांचा रोष समजून घेत समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले आहे. सदरील समस्या सात दिवसाच्या आत न सोडवल्यास मनपा च्या अधिकाऱ्यांना च दूषित पाणी पाजणार असल्याचा इशाराही या प्रभागातील रहिवाशांनी मनपा प्रशासनाला दिला आहे. या भागात वारंवार होत असलेल्या दूषित पाणीपुरवठ्याच्या तक्रारी मनपा प्रशासन व नगरसेवकाना करूनही समस्या सुटत नसल्याने जुने धुळे भागातील नागरिक एकत्र येत मनपा प्रशासना विरोधात चांगलेच आक्रमक झाल्याचे पहावयास मिळाले. संतप्त झालेल्या महिलांनी थेट दूषित पाण्याच्या बाटल्या उपयुक्तांच्या टेबलवर ठेवत चांगलाच जाब विचारला आहे.  तर प्रभागातील नगरसेवक  चंद्रकांत सोनार यांना धारेवर धरत महिलांनी समस्यांचा पाढा त्यांच्यासमोर मांडला आहे. सदरील दूषित पाण्याची समस्या या भागात नित्कृष्ट दर्जाच्या झालेल्या ड्रेनेज लाईनच्या कामामुळे झाले असल्याचा आरोप देखील परिसरातील नागरिकांनी केला आहे. याप्रसंगी एडवोकेट सचिन जाधव यांच्यासह जुने धुळे भागातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# महाविनाशकारी भूकंप

आधुनिक केसरी

टर्कीमध्ये एकापाठोपाठ एक भूकंपाचे धक्का बसत आहेत. सोमवारी तीन भूकंपाचे धक्के बसल्यानंतर मंगळवारी सकाळी पुन्हा एकदा भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपाची तीव्रता ५.५ रिश्टर स्केल इतकी मोजण्यात आली असून अंकारा प्रांतातील मध्य गोलबासी शहरात हा भूकंप झाला आहे. तत्पूर्वी सोमवारी टर्कीमध्ये ७.८ रिश्टर स्केल, ७.६ रिश्टर स्केल आणि ६.० रिश्टर स्केल असे तीन मोठे भूकंप झाले. या भूकंपांमुळे टर्की आणि सीरियामध्ये मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाली असून अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत. या घटनेत ४ हजारांपेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला आहे. तर १५ हजार नागरीक जखमी झाले आहेत. महत्त्वाचे म्हणजे हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. टर्कीचे उप-राष्ट्रपती फुआत ओकते यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ११ हजार ०२२ जणांचा शोध घेण्यात आला असून ७ हजार ८४० जणांना ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आले आहे. तसेच तीन लाखांपेक्षा जास्त भूकंपग्रस्तांना वसतिगृहे आणि विद्यापीठांमध्ये ठेवण्यात आले आहे. तुर्कस्तानच्या इतिहासातल्या दुसऱ्या महाविनाशकारी भूकंपाने जग हादरले आहे. तुर्कस्तान आणि या देशाच्या आसपासचा प्रदेश हा अॅनाटोलियन प्लेटवर आहे. हा देश ६ टेक्टोनिक प्लेट्सने वेढलेले आहेत. अॅनाटोलियन प्लेटच्या पूर्वेला ईस्ट अॅनाटोलियन फॉल्ट आहे तर डाव्या बाजूला ट्रान्सफॉर्म फॉल्ट आहे. दक्षिण आणि दक्षिण-पश्चिमेला आफ्रिकन प्लेट आहे. याशिवाय तुर्कस्तानच्या उत्तरेला युरेशियन प्लेट आहे. या प्लेट घड्याळाच्या काट्याच्या उलट्या दिशेने फिरतात. त्यामुळे या प्लेट्समध्ये सतत घर्षण होते. यामुळेच तुर्कस्तान आणि आसपासच्या प्रदेशात भूकंपाचे हादरे बसतात. वैज्ञानिकांच्या मते हिमालयन क्षेत्रात जशी परिस्थिती आहे, त्यापेक्षा खूप वेगळी परिस्थिती इथे आहे. उत्तरेकडील अॅनाटोलियन प्लेटचा अभ्यास केल्यानंतर संशोधकांना समजले की, अॅनाटोलिया युरेशियन प्लेटपासून वेगळी झाली आहे. अभ्यासानंतर शास्त्रज्ञांनी सांगितले की, या प्लेट्सवर अरेबियन प्लेट्सचा दबाव वाढू लागला आहे. तर युरेशियन प्लेट हा दबाव रोखत आहे. अलिकडच्या काही वर्षांमध्ये तुर्कस्तान आणि आसपासच्या प्रदेशात ५ मॅग्रिट्युडपेक्षा जास्त तीव्रतेचे अनेक भूकंप आले नाहीत. १९७० नंतर या प्रदेशात ६ मॅग्रिट्युडपेक्षा जास्त तीव्रतेचे तीन भूकंप आले आहेत. या प्रदेशातला शेवटचा मोठा भूकंप जानेवारी २०२० मध्ये आला होता. सोमवारच्या भूकंपाची तीव्रता ७.८ मॅग्रिट्युड इतकी होती. जमिनीखाली १७.९ किमी खाली हा भूकंप आला. त्यानंतर ७.५ मॅग्रिट्युड इतक्या तीव्रतेचा आणखी एक भूकंप आला होता.

# ओबीसी जनगणना झालीच पाहिजे !

आधुनिक केसरी



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

**लोकांची मोजणी करण्याची प्रथा शासनव्यवस्थेच्या स्थापने इतकीच जुनी आहे. ईजिप्शियन, ग्रीक, रोमन, हिब्रू, पर्शियन, या लोकांनी लोकसंख्येची मोजणी वेळोवेळी केल्याचे इतिहासात नमूद आहे. चीन-जपानमध्येही पुरातन काळापासून अशी मोजणी होत असे. साधारणतः अशी मोजणी सैन्यभरतीस योग्य वय असलेल्या नागरिकांची किंवा करपात्र लोकांची संख्या समजण्यासाठी जरूर तेव्हा होत असे. सबंध शहराची लोकसंख्या मोजण्यास यूरोपमध्ये पंधराव्या व सोळाव्या शतकांत सुरुवात झाली. मद्रास शहराची अशी लोकसंख्या मोजणी सन १६८७मध्ये झाल्याचे नमूद आहे. त्यानंतर राष्ट्रीय स्वरूपाची जनगणना सुरू झाली. सरकारला ओबीसी प्रवर्गातील लोकांची वेगळ्या रकान्यातून जनगणना करावीच लागेल. का व कशी? यावर जोर देणारा लेख अलककार- श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी यांच्या रोखठोक शब्दांतून**

स्वीडनमधील पहिली जनगणना सन १७५०मध्ये झाली. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात १७९० पासून व ग्रेट ब्रिटनमध्ये १८०१ पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात येतात. भारतात पहिली जनगणना दि.९ फेब्रुवारी १८७२ रोजी सुरू करून ती काही महिन्यांती पार पडली व त्यानंतर सन १८८१पासून दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात आल्या. काही राष्ट्रे जनगणना दर पाच वर्षांनी घेतात, तर काही त्यांना जरूर वाटेल तेव्हा जनगणना करतात. हे काम बरेच खर्चाचे असल्यामुळे बहुतेक राष्ट्रांत दर दहा वर्षांनी जनगणना करण्याची प्रथा आहे. सुरुवातीस जनगणनेच्या वेळी प्रत्येक कुटुंबाविषयीची माहिती गोळा करीत, परंतु नंतर प्रत्येक व्यक्तीबद्दल माहिती गोळा करण्यात येऊ लागली. पुढे पुढे गरीब, दुर्बल, मागास समाज घटकांची माहिती घेतली जाऊ लागली. आता इतर मागासवर्ग- ओबीसींची माहिती गोळा करणे क्रमप्राप्त व अत्यावश्यक नाही का? अशी व्यक्तिगत स्वरूपाची राष्ट्रीय जनगणना सर्व प्रथम बेल्जियममध्ये सन १८४६मध्ये व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात सन १८५०मध्ये घेण्यात आली. हळूहळू सर्वच राष्ट्रांनी अशा प्रकारची जनगणना घेण्यास सुरुवात केली. सन १९६०च्या सुमारास सबंध जगात एकूण १८०हून अधिक जनगणना घेण्यात आल्या आहेत. त्यात लोककल्याणाच्या उदयोन्मुख समस्या व प्रश्नांना प्राधान्याने घेऊन त्यासाठी विकासात्मक धोरण अवलंबिले आहेत. हे काय खोटे आहे?

स्वातंत्र्यपूर्व काळात आठ व स्वातंत्र्योत्तर काळात तीन वेळा जनगणना या भारतात झाल्या. वेळोवेळी जनगणना अधिनियम संमत करण्यात येऊन त्यांनुसार जनगणना घेतली जाते. त्यासाठी आयुक्त, संचालक, पर्यवेक्षक वगैरे अधिकारी नेमण्यात येतात. त्यांना इतर अधिकाऱ्यांची मदत होते. प्रत्यक्ष गणनेचे काम प्रगणकांकडे सोपविण्यात येते. शिक्षक, पोलीस, जिल्हा परिषदांचे व नगरपालिकांचे कर्मचारी या सर्वांची मदत गणनेसाठी घ्यावी लागते. त्यांची निवड झाल्यावर जनगणना कशी घ्यावी? निरनिराळ्या याद्या व अनुसूच्या कशा वापराव्यात? प्रश्नांवलीतील प्रश्नांची उत्तरे कशी लिहून घ्यावीत? आदी बाबींचे त्यांना प्रशिक्षण द्यावे लागते. त्यांच्याकडून नमुन्यादाखल काही माहितीही गोळा करून घ्यावी लागते. सन १९७१मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी प्रगणकाला चार प्रकारच्या याद्या तयार कराव्या लागल्या होत्या. आज इतर मागासवर्ग आपली जनसंख्या जाणून घेण्याच्या मनस्थितीत आहे, तेव्हा त्यांचीही माहिती वेगळ्या रकान्यातून करणे प्रशासनाला अत्यंत निकडीचे आहे, आढेवेढे घेऊन ते टाळणे महागात पडू शकते. कारण व्यक्तिगत पट्टीद्वारा गोळा केलेली सर्व माहिती गोपनीय मानली जाते. देशाच्या काही भागांत स्थानिक वा राजकीय अडचणींमुळे गणनेच्या कालखंडात आवश्यक ते फेरफार करावे लागतात. जनगणनेत गोळा झालेल्या माहितीचे जिल्हागणिक आणि राज्यागणिक संकलन करून तात्पुरत्या स्वरूपाचे आकडे जनगणनेचे काम संपल्यापासून पाच दिवसांच्या आतच मध्यवर्ती जनगणना कार्यालयाकडे उपलब्ध होऊ शकतात. यावरूनच या अवाढव्य प्रशासकीय प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या संघटनात्मक प्रयत्नांची व भारतीय जनतेने दिलेल्या उत्स्फूर्त सहकार्याची काहीशी कल्पना येऊ शकते. याकामी जनतेचे सहकार्य फार मोलाचे ठरते. आता जर का भारत सरकारने इतर मागास वर्ग- ओबीसी समाजघटकातील लोकांच्या इच्छेविरुद्ध जनगणना सुरू केली तर त्यांचे सहकार्य मिळणे शक्यच नाही. हा संपूर्ण घटक- समूह पुढील प्रत्येक जनगणनेवर बहिष्कार टाकण्याच्या पावित्र्यात खंबीर उभा ठाकला आहे. त्यामुळे देशाच्या विकास कार्यास खिळ बसणे साहजिकच आहे. जनगणना म्हणजे एखाद्या राष्ट्राच्या हद्दीत राहणाऱ्या लोकांची मोजणी होय. आधुनिक काळात प्रत्येक राष्ट्रातील शासनाचे हे एक अटळ कर्तव्य झाले आहे. राष्ट्राची लोकसंख्या किती? त्यातील लोकांची सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्ये कोणती? त्यांचे राष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत वितरण कसे झाले आहे? सामाजिक व जीवशास्त्रीय फेरफारांचे त्यांच्यावर कसकसे परिणाम होतात? आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक किती? सामाजिक घटक कोणते? त्या त्या सामाजिक घटकांतील लोकसंख्या किती? आदी अनेक प्रश्न दैनंदिन प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरतात. त्यांना यशस्वीरित्या हाताळण्यासाठी आवश्यक असलेली माहिती जनगणनेद्वारा उपलब्ध होते. शासनाला केवळ जनगणनाच नव्हे, तर प्रसंगोपात इतर अनेक प्रकारच्या गणना करण्याची आवश्यक भासत असते. उदा. कृषिगणना, पशुधनगणना, उत्पादनगणना, घरांची मोजणी, जनगणना इत्यादी. मग ओबीसी जनगणना का बरे होऊ नये? अशा सर्व गणनांतून उपलब्ध होणारी आकडेवारी राष्ट्रीय प्रगती दर्शविते व राष्ट्राच्या अनेक समस्यांचा उलगडा करण्यास उपयोगी पडते. विशेष करून जनगणनेद्वारे मिळणाऱ्या माहितीतून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप व राष्ट्राचे मानवी भांडवलरूपी सामर्थ्य यांवर यथोचित प्रकाश टाकला जाऊ शकतो. जनगणना म्हणजे विशिष्ट काळी एखाद्या राष्ट्रातील किंवा प्रदेशातील सर्व लोकांबद्दलची जनांकिकीय, आर्थिक व सामाजिक आकडेवारी गोळा करणे आणि तिचे योग्य संकलन करून तिला प्रसिद्धी देण्याची संपूर्ण प्रक्रिया होय. जनगणनेच्या सहा वैशिष्ट्यांवर संयुक्त राष्ट्रांनी भर दिला आहे- जनगणनेला राष्ट्राचा पुरस्कार पाहिजे, तिचे क्षेत्र व घटक निश्चित असले पाहिजे, त्या क्षेत्रातील सर्व व्यक्तींचा त्यात समावेश झाला पाहिजे, ती गोळा केलेली माहिती विशिष्ट कालक्षणाबद्दल असली पाहिजे, प्रत्येक व्यक्तीविषयी अलग-अलग माहिती नमूद केली पाहिजे, गोळा केलेली माहिती प्रसिद्ध झाली पाहिजे. जनगणना करताना संबंधित राष्ट्रे त्यांना त्या वेळी महत्त्वाच्या वाटणाऱ्या बाबींविषयी माहिती गोळा करतात. कालमान व परिस्थिती यानुसार निरनिराळ्या जनगणनांतील बाबी वेगवेगळ्या असू शकतात. जनगणनेत खालील बाबींचा समावेश हवा, असे संयुक्त राष्ट्रांनी सुचविले आहे- जनगणनेच्या वेळी व्यक्तीची स्थाननिश्चिती व नेहमीचे राहण्याचे ठिकाण, कुटुंबप्रमुखाशी नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, जन्मस्थळ, नागरिकत्व, आर्थिक व्यवसाय, उद्योग, हुद्दा, भाषा, वंशत्व व राष्ट्रीयत्व, साक्षरता, शैक्षणिक पातळी, शालेय हजेरी व प्रत्येक स्त्रीला किती अपत्ये झाली त्यांची संख्या नोंद करावी. ज्या राष्ट्रांना या सर्व बाबींचा जनगणनेत समावेश करता येणे शक्य नसेल, त्यांनी किमानपक्षी लिंग, वय, वैवाहिक स्थिती व आर्थिक व्यवसाय याबाबींची माहिती तरी गोळा केलीच पाहिजे.

जनगणना दोन प्रकारांनी करता येते. एकतर प्रत्येक कुटुंबप्रमुखाकडून छापील प्रश्नावली भरून घ्यावयाची किंवा गणना करणाऱ्यांनी कुटुंबप्रमुखांना समक्ष भेटून माहिती घ्यावयाची आहे. काही देशांत जनगणनेपूर्वी सर्व घरांची यादी व मोजणी करतात व तिच्या आधारे जनगणनेच्या वेळी कोणीही वगळले जाऊ नये, अशी काळजी घेतात. गोळा केलेल्या माहीतीचे त्वरित संकलन व सारणीकरण व्हावे, अशी व्यवस्था करावी लागते. त्यानंतरच सारणीरूपाने निरनिराळ्या बाबींविषयींची वर्गीकृत माहिती प्रसिद्ध करता येते. जनगणना अपूर्ण राहू नये, तिच्यात चुका होऊ नयेत यांसाठी प्रश्नावली तयार करण्यापासून ते थेट अखेरच्या आकडेवारीचे संकलन प्रसिद्ध करेपर्यंत प्रत्येक टप्प्याला शक्य तेवढी काळजी घ्यावी लागते. जनतेचे पुरेपूर सहकार्य आणि कार्यक्षम प्रशासन यंत्रणा यांशिवाय जनगणनेची कार्यक्षमता व गुणवत्ता पूर्णपणे समाधानकारक असूच शकत नाही. जनगणना अनेक कारणांसाठी घेतली जाते. सामाजिक व आर्थिक विकासाचे प्रयत्न करण्यासाठी ती आवश्यकच ठरते. आरोग्य, साक्षरता, शिक्षण, उत्पन्न, राहणीमान, अन्नपुरवठा, कृषिउत्पादन, औद्योगिक उत्पादन आदी क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्याच्या योजना आखण्यासाठी बऱ्यांच विविध माहितींची आवश्यकता असते. मतदान पद्धतीने लोकप्रतिनिधी निवडणे व कल्याणकारी राज्यातील सुविधांचे योग्य वाटप करणे, यांसाठीही जनगणेतील माहिती उपयोगी पडते. उद्योगपती व व्यापारी संख्या जनगणनेच्या आधारे आपापल्या व्यवसायांचे योग्य नियोजन करू शकतात. शिवाय आर्थिक, सामाजिक व जनांकिकीय प्रश्नांवर संशोधन करणाऱ्यांना जनगणनेमधून उपलब्ध होणारी माहिती अनेक दृष्टींनी उपयुक्त असते. म्हणूनच जनगणनेला संशोधनाचे आणि प्रशासनाचे एक बहुउद्देशीय साधन मानतात. सन १९६१पूर्वी जनगणनेसाठी लागणारी संघटना प्रत्यक्ष गणनावर्षापूर्वी एकदोन वर्षे अगोदरपासून अस्तित्वात येई व जनगणनेची कार्यवाही संपल्यानंतर दोनतीन वर्षांतच विलयास जाई. त्यामुळे जनगणनेच्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष पुरविणाऱ्या संघटनेचा भारतात अभाव होता. ही उणीव सन १९६१नंतर भरून काढण्यात आली. केंद्र, प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेश यांत आता जनगणना कार्यालये सातत्याने कार्यप्रवण असतात. त्यांना आगामी जनगणनेची पूर्वतयारी करण्यास पुरेसा अवधी मिळतो. जनगणनेच्या वेळी राज्यांसाठी नेमण्यात येणाऱ्या पर्यवेक्षकांना आता जनगणना संचालक म्हणतात. सन १९७१च्या जनगणनेसाठी जनगणना आयुक्त आणि महानिबंधक या अधिकाऱ्यांची नेमणूक सन १९६८मध्ये व बहुतेक राज्य संचालकांच्या नेमणुका सन १९६९मध्येच करण्यात आल्या होत्या. मग इतर मागासवर्ग- ओबीसींची स्वतंत्र रकान्यात नोंद करून घेण्यास अडचणी येतीलच कशा? !! भारतीय जनगणना आरंभ दिनाच्या सप्ताहभर सर्व सूज्ञ भारतीय बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# पाकमध्ये दहशतवादी हल्ले का होत आहेत ?

आधुनिक केसरी



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

**पाकिस्तानची भूमी पुन्हा एकदा स्फोटाने हादरली आहे. पेशावरमधील एका मशिदीत सोमवारी भीषण स्फोट झाला. या स्फोटात आतापर्यंत ९० जणांचा मृत्यू झाला आहे, तर ९० हून अधिक लोक जखमी झाल्याची माहिती आहे. स्फोट इतका जोरदार होता की त्यामुळे मशिदीचा एक भाग पूर्णपणे कोसळला.पाकिस्तानची भूमी दहशतवाद्यांचा गड मानली जाते. जगातील बहुतांश दहशतवादी संघटनांनी पाकिस्तानची भूमी वापरली.**

अल-कायदा प्रमुख ओसामा बिन लादेनपासून ते जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मसूद अझहर, मुंबई दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड हाफिज सईदपर्यंत अनेक दहशतवाद्यांना पाकिस्तान सरकारने आश्रय दिला. आता त्याची किंमत पाकिस्तान चुकवत आहे. अलिकडच्या काही महिन्यांत टीटीपीमुळे पाकिस्तानमधील समस्या खूप वाढल्या आहेत. सर्वसामान्यांपासून ते लष्करातील अधिकाऱ्यांनाही लक्ष्य केले जात आहे.
तालिबानने अफगाणिस्तानात सत्ता हाती घेतल्यापासून टीटीपीचे हल्ले वाढल्याचा दावा पाकिस्तान करत आहे. टीटीपीचे सदस्य गेल्या अनेक वर्षांपासून दहशतवादी घटना घडवत आहेत. टीटीपी देशात शरिया कायद्याची अंमलबजावणी, अटक केलेल्या साथीदारांची सुटका आणि खैबर पख्तूनख्वामधील पाकिस्तानी लष्कराची तैनाती कमी करण्यासाठी दबाव आणत आहे. टीटीपी कमांडर उमर खालिद खुर्सानीच्या अफगाणिस्तानात गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये झालेल्या हत्येमुळे संघटनेचे दहशतवादीही संतप्त झाले असून ते मोठ्या प्रमाणात सामान्य लोक आणि सैनिकांना लक्ष्य करत आहेत. इतर देशांमध्ये दहशतवादी कारवाया करणारा पाकिस्तान आता त्यालाच बळी पडत आहे. देशात दहशतवादी हल्ल्यांच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. दक्षिण आशिया टेररिझम पोर्टलनुसार, दहशतवाद्यांचा गड असलेल्या पाकिस्तानमध्ये गेल्या २२ वर्षांत सुमारे १६,००० दहशतवादी हल्ले झाले. या हल्ल्यांमध्ये २८,९१८ लोकांना आपला जीव गमवावा लागला. यामध्ये सामान्य नागरिकांव्यतिरिक्त पाकिस्तानी लष्कर आणि पोलिसांचाही समावेश आहे.
गेल्या वर्षी २०२२ मध्येच ३५० हून अधिक हल्ले झाले होते, ज्यात ५०० हून अधिक नागरिक आणि सैनिक मरण पावले होते. मागच्या वर्षी पेशावरमध्येच कोचा रिसालदार भागातील शिया मशिदीत मोठा स्फोट झाला होता, ज्यामध्ये ६३ लोक ठार झाले होते. यादरम्यान १९० हून अधिक लोक जखमी झाले. या स्फोटाची जबाबदारी इस्लामिक स्टेट या दहशतवादी संघटनेच्या खोरासान युनिटने (आयएस-के) घेतली होती. यापूर्वी २०२१ मध्ये पाकिस्तानमध्ये २६७ दहशतवादी घटना घडल्या होत्या.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# छोड दे सारी दुनिया किसी के लिये



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**रंग और नूर की बारात किसे पेश करू... या गाण्यापासून सुरू झालेली कॅसेट तेरी गलियो मे ना रखेंगे कदम नंतर तू प्यार है किसी और का तुझे चाहता कोई और है अशी एकामागे एक दर्द भरे गाणे ऐकणे सुरू होते. आम्ही सारे मित्र कंटाळून गेलो... आम्ही सारे म्हणजे सहा सात मित्र, 12 वी होऊन दोन वर्षे झालेले सर्वांचे पुढील शिक्षण सुरू असलेले.... 1997 हा वर्षी आम्ही खरेतर नवतरुण होतो, तसे आजही म्हातारे वैगेरे झालोच नाही पण तो काळ खरच वेगळा होता, तर आमच्या एका दुःखी मित्राकडे आम्ही सहा सात मित्र जमलो होतो, खरेतर आम्ही त्याला प्रेम म्हणजे काहीच नाही असे समजावून सांगण्यासाठी आलो होतो.**

त्याची बालपणापासूनची वर्गमैत्रिणीचा त्यादिवशी साक्षगंध होता, बर साक्षगंध झाल्यावर काही चार सहा महिने लग्न लांबणारे नव्हते अगदी आठ दिवसानंतर ते लग्न होणार असे ठरले होते. आणि आमच्या मित्राने मी शेवटच्या आठ दिवसासाठी तुमच्या सोबत आहे अशी भावनिक धमकी आमच्या पर्यंत पोहचवली होती. चांगल्या झाडावर नेहमी माकडे चढतात हे दुनियादारी मध्ये विनोदी वाटणारे तत्त्वज्ञान आम्हाला हसविण्यापेक्षा तीनचार वर्षांपूर्वीही गंभीरच करून गेले होते कारण आम्ही ते स्वतः अनुभवले होते. खरेतर ते वय प्रेम म्हणजे काय हे समजून घेण्याचे असले तरी लग्नाचे निश्चितच नव्हते. त्यातही ज्या वर्ग मैत्रिणी आपल्याला आवडतात त्यांचे लग्न आपल्यापेक्षा किमान चार पाच वर्ष अगोदर होतील याची जाणीवही सर्वांना होती. मात्र तरीही अभिषेकला समजून सांगत असताना आपल्याला आवडणाऱ्या मुलीचेही अनपेक्षितपणे असेच लग्न ठरणार आणि आपणही हीच कॅसेट ऐकणार काय? ही सुप्त भीती सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होती. आता तो प्रसंग आठवला म्हणजे खरे तर हसू येते... किती वेड असत वय? म्हणजे जिच्यासमोर प्रेमाची कबुलीही दिली नाही, होकार की नकार तेही माहीत नाही अगदी तरीही ती मिळाली नाही तर आपण आत्महत्याच करणार असे विचार करणाऱ्या पिढीचे प्रतिनिधी असलेले आम्ही, त्या दुःखी मित्राला काय समजून सांगावे हे कुणालाच कळत नव्हते, कारण त्याच्या जागी कुणीही असता तरी त्याची धमकी तीच... अशामध्ये सुरू झाले ते एक गाणे... ते गाणे म्हणजे आम्ही मित्रांनी एकमेकांशी काहीही न बोलता स्वतः स्वतःची समजूत घालावी अशी शब्दरचना त्या गाण्याची होती, इंदिवर यांनी लिहिलेल्या सरस्वतीचंद्र ह्या चित्रपटातील भारतरत्न लता मंगेशकर यांनी गायलेले हे गाणे आम्ही पुन्हा पुन्हा ऐकले, मेहकर मध्ये यशोमती टॉकीज मध्ये जेव्हा चित्रपट लागला तेव्हा आम्ही सर्वांनी आवर्जून पाहिला होता पण लक्षात राहिले होते ते चंदन सा बदन हे गाणे, त्यातही पहलेही बहुत मै तडपा हू तू और न मुझको तडपाना ही ओळ आमच्या सर्वांची त्या काळाची टॅगलाईन होती असे म्हणायला हरकत नाही. मात्र त्यादिवशी छोड दे सारी हे गाणे शांतपणे ऐकून लता मंगेशकर यांच्या स्वराची किमया आणि दिलासा आम्ही एकाच वेळी अनुभवत होतो. इंदीवर यांनी लिहिलेले शब्द लता मंगेशकर यांनी खरोखरच सजीव करून ठेवले आहेत असे तेव्हाही वाटले आणि आजही वाटते. छोड़ दे सारी दुनिया किसी के लिए ये मुनासिब नहीं आदमी के लिए कुणा एका व्यक्तीसाठी खरे तर तरुणीसाठी तिच्या प्रेमासाठी आई वडील , बहीण भाऊ, मित्र , नातेवाईक ह्यांच्या कडून मिळणारे प्रेम, त्यांच्या बाबतीत असलेल्या आपल्या जबाबदाऱ्या सोडून दुनिया सोडून जाण्याचा विचार किती रास्त आहे असा सरळ सवाल लतादिदी आपल्याला करत आहे असे वाटू लागले. प्यार से भी ज़रूरी कई काम हैं प्यार सब कुछ नहीं ज़िंदगी के लिए प्रेमापेक्षाही जीवनामध्ये अनेक ध्येय उद्देश स्वप्न पूर्ण करण्यासाठी मानव जन्म घेतो, प्रेम म्हणजेच सर्वस्व नाही ही जाणीव जागृत होऊ लागली होती. आपल्यावर आपल्या सभोवती असलेल्या लोकांचे प्रेम, त्यांच्या आपल्याकडून असलेल्या अपेक्षा, आपली कर्तव्य, आपल्या जबाबदाऱ्या डोक्यामध्ये रुंजी घालू लागल्या. तन से तन का मिलन हो न पाया तो क्या -२ मन से मन का मिलन कोई कम तो नहीं त्याचबरोबर विशुद्ध प्रेमाची ओळख नेमकेपणाने काय असते? तेसुद्धा समजून घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. लैला मजनू हिर-रांझा, सोहनी महिवाल ह्यांचे विशुद्ध प्रेम मनापुरते मर्यादित राहून अजरामर झाले, शारीरिक आकर्षणांच्या पुढेही प्रेम असते हे सांगणारा लतादिदीचा स्वर अंतःकरण पिळवटून टाकू लागला. खुशबू आती रहे दूर से ही सही सामने हो चमन कोई कम तो नहीं मैत्रिणीचे लग्न झाले तरी तिची आणि



आपली विशुद्ध मैत्री कायमस्वरूपी राहील ह्या जाणिवेतून मनाला नवा हुरूप येऊ लागला. प्रेमामध्ये अपयश आले प्रेयसीवर हल्ला करणारे आणि ॲसिड फेकणारे यांनीही वरील गाणे आवर्जून ऐकले पाहिजे असे आज मुद्दाम सांगावेसे वाटते. चाँद मिलता नहीं सबको सँसार में है दिया ही बहुत रोशनी के लिए सर्वांच्या नशिबामध्ये चंद्र असणार नाही, कुठेतरी आपल्यापुरता उजेड पाहिजे असेल तर मिणमिणत्या दिव्यावर सुद्धा समाधान मानावे लागेल. सर्वांची सर्व स्वप्न पूर्ण होत नसतात हे प्रत्येकाने समजून घेण्याची गरज तेव्हा सुद्धा आणि आजही आहेच, जीवनामधील एक संधी किंवा सुंदर मुलगी निघून गेली याचा अर्थ पुन्हा संधी आणि मुलगी मिळणार नाही असे नाहीच हे सांगताना लतादीदीच्या आवाजातून येणारा कातर स्वर कानावर निनादत होता, कितनी हसरत से तकती हैं कलियाँ तुम्हें क्यूँ बहारों को फिर से बुलाते नहीं एक दुनिया उजड़ ही गई है तो क्या दूसरा तुम जहाँ क्यूँ बसाते नहीं आपल्या हातातून चांगली संधी निघून गेली, सुंदर मुलगी आपल्या जीवनातून निघून गेली तरी आपल्या जीवनात येणारी संधी आणि आपली जीवनसंगिनी म्हणून येणारी तरुणी जाणाऱ्या मैत्रिणीपेक्षाही यापेक्षाही चांगली असेल समजदार असेल असा दिलासा लतादीदींच्या गाण्यातून मिळत होता. आता तर या जीवनाच्या आणि वयाच्या या वळणावर विनोदाने असे म्हणावेसे वाटते, संधी, मुलगी आणि मोबाईल हे जितके लेटेस्ट येणार तितके आकर्षक असणार मग आपल्या जीवनात येणारी मुलगी ही जाणाऱ्या मुलीपेक्षा किमान चार-पाच वर्षांनी तरी लेटेस्ट असणार अशी मनाची समजूत काढून जीवनाचा आनंद घेण्यास माझ्या तरुण मित्रांनी सज्ज राहून अर्धवट प्रेमापोटी जीवन त्यागण्याचा विचार केल्यापेक्षा जीवन आनंदाने जगण्याचा विचार केला पाहिजे असे सांगावेसे वाटते. दिल ने चाहा भी तो, साथ सँसार के चलना पड़ता है सब की खुशी के लिए, त्याच गाण्याच्या शेवटी आपली ईच्छा असो किंवा नसो, मन मानो वा न मानो काही गोष्टी आपल्याला इतरांच्या आनंदासाठी कराव्या लागतात, आणि आपण त्या इतरांचे देणे लागत असतो अशी स्पष्ट जाणीव लतादिदीचा सुरातून आणि इंदिवर ह्यांच्या शब्दातून आम्हाला झाली. त्यानंतर आम्हाला आमच्या दर्द भरे गीत ऐकणाऱ्या मित्राला काही सांगायची गरज पडली नाही, स्वतः सुद्धा काहीही न बोलता अनेक गोष्टी समजून चुकलो होते, पुढे जीव लागला अश्या मैत्रिणीच्या लग्नात हजर राहून तिला भावी आयुष्यसाठी शुभेच्छा देण्याचे काम आमच्या मित्रपरिवाराने इमाने इतबारे केले हे नमूद करावेसे वाटते. आज आम्ही सर्व मित्र संसार, जीवन ह्यात यशस्वीपणे उभे आहोत त्यामागे सुप्तपणे काम करणारे लता मंगेशकर ह्यांची गाणी आहेत ह्यात शंका नाही.

# अपेक्षांच्या ओझ्याखाली मुलांना दाबू नका



प्रशांत जा. खामकर
९९७०४२३२०४

आधुनिक केसरी

**आज पालक व मुलांमध्ये सुसंवाद राहिला नाही. मुलांच्या ९९ टक्के समस्यांना पालकच जबाबदार असतात. मुलांचे व्यक्तिमत्व विकसित करतात तेच खरे पालक असतात. आपण पालक नसून मालक आहोत, अशी भावना पालकांमध्ये जेव्हा निर्माण होते तेव्हा खऱ्या समस्या निर्माण होतात. आपले मूल अभ्यासातही हुशार असावे. त्याने खेळातही नैपुण्य मिळवावे. त्याने उत्कृष्ट भाषण करावे. त्याचबरोबर त्याला संगीताचेही चांगले ज्ञान असावे. त्याला सुंदर चित्र काढता यावे. तो प्रत्येक क्षेत्रामध्ये अव्वलच यावा अशी अनाठायी अपेक्षा आज बहुतांश पालकांची झालेली आहे. मी डॉक्टर आहे म्हणून माझ्या मुलीनेही डॉक्टर व्हावे.**

मी मोठा नेता आहे म्हणून माझ्या मुलांनीही नेता व्हावे. किंवा माझ्या प्रमाणेच प्राध्यापक, वकील व्हावे. अशा अपेक्षांच्या ओझ्यामध्ये आपले मूल गुदमरून गेले आहे. याची पुसटशी कल्पनाही पालकांना येत नाही.काही पालक मुलांच्या सर्व मागण्यांना होकार देतात. तर, काही पालक मुलांच्या सर्व मागण्यांना इच्छांना नकार देतात. मुलाला अपयश आले तर पालक ते स्वीकारू शकत नाहीत.त्यातून समस्या निर्माण होतात. हल्ली तर पालक 'मार्क्सवादी' झाले आहेत. मुलांच्या मार्कांशी समस्या निगडित आहेत.मात्र सर्वच पालक असे नसतात.

शाळेमध्ये शिक्षक व पालक संघाची स्थापना करावी. त्याद्वारे शिक्षक पालक व विद्यार्थी यांच्या सहविचार सभेचे आयोजन करावे. मुलांमध्ये असलेल्या त्रुटी शिक्षकांनी पालकांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. मुलांमध्ये असलेली चांगली कौशल्ये कशी विकसित करता येतील या दृष्टीने मार्गदर्शन करावे. प्रत्येक मूल गुणवैशिष्ट्यांनी इतरांपेक्षा वेगळे असते याची जाणीव करून द्यावी. पालक व विद्यार्थी यांच्यामध्ये सुसंवाद घडवून आणावा. त्यादृष्टीने तज्ञांची मार्गदर्शनपर ठरणारी व्याख्याने आयोजित करावीत.

आपल्या इच्छा-अपेक्षा पालकांनी मुलांवर लादू नये. मुलांमधील उपजत गुणांचा शोध घ्यावा. त्यांच्या गुणांवर-निकालांवर लक्ष केंद्रीत करण्यापेक्षा त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करावे, निकालात कमी गुण मिळालेल्या विषयाकडे पालकांचे लक्ष प्रथम जाते. मात्र ज्या विषयात जास्त गुण मिळाले त्यावरून सर्वप्रथम कौतुक करणे आवश्यक आहे.

मुलगा-मुलगी दहावी-बारावीत गेल्यावर पालकच तणावाखाली असतात. पालकांमध्येच असुरक्षिततेचे वातावरण असते. पालक म्हणून आपण मुलांवर अपेक्षा लादतो. मी डॉक्टर- इंजिनीअर झालो म्हणून तुही हो.असे पालक सांगतात. पालकांनी मुलांवर अतिरिक्त अपेक्षा टाकू नये, मुलांचा जास्तीत जास्त वेळ आणि सहवास पालकांसोबत असतो. बऱ्याच वेळा आपल्या पाल्याच्या प्रगतीसाठी पालकच गोंधळलेले असतात. अनेक संवेदनशील पालक पुन्हा पुन्हा प्रश्न विचारून स्वतः सोबत शिक्षक आणि विद्यार्थ्यांचाही गोंधळ उडवून देतात. काही पालक अधिकच संवेदनशील तर काही खूपच बेफिकीर असतात, असे दोन्ही प्रकारचे पालक विद्यार्थी घडविण्याच्या प्रक्रियेतील अडथळा ठरू शकतात. त्यामुळे पालकांनीही कोणताही ताण-तणाव न घेता आपल्या मुलांना सतत प्रोत्साहन दिले पाहिजे. येणाऱ्या अडीअडचणींचा सामना करण्यासाठी बळ दिले पाहिजे.

मुलांनी आपल्याला ज्या क्षेत्रामध्ये रुची आहे; त्याची जाणीव आपल्या पालकांना स्पष्ट शब्दांमध्ये करून द्यावी. मनामध्ये कोणत्याही प्रकारचे दडपण ठेवू नये. आपल्या पालकांशी सुसंवाद ठेवावा. एखादा छंद अवश्य जोपासावा. अपयश आले तरीही खचून न जाता, जिद्दीने प्रयत्न करणे कधीही सोडू नये. चांगल्या मित्र-मैत्रिणींची संगत ठेवावी. नियमित पुरेसा व्यायाम करावा. संतुलित आहार घ्यावा. शरीराला आवश्यक व पुरेशी विश्रांती घ्यावी. निर्व्यसनी रहावे. मुलांना जाणून घेण्यासाठी, समजावून घेण्यासाठी त्यांचे ऐकले पाहिजे. त्यांच्या कोणत्या अनुभवाला, विचाराला फालतू म्हणून हेटाळणी करता कामा नये. त्यांचा आनंद कशात आहे ते शोधा. सतत उपदेशाचे डोस देणे कोणाला आवडत नाही. काही गोष्टी कृतीत शिकविता येतात. मुलांमधील क्षमता ओळखून त्यांना त्या दिशेने विकसित करता येऊ शकते. आपल्या इच्छा, आकांशा मुलांसमोर जरूर मांडा. मात्र त्याबाबत आग्रही राहू नका. आपली मुले आपली असली तरी त्यांच्या आवडीनिवडी वेगळ्या असू शकतात. आपली स्वप्ने वेगळी, त्यांची स्वप्न वेगळी असतात. त्यामुळे आपल्या स्वप्नांचे पंख त्यांना लावण्याचे प्रयत्न करता कामा नये. दम दिला, दरडावून बोलले की, मुले ऐकतात.असा काही पालकांचा समज असतो. त्यामुळे मुलांच्या मनाविरूद्धच्या गोष्टी सांगण्यासाठी पालक याचा वापर करतात. मात्र, त्यावेळी मुले जे करतात ते त्यांच्या इच्छेविरूद्ध असते. मुलांना बऱ्या वाईटाची जाणीव करून दिली पाहिजे. मात्र, त्याची पद्धत ही नाही.

मुलांना त्यांची बाजू स्वतः होऊन मांडू दिली पाहिजे. त्यांची जिज्ञासा, त्यांचे कुतूहल जागे होईल असे प्रश्न विचारण्यास मुलांना प्रवृत्त करावे. शाळेतील नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी मुलांच्या मनात गोडी निर्माण करावी.

फक्त मुलांकडून अपेक्षा ठेवण्यापेक्षा त्यांना घडविण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य आपल्या अंगी बाळगण्यासाठी प्रयत्न करणारे पालक आपल्या मुलांना योग्य दिशेने घेऊन जाऊ शकतात. गोडीगुलाबीने मुलांना शिस्त लावता येते. आई-वडिलांचे मुलांशी असणारे नाते मित्र-मैत्रिणीप्रमाणे असले पाहिजे.पालकांनी त्यांची वकिली करण्यापेक्षा त्यांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून मदत केली पाहिजे. सुवर्णमध्य साधून समस्यांवर मात करतो तोच सुजाण पालक असतो. आपल्या अपेक्षांच्या ओझ्यात मुलांना दडपवून टाकण्यापेक्षा, पालकांनी त्यांच्या पंखात बळ देऊन,गगन भरारी घेण्याचे सामर्थ्य निर्माण केले पाहिजे.



# एकाकीपणाचे टॉनिक

आधुनिक केसरी


दिवसेंदिवस माणूस आत्मकेंद्री होऊ लागला आहे. स्वतःच्याच विचारात तो गढून जाऊ लागला आहे. संवाद कमी होऊ लागला आहे. माणूस खरंतर समाजप्रिय आहे पण सामाजिक जबाबदारीतून अलिप्त राहू पहात आहे. सांसारीक जबाबदाऱ्या पार पाडताना थकून जाऊ लागला आहे. त्याला आपल्या मनातील सल कुठेही बोलावसं वाटत नाही त्यामुळे तो एकटा पडू लागला आहे. घरात आल्यावर टिव्ही समोर गप्प बसून राहू लागला आहे. तर स्मार्ट फोनच्या जमान्यात आपलं डोकंच त्या फोन मध्ये घालू लागला आहे. आजुबाजूला काय घडतय याच भान सुद्धा नाहीय. त्यामुळे एकाकीपणा वाढत चालला आहे.



जयेश अर्जुन माधव
संपर्क 9167710614

माणूस फक्त ताण तणावांनी वेढला गेला आहे. अशा जगण्याला काय अर्थ आहे..? आपलं हसणं, बोलणं, एकमेकांत मिसळणं जर होत नसेल तर मित्रांनो ,वेळीच विचार करणं आवश्यक आहे. नाहीतर आयुष्यात एकाकी पणाची भीती आहे .!

शाळेत असताना,कॉलेजमध्ये असताना आपले अनेक मित्र असतात पण एकदा संसारात गुरफटल्यावर आपण कौटुंबिक वातावरणात रमून जातो आणि काही काळ या जुन्या मित्रांपासून दूर जातो. मुले मोठी झाल्यावर ती आपल्या गोष्टींमध्ये रमून जातात. नवरा बायको दोघेच एकमेकांना समजून घेत जगत असतात. अशा वेळी आपले जुने मित्र आपल्या सोबत असतात. आपल्याला एकटे पडू देत नाही. त्यांनाही आपला सहवास हवाहवासा वाटतो आणि आपल्याला त्यांचा! मग शाळा कॉलेजमधल्या मित्रांचे गेटटुगेदर हे टॉनिक बनते,आपलं आयुष्य सुंदर आणि निरोगी बनवण्याचे!



# रमाई आंबेडकर : त्याग व समर्पणाचे महाकाव्य



भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

आधुनिक केसरी

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्नीप्रति कृतज्ञता म्हणून १९४० साली प्रकाशित केलेला 'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा वैचारिक ग्रंथ रमाईला अर्पित केला. अर्पण पत्रिकेत बाबासाहेब म्हणतात, "तिच्या हृदयाचा चांगूलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्य नि माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी, अशा दिवसांत तिने मला दाखविली-जेव्हा मी नशिबाने लादलेला मित्रहीन काळ चिंतेसह कंठीत होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या रामूप्रति कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या आठवणींचे हे प्रतीक." आपल्या पत्नीबद्दलच्या प्रेमभावना बाबासाहेबांच्या या अर्पणपत्रिकेतून व्यक्त होतात.**

रमाईने व्यक्त केलेली बाबासाहेबाप्रतीची कृतज्ञता तर अधिक हृदयस्पर्शी आहे. रमाई म्हणते, "तुम्ही माझे पती आहात या एका सुखापुढे माझी हजार दुखं पार मरून गेली आहेत. कोणीच कोणाला देऊ शकणार नाही एवढे तुम्ही मला दिलेत. तुमच्यासाठी मी काही छोटी दुखं भोगली, पण आता त्यांचा ही केवढा गौरव वाटतो. अशा दुःखाचे अलंकार युगायुगातून एखाद्याच स्त्रीच्या वाट्याला येतात साहेब." रमाई हे कारुण्य व सहनशीलता याचे अजोड शिल्प होती, मूकनायकाची ऊर्जा होती. डॉ.आंबेडकरांच्या सुखदुःखात सहभागी होणारी, त्यांचे जीवन घडवणारी, त्यांना सदोदित प्रोत्साहित करणारी होती. म्हणून बाबासाहेबांसारख्या एका महान क्रांतियोद्धा व युगप्रवर्तकाला घडवणाऱ्या माता रमाईला एक युगनिर्मातीच म्हटलं पाहिजे!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई आंबेडकर यांची आज जयंती. रमाई भीमराव आंबेडकर यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकू धुत्रे व आई रुक्मिणी यांच्यासह रमाबाई दाभोळजवळील वंणदगावात महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना तीन बहिणी व शंकर हा एक भाऊ होता. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकू दाभोळ बंदरात हमालीचे काम करत असत. रमा लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकू यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. सुभेदार रामजी आंबेडकरांना रमा पसंत पडली. रमाई व बाबासाहेबांचा विवाह भायखळ्याच्या भाजी मार्केटमध्ये इ.स. १९०६ मध्ये झाला. विवाहप्रसंगी बाबासाहेबांचे वय १५ वर्षे तर रमाईचे वय ९ वर्षे होते. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला.

इ.स. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. जिद्दीने दुःखांशी, अडचणींशी, गरिबीशी सामोरे जात होती. मृत्युसत्र दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान या साऱ्यांचं अलौकिक रसायन म्हणजेच रमाई. रमाईने अनेक मरणे पाहिली. प्रत्येक मरणाने तीही थोडी थोडी खचत होती परंतु धीर सोडत नव्हती. मरण म्हणजे काय कळत नव्हते त्या वयात आई वडिलांचा मृत्यू. इ.स. १९१३ साली रामजी सुभेदारांचा मृत्यू. इ.स. १९१४ ते १९१७ साली बाबासाहेब अमेरिकेला असताना रमेशचा मृत्यू. ऑगस्ट १९१७ मध्ये बाबांची सावत्र आई जिजाबाईचा मृत्यू. पाठोपाठ रमाईची अत्यंत लाडकी व जीव की प्राण असलेली मुलगी इंदू, बाबांसाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. इ.स. १९२१ बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर व इ.स. १९२६ मध्ये राजरत्नचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दुःखाची झळ पोहचू दिली नाही. बाबासाहेब अमेरिकेला गेले तेव्हा ते रमाईला पत्र लिहून धीर देण्याचा प्रयत्न करतात. ते लिहितात, "रामू, अशा दुःखानी दुःखी व्हायचे नसते. मी वणव्यातून धावण्याची प्रतिज्ञा केली आहे. या शर्यतीत मी जिंकलो तर आपल्या देशाला मी उजेडात उभे करीन. तिथल्या गुलामीची कंबर बांधीन. या लढाईत मी हरणार नाही. यासाठी तू माझ्या पाठीशी उभी राह्यला हवी. रमा दुःखातूनच वाट काढायची आहे." अशा पत्राने रमाईला बाबासाहेबांचा अभिमान वाटत असे आणि जगण्यासाठीचे बळ मिळत असे. बाबासाहेबांना पत्र लिहून रमाई सुद्धा मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचे अभिवचन देऊन बाबासाहेबांचा उत्साह द्विगुणित करण्याचा प्रयत्न करत असे!

धारवाडला बाबासाहेबांचे सहकारी बळवंतराव हनुमंतराव वराळे व त्यांच्या पत्नी राधाबाई हे कुटुंब राहत होते. त्यांच्याकडे बाबासाहेबांचे जाणे येणे होत असे. बाबासाहेबांना तेथील थंड व कोरडे हवामान आरोग्यास उपायकारक वाटत असे. एकदा बाबासाहेबांना परदेशी काही कामानिमित्त जायचे होते. वराळे कुटुंबियांच्या आग्रहाखातर धारवाडला हवापालट होण्यासाठी रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. बळवंतराव वराळे धारवाड मध्ये लहान मुलांचे वसतीगृह चालवत असत. एकदा वराळे लोकल बोर्डाच्या निवडणुकीच्या धामधुमीत व्यस्त असल्यामुळे मुलांचे राशन संपल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. अचानक धान्य संपल्यामुळे व जवळ पैसे नसल्यामुळे ते अस्वस्थ झाले ही अस्वस्थता आपली पत्नी राधाबाई जवळ बोलत असताना रमाईने ते ऐकले व ताबडतोब जवळ असलेले काही पैसे व एक दागिना वराळेंकडे सुपूर्द केला व मुलांच्या जेवणाची सोय ताबडतोब करा असे सांगितले. रमाईचे बोर्डिंगच्या गरीब मुलांसाठीचे हे औदार्य पाहून वराळे कुटुंबीय भावुक झाले. वराळे यांनी ते दागिने घेतले नाही परंतु मुलांच्या जेवणाची त्यांनी कशीबशी सोय केली. त्या मुलांना आनंदाने खेळताना बागडताना पाहून रमाई खूप आनंदी होत असत.(संदर्भःमातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या सहवासात, राधाबाई बळवंतराव वराळे यांचे आत्मचरित्र) डॉ.बाबासाहेब रमाईस प्रेमाने 'रामू' म्हणत असत तर रमाईंनी जन्मभर बाबासाहेबांना आदराने, सन्मानाने 'साहेब' म्हणून संबोधले. बाबासाहेबांचा विवाह जरी रमाई सोबत झाला असला तरी त्यांचा विवाह विद्येशीच झाला आहे कि काय असे वाटत होते. आजन्म विध्यार्थी असल्यासारखे कायम ग्रंथांच्या सान्निध्यात आकंठ डुंबलेले असत तरी रमाई कसलाही त्रागा करून न घेता बाबासाहेबांची सदैव सेवा करीत असे. कर्तव्यदक्ष रमाई अनेकदा त्यांना जेवणासाठी विनंती करत, आग्रह करीत परंतु तरीही बाबासाहेबांना जेवणाचे भान राहत नसे, पतीने जेवण केले नाही म्हणून ही सहचारिणी देखील उपाशी राहत असे. रमाई विषयी बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारत' मध्ये म्हटले आहे, "मी विदेशात असताना तिने रात्रंदिन आपल्या प्रपंचाची काळजी वाहिली व वाहत आहे. रामूने मी विदेशातून परत आल्यावरही विपन्नावस्थेत शेण स्वतःच्या डोक्यावर वाहून नेण्यास मागेपुढे पाहिले नाही अशा अत्यंत ममताळू, सुशील, पूज्य स्त्रीच्या सहवासात मला जास्त वेळ घालवता येत नाही, याचे मला दुःख होते."



स्वभावाने शांत असलेल्या, बोलण्यात विनयशील, गंभीरवृत्तीच्या, प्रकृतीने जेमतेम पण संसारात व्यवहारदक्ष असलेल्या रमाईच्या मनात पतीविषयी अपार श्रद्धा, प्रेम, काळजी होती. जीवनातील कडु-गोड अनुभव घेत रमाई बाबासाहेबांसोबत सांसारिक आयुष्य जगत होत्या. १९२४ पर्यंत त्यांच्या संसाराच्या वेलीवर एकूण पाच अपत्ये फुलली होती. त्यापैकी यशवंत सोडून बाकी सर्व दोन-अडीच वर्षाचे अल्पायुषीच ठरले होते. तीन मुले आणि एक मुलगी काळाने हिरावून नेली. सगळी मुले प्रकृतीने नाजूक होती. मुलगी देखणी होती परंतु अशक्त होती. रमाई मुलीच्या आठवणीने व्याकुळ होत असत इंदू हे नाव मोठ्या हौसेने ठेवलेले होते. छोटा ' राजरत्न' या दाम्पत्यास अत्यंत प्रिय होता परंतु १९ जुलै १९२६ ला न्युमोनिया होऊन त्याचा मृत्यू झाला. तशातच तिच्या आजारपणात आणखी भर पडत होती. तरी ती आजारपणातही स्वतःच्या तब्येतीपेक्षा आपल्या पतीची जास्त काळजी घेत होती. रमाई पतीच्या सुरक्षिततेसाठी उपवास करायची.

रमाईने पंढरपूरला जाऊन विठ्ठल दर्शन घेण्याची इच्छा एकदा बाबासाहेबांसमोर व्यक्त केली; परंतु बाबासाहेबांना माहिती होते की, स्पृश्यांच्या त्या मंदिरात या अस्पृश्य स्त्रीस बाहेरूनच दर्शन घ्यावे लागेल. या संभाव्य अपमानाची कल्पना देऊन रमाईला पंढरपूरला नेण्यास नकार दिला व म्हणाले, "जे पंढरपूर भक्तांना देवाच्या मूर्तीपासून दूर लोटते, त्या पंढरपूरची कथा ती काय? आपल्या उभयतांच्या पुण्याईने स्वार्थ त्यागाने, सेवेने दलितांसाठी आपण दुसरी पंढरी निर्माण करू!' आणि डॉ. आंबेडकरांनी आपल्या अर्धांगिनीच्या अमुल्य सहकार्यने करोडो दलितांच्या जीवनात क्रांती आणली, नागपूरची दीक्षाभूमी ही पंढरपूरपेक्षाही महान क्रांतीभूमी उभी केली!

बाबासाहेब वेरुळची सहल आटोपून मुंबईला परत आले तेव्हा रमाबाईंनी अंथरूण धरले होते त्यांचा आजार १६.१.१९३५ ला बराच वाढला होता. रमाबाईना अनेक डॉक्टरांचे औषधोपचार चालू होते. सतत चार महिने त्यांच्या प्रकृतीत चढउतार होत होता. मे महिन्याच्या २२ तारखेस प्रकृती चिंताजनक असल्याचे जाणवू लागले. त्यावेळी बाबासाहेब पनवेलला मुलांचे वस्तीगृह स्थापन करण्याच्या कामासाठी तेथे जाऊन राहिले होते. बाबासाहेब २४ तारखेस मुंबईस आले. आल्यापासून ते रमाईंच्या जवळ बसून होते. रमाई साहेबांकडे टक लावून बघत होत्या; परंतु त्यांना बोलण्याचे त्राण नव्हते. स्वतः बाबासाहेब रमाईंना औषध देत होते, बशीत कॉफी ओतून त्यांना ती पिण्याचा आग्रह करीत होते. मोसंबीचा रस साहेब स्वतःच्या हाताने आग्रहाने पाजीत होते. रमाई साहेबांच्या आग्रहाखातर थोडेसे घेत मात्र रविवारी तारीख २६ मे,१९३५ ला सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास रमाईंनी डोळे मिटले. त्यांचा श्वास जड होऊन मंदावला. घरातील लोकांनी हंबरडा फोडला. "तू मला सोडून गेलीस तुला मी काही सुख दिले नाही तू माझ्यासाठी खूप खस्ता खाल्ल्यास त्याग केलास" असे म्हणून बाबासाहेब ओकसाबोकसी रडू लागले. त्यांच्या शोकाकुल टाहोने राजगृह व आसपासचे वातावरण शोकसागरात बुडून गेले. (संदर्भः डॉ भीमराव रामजी आंबेडकर चरित्र ग्रंथ खंड ६ व ७, लेखक चां. भ. खैरमोडे)

स्मशानात अग्निसंस्कार झाल्यानंतर पुन्हा साहेबांनी टाहो फोडला. लोकांनी त्यांची समजूत घातली सर्व मंडळी राजगृहात परत आली. तो सर्व दिवस व २६ मेची रात्र साहेबांना पत्नीच्या अनेक आठवणी येऊन दुःखाचे उमाळे येत होते. डोळ्यातून अश्रू ओघळत होते. आप्तेष्टांनी ही त्यांना मनसोक्त रडू दिले कारण यापुढे साहेब आपले हे दुःख कधीच असे प्रकट करू शकले नसते! पहाडासारखा महामानव पत्नीच्या विरहाने ओकसाबोकसी रडत होता! जवळ जवळ तीस वर्षांच्या संसारात प्रेमाने व धैर्याने भक्कम सोबत देणाऱ्या रमाई मध्येच अचानक सोबत सोडून कायमच्या दूर निघून गेल्या आणि बाबासाहेब आपल्या संसारात अगदी एकाकी पडले.

बाबासाहेब १९२३ ते १९२९ काळातील आठवणी काढून गहिवरून म्हणत, "तिने माझ्यासाठी अपार कष्ट सहन केले, उपास केले, एका वस्त्रांनिशी घरात राहिली. मला आमच्या मुलांना वाचवण्यासाठी काही करता आले नाही. मी यापुढे यशवंत, आमच्या एकूलत्या एक मुलासाठी जेवढे करता येईल तेवढे करीन, याला औषधोपचारासाठी लंडनला घेऊन जाईन. १९१३ ते १९२३ या काळात मी माझी बौद्धिक व मानसिक शक्ती वाढविण्यासाठी एखाद्या योग्याच्या निष्ठेने समाजाच्या उन्नतीला आवश्यक असणाऱ्या सर्वांगीन अभ्यासाची समाधी लावली. दररोज वीस-बावीस तास अभ्यास केला, पदव्या मिळविल्या. मी प्रकांड पंडित झालो पण कुटुंबासाठी मी काहीच करू शकलो नाही." अशा प्रकारच्या आठवणींनी बाबासाहेब अक्षरशः घायाळ होत होते. रमाईच्या मृत्यूने त्यांच्या आयुष्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली होती! म्हणून डॉ यशवंत मनोहर आपल्या रमाई कादंबरीत म्हणतात, "रमाई हि केवळ एक व्यक्ती नव्हती. एखादं पात्र नव्हतं. ती केवळ एक स्त्री नव्हती. ते होते मातृत्वाचे महाकाव्य. ती मातृत्वाची मातृमनाची काळजीकथा होती. जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता. रमाई मातृत्वाचं आसवानी बोलणारं मिथ होती." अशा या मातृत्वाच्या महाकाव्याला, अखंड ऊर्जा वाहिनीला तिच्या असीम त्याग व समर्पणाला १२५ व्या जयंती निमित्त कोटी कोटी वंदन! **(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# मनोवेधक गझल : गझल हजारी

आधुनिक केसरी

**शिराज शिकलगार हे ग्रामीण परिसरातील धडाडीचे गझलकार. त्यांच्या गझलांत म्हणी आणि जुन्या जमान्यातील वाक्प्रचाराचा योग्य आणि बेमालूम उपयोग केला आहे. एका गझलेत ते म्हणतात, एकमेकांची किती रे लक्तरे फाडून झाली रेशमाच्या चिंधड्यांचा हा जुना बाजार आहे खरेच ही दुनिया म्हणजे चिंधड्यांचा बाजार आहे. खोटे बोलतो, वागतो त्याची चलती आहे. जुन्या वस्तूंना नवे लेबल लावले की झाले. संयम पाळणे हा आमचा संस्कार आहे.**




जाणतो उपकार करणे पुण्य आहे हे खरे की स्वार्थ मोठा माणसांचा एखाद्यावर उपकार करणे हे पुण्याचेच काम आहे खरे पण त्या बदल्यात दुसऱ्यांकडून अपेक्षा करणे हे कितपत योग्य. किंवा जिथे स्वार्थ तिथेच परोपकार ही भावना काय कामाची. सर्वत्र बाजार वासनांचाच आहे. या वासनेला संस्कारही काहीही करू शकत नाहीत.

ज्या गोष्टी लपवून ठेवायच्या असतात त्या पाहण्याकडे मनाचा कल असतो. त्याकडे निर्देश करणारा हा शेर पाहा.

छुपे पाहण्याचा तया छंद आहे मला फार येते शिसारी मनाची मन हे फार विचित्र असते. मनाने अतिहुशार माणसेच काळी कृत्ये कशी करतात हे भिंतीलाही कान असतात ही म्हण ते गुपित ऐकण्याची सवय माणसाला

जिथे भिंत आहे तेथे कान आहे किती चपखलतेने वापरतात. हे पाहण्यासारखे आहे.

उगी का कुणाचे कुणी श्रेय लाटा विना कर्म करता कुठे मान आहे असा रोकडा सवाल ते जरी करीत असले तरी जगात त्यांचीच चलती असते ना? इथे सर्वत्र वासनेचा बाजार असला तरी माझ्या मनात संयमाचा खोडा असल्याने वासनेचा वारू मी आवरू शकतो, असे ते म्हणतात. वाटेत वासनांच्या अद्याप ना भटकलो पायात संयमाचा तोडा तसाच आहे आपला स्वभाव गोड बोलण्याचाच आहे टोपी बऱ्याच वेळा घालून लोक गेले त्याचा स्वभाव अजुनी गोडा तसाच आहे. म्हणूनच लोक आपल्याला टोपी घालून जातात. वसंत फुलवायचा असेल तर मनात श्रावण जपून ठेवा असे ते सुचवतात. तिचा आणि माझा संसार तडजोडीवर टिकून आहे कारण ती म्हणेल तसे मी करतो. नाते तिचे नि माझे आहे टिकून कारण

वादास एकतर्फी करतो सदा निवारण असे ते म्हणतात. लोकांनी कितीही वाईटपणा जपून ठेवला तरी मी मात्र माझे आचरण नीटच ठेवतो असे ते म्हणतात. त्याचे कारण संस्कार जपण्यांचा त्यांचा स्वभावधर्म आहे. वंचितांना साह्य करणे हाच आपला स्थायीभाव आहे असे ते सांगतात. बाराही महिने लबाडी करू नका असे ते एका गझलेत म्हणतात. अपयशाची घोर चिंता टाळ तू गाठ शिखराचे नव्याने टोक आता असे सुचवून जातात. सोमवारी ही हजल सुरेख आहे. एकंदर ७५ गझलमधून शिकलगार यांनी जीवनविषयक तत्त्वज्ञान मांडले आहे. या पुस्तकाच्या आरंभीच शिकलगार यांनी अनेकांचे आभार मानले आहेत. गझल हजार हा तेरावा गझलसंग्रह आहे. आतापर्यंत त्यांचे आठ कवितासंग्रह आणि १२ गझलसंग्रह प्रकाशित झाले आहेत. दोन वर्षांत त्यांनी हा हजार गझलांचा टप्पा पूर्ण केला आहे. २१ मे १०११ रोजी त्यांचा पहिला गझलसंग्रह प्रकाशित झाला. रोज नवीन शिकणे व लिहीत राहण्याच्या त्यांच्या छंदातून ही पुस्तके निर्माण झाला आहेत. त्यांनी अक्षरगणवृत्ते व मात्रा वृत्ततही लेखन केले आहे. त्यांची एकूण २६ पुस्तके प्रकाशित आहेत. तरीदेखील आपण विद्यार्थीच आहोत, हा त्यांचा भाव मात्र शिकण्याजोगा आहे. हजार गझल लिहूनदेखील त्यांनी म्हटले आहे की,

माहिती आहे मला होणार नाही साध्य केवळ आकड्याने वीर जगती खूप येथे का म्हणावे मीच केले फाकड्याने असाच त्यांचा आविर्भाव आहे. त्यांनी प्रत्येक गझलवर वृत्ताचे नाव त्याच्या मात्रांची संख्या लिहिली आहे. नवलेखकांना त्यांच्याकडून खूप काही शिकण्याजोगे आहे.

**गझल हजार**
**सिराज शिकलगार**
**पृष्ठे १०३, मूल्य २०० रुपये**
**अक्षरदीप प्रकाशन**
**बडनेरा, अमरावती**

**प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**
**(९०११०८२२९९)**

# पाकचा प्रवास अण्वस्त्रांवरून थेट अन्न-वस्त्रांवर

आधुनिक केसरी

**श्रीलंकेतील जनआक्रोशाला कारणीभूत ठरलेली परिस्थिती आज पाकिस्तानात आहे. चीनच्या नादी लागून पाकिस्तान पूर्णतः देशोधडीला लागल्याचे चित्र आहे. पाकिस्तानवर आज जगभरात भिक मागण्याची वेळ आली आहे. ज्या अण्वस्त्रांचा माज पाकिस्तान बाळगून होता त्याच पाकिस्तानचा प्रवास आज अण्वस्त्रांवरून थेट अन्न-वस्त्रावर येऊन पोहोचला आहे. एकीकडे भारत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना आपला शेजारी मात्र पुरता कंगाल झाला आहे. वर्तमानात पाकिस्तान गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहे. देशात गरिबी आणि महागाईने उच्चांक गाठला आहे. बहुसंख्य लोकांना दोन वेळचे अन्नही दुरापास्त आहे. पेट्रोल-डीझेल तीनशेच्या वर तर सिलेंडरचे दर दहा हजारावर गेले आहेत. गहू, तांदूळ, खाद्यतेलाचे भाव गगनाला भिडले असून साठाही संपण्याच्या मार्गावर आहे. रेशनच्या दुकानांसमोर लोकांच्या रांगाच-रांगा लागल्याचे चित्र आहे. देशातील मोठा भाग विजेअभावी अंधारात आहे. औषधांचा प्रचंड तुटवडा आहे.**

देशाच्या तिजोरीतील विदेशी मुद्रा भंडार संपल्यात जमा आहे. पाकिस्तानच्या बंदरावर विदेशातून हजारो मालवाहू कंटेनर येऊन उभे आहेत. मात्र त्यातील माल (वस्तू) सोडविण्याकरीताही पाकिस्तानकडे पैसा नाही.

जागतिक बँकेच्या अहवालानुसार वर्तमानात या देशांवर ६० ट्रिलियन कर्ज आहे. पाकिस्तानची लोकसंख्या २२ कोटीच्या घरात असून आज प्रत्येक पाकिस्तानी व्यक्तीच्या डोक्यावर २ लाख ७२ हजार ७२६ रुपयांचे कर्ज आहे.

आगामी काळात आपल्या या शेजारी राष्ट्रात भूकबळीची संख्याहि वाढू शकते. इतकी दयनीय अवस्था झाली आहे. 'एशियन लाईटच्या' अहवालानुसार निर्मितीपासूनच पाकिस्तान हा भारताचा द्वेष करत आला आहे. आतंकवादाचे समर्थन आणि भारतासोबत युद्ध करण्यातच सारी शक्ती पाकिस्तानने खर्ची घातली आणि दीर्घकालीन आर्थिक विकासावर प्रचंड दुर्लक्ष केले, परिणामतः देश आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत गेला. दिवाळखोरीच्या वाटेवर असलेल्या पाकिस्तानची सारी मदार आता एखाद्या बेलआऊट पॅकेजवर आहे. याकरिता पाकिस्तानने 'आंतरराष्ट्रीय मुद्रा कोशाकडे' हात पसरले आहे. 'आंतरराष्ट्रीय मुद्रा कोश' (आय.एम.एफ.) जगभरातील गरजू राष्ट्रांना स्वस्त दरात कर्ज देत असते. १९४४ मध्ये या कोशाची स्थापना झाली होती. पाकिस्तान १९५० पासून याचा सदस्य बनला. १९० सदस्य देशांची मिळून ही संस्था बनली आहे. प्रत्येक सदस्य राष्ट्र आपआपल्या कुवतीप्रमाणे या कोषात योगदान देत असतो. श्रीमंत राष्ट्राकडून अधिक निधी घेतला जातो. सध्या पाकिस्तानची पूर्ण मदार या संस्थेवर आहे. यापूर्वी पाकिस्तानने चोवीस वेळा या संस्थेकडून कर्ज घेतले आहे. मात्र या वेळेला आय.एम.एफने अनेक कठोर नियम लावले आहेत. जे मान्य करणे पाकिस्तानला शक्य नसतानाही पाकिस्तानी पंतप्रधान शाहबाज शरीफ त्यास तयार झाले आहे. यापूर्वी सत्तेवर आलेल्या प्रत्येकच पाकिस्तानी सरकारने या संस्थेकडून मदत प्राप्त केली आहे. १९५८ मध्ये सर्वप्रथम पाकिस्तानने अडीच कोटी अमेरिकन डॉलरची मदत प्राप्त केली होती. ती परंपरा आजतागायत कायम आहे.

चीन, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरात हे चीनचे खास मित्र मानले जातात मात्र पाकिस्तान गंभीर आर्थिक संकटात सापडला असताना या मित्र राष्ट्रांकडून पाकिस्तानला तात्काळ मदत प्राप्त होताना दिसून येत नाही आहे. सौदी अरब पाकिस्तानला मदत करतील असे वक्तव्य पाकच्या अर्थमंत्र्यांकडून वारंवार येत आहेत. मात्र अशी कुठलीही मदत अद्यापपर्यंत पाकिस्तानला प्राप्त झाली नाही. पाकिस्तान सध्या आय.एम.एफसोबत चर्चा करीत असल्याने आधी पाकिस्तानने ही चर्चा संपवावी नंतर आम्ही विचार करू, असे मित्र राष्ट्रांकडून सांगण्यात आले आहे. याचे कारण सुद्धा तसेच आहे. आय.एम.एफच्या परवानगीशिवाय कोणताही देश इतर गरजू राष्ट्रांना मदत करू शकत नाही, असा अलिखित नियमच सध्या अस्तित्वात आहे. तरीसुद्धा सौदीचे प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी पाकिस्तानची बुडती आर्थिक नौका पैलतीरी लावण्याकरिता मदतीची घोषणा केली आहे. यांतर्गत पाकिस्तानातील वर्तमान गुंतवणूक एक अरब डॉलरवरून दहा अरब डॉलरपर्यंत वाढवण्याची तयारी त्यांनी दाखविली आहे. यासोबतच पाकिस्तानवर यापूर्वीचे असलेले ४.३ अरब डॉलरचे कर्ज फेडण्याची तारीखही वाढवून दिली आहे. सौदी पाकिस्तानवर इतका मेहरबान असण्याचे कारण म्हणजे सुन्नीबहुल देश सौदी आणि शियाबहुल देश इराण यांच्यामध्ये अरब राष्ट्रावर वर्चस्वासाठी सतत चढाओढ सुरू असते.



हे दोन्ही देश एकमेकांचे कट्टर वैरी आहे. पाकिस्तान हा इस्लामिक राष्ट्रांमध्ये एकमेव अण्वस्त्र संपन्न देश असल्याने प्रसंगी पाकिस्तान आपल्याला परमाणु शस्त्रांची मदत करू शकतो, असा विश्वास सौदिला आहे. आज घडीला सौदीमध्ये पाकिस्तानचे ६३ हजार सैनिक तैनात आहे. सौदी सैन्यांना पाकिस्तान प्रशिक्षणही देत असतो.

**आर्थिक संकटांची कारणे**

वर्तमान स्थितीत पाकिस्तानवर जे आर्थिक संकट ओढावले आहे त्याचे कारण पाकिस्तानचा अदुरदर्शीपणा आणि चुकीच्या योजना यामध्ये दडले आहे. आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य आणि गैरविकासात्मक योजनांच्या अंमलबजावणीमुळे पाकिस्तान या दुर्गतीला पोहोचला आहे. 'ग्वादर-काश्घर' रेल्वेलाईन उपक्रमावर पाकिस्तानने अवास्तव खर्च केला. यासाठी बाहेरून कर्ज उभारण्यात आले. 'चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर' (सीपीईसी) ही आणखी एक योजना. 'पाकिस्तानी-चिनी, भाई-भाईचा' साक्षात्कार झालेल्या पाकिस्तानवर या योजनेमुळे विदेशी कर्जाचा बोजा वाढला. या एका योजनेमुळे पाकिस्तानवर ७० बिलियन अमेरिकी डॉलरचे कर्ज झाले. ही योजना अजूनही पूर्णत्वास गेली नाही. २०१९-२० या एका वर्षात चीनच्या तीन अब्ज डॉलरच्या कर्जावर पाकिस्तानने तब्बल १२० दशलक्ष डॉलर इतके व्याज चीनला दिले आहे. मुद्दल अजूनही बाकीच आहे. या एका उदाहरणावरून पाकिस्तानवरील विदेशी कर्जाची स्थिती लक्षात येते. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत पाकिस्तानी रुपयांमध्ये सतत होत असलेल्या घसरणीमुळे पाकिस्तानवर विदेशी कर्जाचा बोजा वाढला. 'आंतरराष्ट्रीय वित्तीय रेटिंग एजन्सीने' पाकिस्तानची रँकिंग कमी दाखवल्याने पाकिस्तानातील विदेशी गुंतवणूक थांबली. अनेक राष्ट्रांनी पाकिस्तानला मदत देणे थांबविले. कर्ज-परतफेड, पुन्हा कर्ज या दुष्टचक्रात पाकिस्तान रुतून बसला आहे. पाकिस्तानची निर्यात कमी आणि आयात अधिक आहे. त्यातच कोविड संकटात पाकिस्तानची निर्यातपण थांबली होती. डाळ, गहू, खाद्यतेल, साखर यासह अन्य महत्त्वपूर्ण वस्तूंची आयात पाकिस्तान करीत असतो. यामध्ये मोठ्या प्रमाणात पाकिस्तानला विदेशी मुद्रेचा वापर करावा लागतो. अशातच मागील काही वर्षात विजेचे दर प्रचंड वाढल्याने सामान्य नागरिकांवर खर्चाचा दबाव वाढला आहे. पाकिस्तानातील राजकीय नेत्यांचे आणि श्रीमंतांचे विलासी जीवन हे सुद्धा एक कारण यामागे आहे. पाकिस्तानातील अनेक राजकारणी आणि श्रीमंत आजही नवाबी मानसिकतेत वावरतात. त्यांच्यासाठी महागड्या आणि लक्झरी वस्तूंच्या आयाती करिता पाकिस्तानला मोठा खर्च करावा लागतो. पाकिस्तानामध्ये दरवर्षी विशेष लोकांना कर प्रणालीमध्ये सूट देण्यात येते. ही सूट तब्बल १७ बिलियन अमेरिकन डॉलर इतकी असते. पाकिस्तानची अर्थव्यवस्था डबघाईस जाण्याचे हे प्रमुख कारण मानले जाते. भरीसभर रशिया आणि युक्रेन युद्ध या देशातील महागाई वाढवण्यास कारणीभूत ठरले आहे. अशातच २०२२ मध्ये जून ते ऑक्टोबर या दरम्यान झालेल्या महापुराने या देशातील साडे तीन कोटी लोक लोक प्रभावित झाले होते तर तीस बिलियन डॉलरचे नुकसान झाले होते. यासह इतरही अनेक कारणांमुळे पाकिस्तान भिकेस लागला आहे. विदेशी मदतीच्या बळावर पाकिस्तान या संकटातून तरुणही जाईल, मात्र चुकीचे आर्थिक धोरणे आणि भारत द्वेषामुळे आपण या थराला येऊन पोहोचलो, हे सत्य पाकिस्तानने स्वीकारणे त्यांच्या हिताचे ठरणार आहे.

**डॉ. संतोष संभाजी डाखरे, ८२७५२९१५९६**



संध्या सिनकर
संपर्क क्र. 9920740645

# एकटीचा सफरनामा

आधुनिक केसरी


**जगप्रसिद्ध मंगेशकर कुटुंबात जन्म घेतलेल्या डॉ. राधा मंगेशकर यांनी संगीताच्या व्यासंगा बरोबर भ्रमंतीचा छंदही जोपासला आहे. त्यांनी तत्त्वज्ञानात डॉक्टरेट केले आहे. लहानपणापासून त्या प्रवास करत आहेत. लहानपणी त्यांनी त्यांचे वडील पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्याबरोबर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवास केला. दीदी लता मंगेशकर यांच्याबरोबर परदेशातही भरपूर प्रवास केला आहे. त्यांना त्यांचा प्रवास केव्हा सुरू झाला आहे आठवत नाही. पण लहानपणीचा प्रवास आठवताना त्यांना आठवतात नव्या जागा, नवीन शहरे, नवे लोक, कधी गाडी, कधी रेल्वे तर कधी विमानाने केलेला प्रवास. काही दिवस प्रवास केला नाही तर आपण अस्वस्थ असतो हे त्यांच्या लक्षात आलं आणि तेव्हापासूनच त्यांचा स्वतंत्र, स्वतःसाठी, स्वतः केलेला एकटीचा सफरनामा सुरू झाला.**

डॉ. राधा ह्या चिंतनशील, विचारशील व अभ्यासू गायिका आहेत. तसंच त्या ऐतिहासिक स्थळांना भेट देताना भरपूर अभ्यास करून जातात. निसर्गाकडे, कलेकडे पाहण्याची त्यांची एक वेगळी नजर आहे. प्रवास हा आता त्यांचा छंद झाला आहे.

त्यांनी सोलो ट्रॅव्हलिंग करायचं ठरवले आणि मुक्त भ्रमंतीसाठी पंख पसरण्याचे परवानगी व प्रोत्साहन त्यांना त्यांच्या आई-बाबांनी दिले.

प्रवासात वेगवेगळे अनुभव येतात. नवनवीन माहिती मिळते. विविध संस्कृती, लोक, निसर्ग व परंपरा यांच्याकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन तयार होतो. प्रवासामुळे सहनशीलता वाढते. राधा मंगेशकर म्हणतात, प्रवासातील अनुभव महत्त्वाचे असतात. तुमच्या मनाला, बुद्धीला, विचार शक्तीला ते प्रोत्साहित करतात आणि तुम्ही माणूस म्हणून विकसित होत जाता. राधा मंगेशकर यांनी स्वतंत्र एकटीने भ्रमंती सुरू केल्यावर त्यांच्या लक्षात आलं की त्यांना स्वतःची कंपनी आवडते आहे. प्रवासातील वेगवेगळ्या अनुभवानी त्या स्वतंत्र व निर्भय झाल्या. त्यांच्या आत्मविश्वास, क्षमता, ताकद यांची त्यांना जाणीव झाली. एकटीच सफरनामा असे अर्थवाही व आकर्षक नाव असलेल्या पुस्तकाच्या देखणेपणात वेगवेगळ्या ठिकाणच्या रंगीत चित्रांनी व प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला असलेल्या कृष्णधवल चित्रांनी भर टाकली आहे. पुस्तकात राधा मंगेशकर यांनी अजंठा, खजुराहो, शांतीनिकेतन आदी अनेक ठिकाणी केलेल्या भ्रमंतीचे अनुभव आहेतच पण पशुपक्ष्यांबद्दल झाले ते आम्हा सोयरे खाद्य संस्कृती विषयी खाता रहे मेरा दिल असे वाचनीय लेख आहेत. खजुराहो येथील मंदिरे एक हजार वर्षे जुनी आहेत. ही मंदिरे राजा यशोवर्मन यांच्या कार्यकाळात निर्माण व्हायला सुरुवात झाली. तेथे हिंदू व जैन धर्मियांची मंदिरे आहेत. हिंदू मंदिरांमध्ये शिव, विष्णू, सूर्य आणि शाक्त परंपरेतील मंदिरे आहेत. ही मंदिरे द्रविड आणि नागरशैलीतील आहे. मंदिराच्या प्रत्येक तुकड्यात अद्वितीय शिल्पकला दिसते. ही शिल्पे देवी, देवतांची आणि मानवाचे जीवनातील घटनांची आहेत.

खजुराहो मधील प्रत्येक मंदिर पूर्वाभिमुख आहे. प्रत्येक मंदिराला व्यासपीठ, मंच आहे. मध्यभागी असलेल्या मुख्य मंदिरात महामंडप आहे. मंडप व गर्भगृहावर शिखर स्थापित आहे. खजुराहो मध्ये फुले, भूमितीय कला, प्राणी, स्त्री पुरुष प्रणय, राजा, त्याचे सैन्य, व्यापार, शिक्षण, पुराण कथा अशी अनेक शिल्पे आहेत. शिल्पा मधील स्त्री स्वतःतच रमलेली, सुंदर, धीट व आनंदी दिसते. राधाजीना खजुराहोतील अवकाशाची संकल्पना व समुद्र मंथन ही दोन शिल्पे अतिशय अवघड, वेगळी वाटली. आणि अतिशय आवडली. खजुराहो मध्ये वराह अवताराचे भव्य शिल्प आहे आणि वराहाच्या अंगावर तपशीलवारपणे समुद्रमंथनांचे शिल्प आहे. शार्दुल ह्या शिल्पा मध्ये शरीर सिंहाचे, मस्तक कधी घोडा, पोपट किंवा हत्तीचे आहे. त्याच्या पायाशी असलेला पुरुष त्याच्याशी लढत आहे. त्याच्या मस्तकाजवळ दुसरा पुरुष आहे. राधाजी म्हणतात शार्दुल हे आपल्या इच्छा, महत्त्वकांक्षांचे प्रतीक आहे. या महत्त्वाकांक्षांवर, इच्छांवर विजय मिळवून त्यांना आपल्या नियंत्रणात ठेवा असा संदेश शार्दुल शिल्प आपल्याला देते. खजुराहो मधील ८५ मंदिरांपैकी फक्त ११ मंदिरे सुस्थितीत आहेत. खजुराहो मंदिर बघून राधा मंगेशकर अंतर्मुख झाले झाल्या. मंदिरासारखे आयुष्य ही सुंदर बनवावे व त्याच्या खोलात, अंतरात ईश्वर असावा असं त्यांना वाटलं. राधाजीनी जैन धर्माच्या धर्मीयांच्या बाहुबलीचेही दर्शन घेतले. बाहुबली हे पहिले तीर्थकर ऋषभनाथ यांचे पुत्र. बाहूबली आणि त्यांचे मोठे बंधू चक्रवर्ती भरत यांच्यात युद्ध झाले. ही लढाई तीन दिवस चालली.





त्यात बाहुबली विजय ठरले. विजयानंतर त्यांच्यात वैराग्य भावना उत्पन्न झाली. त्यांनी राज्याचा, सुखसोयींचा व वस्त्रांचाही त्याग केला आणि दिगंबर अवस्थेत सरळ ताठ उभे राहून ध्यानाला सुरुवात केली. वर्षभराने वेली त्यांच्या अंगावर चढू लागल्या. शरीराभोवती वारुळे निर्माण झाली. तरी त्यांचे ध्यान भंग झाले नाही आणि त्यांना कैवल्य ज्ञानाची प्राप्ती झाली. या अवस्थेचे वर्णन करणारी मूर्ती डोंगरावर दगडामध्ये कोरलेली आहे. चेहऱ्यावर शांत भाव आहेत. डोळे उघडे आहेत. केस कुरळे, जाड, रुंद खांदे आहेत. हात सरळ गुडघ्यापर्यंत आहेत. मूर्तीच्या मांडीपर्यंत आधार आहे, त्यानंतर आधार नाही. पायाशी वारूळ व त्यातून बाहेर पडणारे साप यांचे चित्रण आहे. पायापासून वर हातापर्यंत वेलींचे चित्रण आहे. राधाजी म्हणतात मूर्तीकडे बघून वाटतं की वारूळ, सर्प व वेली हे भौतिक जगाचे प्रतिक आहेत. हे सर्व आपल्याभोवतीचे माया, मोह आहे. मूर्तीच्या उजव्या पायाशी द्रविड लिपी तर डाव्या पायाशी देवनागरीत लिहिले आहे.

राधाजींच्या चित्रमय शैलीमुळे बाहुबलीची मूर्ती आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. वाचकांनाही बाहुबलीचे दर्शन घ्यायला आकर्षित करते. राधाजीनी वेगवेगळ्या वयात तीन वेळा अजंठा लेणी पाहिली. वयाच्या चौदाव्या वर्षी त्यांनी पहिल्यांदा अजंठा लेणी पहिली. ती कला पाहून त्या आकर्षित झाल्या. अजंठा लेणी पाहताना त्यांच्या लक्षात आले की सर्व रंगीत चित्रे, दृश्य जातक कथांवर आधारित आहेत. त्यांनी जातक कथांचा अभ्यास केला. जातक म्हणजे जन्मापासून. सर्व जातक कथा या बुद्धाने पूर्वीच्या जन्मात अनेक प्राण्यांच्या रूपात देखील जन्म घेतला यावर आधारित आहेत. जीवनाचे वास्तव स्वरूप दाखवणाऱ्या या कथांमध्ये बुद्ध सिंह, माकड, हत्ती कोंबडा या रूपात जास्त वेळा आहे. या कथांमध्ये सर्व प्राणी मानवासारखा विचार करतात. बुद्ध साहित्यांत जातक कथा या करुणा, अनुकंपा व भावनिक बाजू सांगतात. जातक कथांमध्ये बुद्धाला बोधिसत्व म्हणतात. बोधिसत्व हा दयाळू व अनुकंपा असलेला बुद्ध आहे. तो पुढच्या जन्मात बुद्ध बनणार अशी कल्पना आहे. राधाजीनी दुसऱ्यांदा अजंठा लेणी सत्तावीसाव्या वर्षी पाहिली. तेव्हा त्यांचा बुद्ध वास्तुकला, बुध्द चित्रकला व बुद्ध स्थापत्य कला याचा अभ्यास झाला होता. त्या म्हणतात त्यामुळे ती चित्र जिवंत झाली व त्यांच्या बरोबर बोलू लागली. उच्च शिक्षण घेतल्यावर, पीएचडीची तयारी करत असताना पस्तीसाव्या वर्षी त्यांनी परत अजंठा पाहिले. तेव्हा जीवनाचा, समाजातील लोकांचा त्यांना अनुभव आला होता. अजंठाला गेल्यावर त्यांना एक वेगळ्या प्रकारची शांती लाभली. त्यांनी अजंठा मधल्या महत्त्वाच्या सात लेण्यांचं केलेलं तपशीलवार वर्णन पुस्तकात वाचण्यासारखे आहे. राधा मंगेशकर यांची शैली सहज, चित्रमयी व प्रसन्न आहे. पुस्तक वाचताना शिल्पे, चित्रे डोळ्यासमोर उभी राहतात. त्यांच्या अभ्यासाची व चिंतनाची प्रचिती येते.

# ॲड. अण्णासाहेब देशमुख: आभाळाची उंची अन दूरदृष्टी असलेलं नेतृत्व

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केल्या नंतरही अजूनही कैक गावातील महिलांच्या डोक्यावरील हंडे खाली उतरले नसल्याचे चित्र राज्यात सर्वत्र दिसत असतांना त्या काळात शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी ठोस पाऊले उचलणारा आणि त्यादृष्टीने दूरदृष्टी ठेवून राष्ट्रमाता जीजाऊ माँ साहेब यांच्या नावाने  विदर्भातील पहिला सहकारी साखर कारखाना उभा करणारा, सर्वसामान्यांच्या मुला-मुलींना शिक्षण मिळावं म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्था उभी करणारा, शेतकऱ्यांची पत असावी म्हणून जिल्हा सहकारी बँक उभारणारा,आभाळाएव्हडी उंची आणि दूरदृष्टी असणारा नेता म्हणून आज देखील स्व ॲड. अण्णासाहेब देशमुख यांच्या कडे आदराने बघितल्या जाते.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

शेलगाव देशमुख सारख्या छोट्याश्या गावातील ॲड. शंकरराव उर्फ अण्णासाहेब देशमुख या सर्वसामान्य कुटुंबातील माणसाने आपल्या विदवत्तेच्या बळावर राजकारणात-समाजकारणात,सहकारात आणि शैक्षणिक क्षेत्रात अद्वितीय स्थान मिळविले. वाकचातुर्य, करारीबाणा, धूर्त राजकारणी आणि विकासाची नजर असलेला नेता आज ५ दशकानंतर देखील लोकांच्या कायम लक्षात राहतो,आणि आज देखील त्यांनी केलेले कार्य आजची पिढी बघते आहे,हेच त्या नेतृत्वाचे मोठे यश राहले आहे. मातृतीर्थ बुलडाणा जिल्ह्यातील शेतकरी समृद्ध व्हावा,त्याचा सर्वांगीण विकास व्हावा हा हेतू नजरेसमोर ठेवून या महामानवाने विदर्भातील पहिला सहकारी साखर कारखाना दुसरबीड सारख्या पूर्णे लगत असलेल्या ठिकाणी  सुरू केला. अण्णासाहेब देशमुख यांनी सुरू केलेला सहकारी साखर कारखाना नंतरच्या नेत्यांना वाचवता आला नाही,हे एक फार मोठे दुर्दैव म्हणावे लागेल.  अण्णासाहेब देशमुख यांनी बुलढाणा जिल्हा सहकारी बँक उभी केली. त्याच बँकेत माजी मंत्री आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांचे वडील सहकार महर्षी स्व भास्करराव शिंगणे नोकरी करत होते.नंतर स्व भास्करराव शिंगणे त्याच बँकेचे अध्यक्ष झाले.  मेहकर व इतर ठिकाणच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. अण्णासाहेब देशमुख हे होत. त्यांनी त्याकाळी डोणगाव (१९५२), लोणार (१९५३), मेहकर (१९५८), किंनगाव जट्टू ( १९५७ ), सुल्तानपूर(१९६५), साखरखेर्डा (१९६५) जाम्भोरा (१९६५) उंद्री(१९६८), कळमेश्वर(१९७०),लव्हाळा( १९७१) ह्या ठिकाणी श्री शिवाजी विद्यालय सुरू केले. सिंदखेडराजा येथे जिजामाता  विद्यालय(१९६०), सोनाटी येथे मधुकरराव चौधरी विद्यालय (१९७२), तर दुसरबीड येथे १९७२ ला शंकरराव देशमुख विद्यालयाची स्थापना केली. त्यानंतर शिवाजी शिक्षण संस्था माजी आमदार भाऊसाहेब लोढे यांच्या ताब्यात गेली तर इतर संस्था इतरांच्या ताब्यात गेल्या. आपल्या भागातील कष्टकरी, शेतकरी,शेतमजूर आणि सर्वसामान्यांची मुले शिकली पाहिजेत, मोठी झाली पाहिजेत,ज्ञानी झाली पाहिजेत हाच हेतू नजरेसमोर ठेवून ह्या भागात या माणसाने शिक्षणाची गंगोत्री आणली. शिक्षणाची गंगोत्री आणतांना मेहकर येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानाच्या निर्मितीत देखील अण्णासाहेब देशमुख यांचा महत्वाचा वाटा आहे.  ४ फेब्रुवारी १९१२ रोजी जन्मलेले ऍड शंकरराव उपाख्य अण्णासाहेब हे १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आले.तसा त्यांचा मेहकर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याचा काळ १९५७ ते १९६७ चा.ऍड अण्णासाहेब देशमुख हे काँग्रेस चे आमदार जरी असले तरीही सुरुवातीला ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे आकर्षिल्या गेले होते.संघाच्या शिबिरात त्यांनी शारीरिक आणि बौद्धिक प्रशिक्षणही घेतले होते.विदर्भात संघाचे संघटन मजबूत होते. संघाशी असलेल्या संबंधाची त्यांना त्याकाळी किंमत देखील मोजावी लागली.३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधी यांची हत्या झाली,आणि त्यावेळी अण्णासाहेब यांना एका महिन्याचा कारावास देखील भोगावा लागला होता.मात्र त्यानंतर ऍड अण्णासाहेब देशमुख यांनी संघाशी असलेला आपला संबंध तोडून टाकला आणि जनचळवळी च्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाशी त्यांची नाळ जुळली. शेकाप ला श्रमिक जनतेचा व्यापक पाठिंबा होता. आणि अण्णासाहेब देशमुख यांचे नेतृत्व सर्वमान्य होते.१९५१-५२ ची निवडणूक त्यांनी शेकाप कडून लढविली. त्यावेळी त्यांचा पराभव झाला मात्र हा पराभव वेगळ्या कारणाने झालेला होता. त्यावेळी मेहकर मतदारसंघ हा द्वि मतदार संघ होता.एकाच वेळी सर्वसाधारण आणि राखीव असे दोन उमेदवार निवडल्या जायचे.



एकाच पक्षाकडून असलेल्या दोन्हीही उमेदवारांचे चिन्ह एकच असायचे पण मतपेट्या वेगळ्या असायच्या.जुंपलेल्या बैलगाडीचा खटारा हे निवडणूक चिन्ह होते. राखीव उमेदवारांची मतपेटी अगोदर होती आणि त्या चिन्हावर वर्तुळ होते.ग्रामीण भागातील मतदारांनी अण्णासाहेब देशमुख यांची निशाणी समजून केल्या मतदान केल्या गेले.  असाच गोंधळ इतर मतदारसंघात देखील झाला व ह्याच गोंधळात अण्णासाहेब यांचा पराभव झाल्याचे बोलल्या जाते. अण्णासाहेब देशमुख यांची लोकप्रियता वाढतीच होती आणि नंतर ते १९५७ व १९६२ च्या निवडणुकीत विजयी झाले व सलग १० वर्ष मेहकर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले.   अण्णासाहेब देशमुख हे चाणाक्ष असल्याने त्यांनी सभागृहात देखील आपला ठसा उमटविला होता. महाराष्ट्र राज्याच्या आंदोलनात देखील त्यांना कारावास झालेला होता.आपले मेहकर येथील काका विठ्ठलराव देशमुख यांना दत्तक गेलेले अण्णासाहेब देशमुख यांनी स्वकर्तृत्वावर राजकारणात आपला दबदबा निर्माण केला.स्व अण्णासाहेब देशमुख यांचे सुपुत्र स्व प्रकाशराव देशमुख हे देखील त्याकाळी थेट जनतेतून निवडून येत मेहकर नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून विजयी झाले होते.नंतर मात्र त्यांच्या परिवारात राजकारणात कुणी फारसे पुढे आले नाही. त्याकाळी समाजभूषण स्व आयाजी पाटील यांचे समाजकारणात चांगलेच वजन होते. त्यांच्याच शब्दावर स्व अण्णासाहेब देशमुख यांनी ७ ते ८ शाखेचा विस्तार असणारी श्री शिवाजी शिक्षण संस्था सी. चि. उर्फ भाऊसाहेब लोढे यांच्याकडे सुपूर्द केली. १९६२ ला जिल्हा बँकेची स्थापना केल्या पासून मृत्यू पर्यंत ते बँकेचे अध्यक्ष होते.अण्णासाहेबांनी अनेक पदे उपभोगली.१९६८ ते ७० या काळात महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन चे उपाध्यक्ष,याच काळात जिजामाता सहकारी साखर कारखान्याची उभारणी,श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून मेहकर, लोणार, सिंदखेडराजा भागात स्थापना, मेहकर नगर परिषदेचे उपाध्यक्ष,जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष-कोषाध्यक्ष,महाराष्ट्र साखर कारखाना संघाचे संचालक,डेक्कन शुगर टेकनोलॉजी असोसिएशनचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक,अशी विविध पदे त्यांनी भूषविली,त्या पदांना न्याय दिला.प्रचंड विदवत्ता, बुद्धीचातुर्य,धुर्तपणा, ह्या बळावर त्यांनी नेतृत्व करत असतांना विधायक राजकारणाला महत्व दिले. मात्र विकासाची जाण असलेल्या या नेतृत्वाचा करुणअंत एका अपघातात झाला. १८ मार्च १९७८ रोजी मुंबई वरून मेहकर कडे येत असतांना औरंगाबाद नजीक शेकटा फाट्याजवळ त्यांच्या कार ला अपघात झाला आणि या अपघातात वयाच्या ६६ व्या वर्षी त्यांचे अपघाती निधन झाले. अण्णासाहेब देशमुख यांना जाऊन ५० वर्ष होत आले आहेत. मात्र आज देखील त्यांनी केलेले काम त्यांच्या अफाट कार्यशैलीची साक्ष देतात. ४ फेब्रुवारी २०२३ ला त्यांची १११ वी जयंती साजरी झाली. आजची पिढी देखील त्यांच्या भरीव कार्यापूढे नतमस्तक होते आहे,ही एक चांगली गोष्ट आहे मात्र ज्या दुसरबीड येथील पुतळ्या समोर ही जयंती साजरी झाली तो पुतळा  स्व अण्णासाहेब देशमुख यांनी उभारलेल्या जिजामाता सहकारी साखर कारखाना परिसरात आहे.स्व अण्णासाहेब देशमुख यांनी ज्या तळमळीतून विदर्भातील पहिला साखर कारखाना सुरू केला तो मागील २०-२५ वर्षापासून  बंद आहे.ह्या कारखान्याची गोड साखर अनेकांनी चाखली, मात्र हा कारखाना सुरळीत सुरू व्हावा यासाठी झाले ते केवळ राजकारणच; राजकारणापलीकडे काहीही केल्या गेले नाही. जिल्ह्याला भरभरून देणाऱ्या या नेत्यांची मृत्यूनंतर झाली ती केवळ उपेक्षाच !

***किस्मत बुरी,या मैं बुरा***
***ईसका फैसला न हुवा***
***मैं तो सबका हो गया***
***मगर मेरा कोई न हुवा***

# भांडवलशाहीचं कृषी प्रदर्शन



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**आज प्रत्येक क्षेत्रात भांडवलशाहीचे वर्चस्व पाहायला मिळत आहे.ज्याच्या कडे जास्त भांडवल त्याचीच मक्तेदारी उदयास येत आहे. त्याच भांडवलातून प्रत्येक ठिकाणी आपणच असले पाहिजे.अशी मानसिकता आपोआपच तयार होत असते.आज हीच मानसिकता सोबत घेऊन प्रत्येक क्षेत्रावर भांडवलशाहीकडून हुकूमत गाजविली जात आहे.भारत हा कृषी प्रधान देश आहे.असे म्हणायचे अन त्याच देशात कृषीला फुलविणाऱ्या सर्वसामान्य शेतकऱ्यास मात्र डावलले जाते.त्यास आजही जगण्यासाठी संघर्ष करावं लागत आहे.कृषीप्रधान असलेल्या आपल्याच देशात सर्वसामान्य शेतकऱ्याची अशी दशा पाहायला मिळते.हे सुद्धा आपल्याच देशासाठी लाजीरवाणी गोष्ट आहे.**

भांडवलशाहीने वर्चस्व निर्माण केलेल्या या वर्चस्ववादी दुनियेत सर्वसामान्य शेतकऱ्याचा विचार होणार तरी कसा ? कमी भांडवलात जास्त उत्पन्न घेण्याचा प्रयत्न सर्वसामान्य शेतकऱ्यांकडून केला जात असतो.परंतु त्यास हे उत्पन्न मिळवित असताना अनेक संकटांना सामोरे जावे लागत असते. सर्वसामान्य शेतकरी कधी दुष्काळ, कधी अवकाळी पाऊस आणि कधी योग्य दर न मिळाल्याने त्याची अवस्था जणू दुष्काळात तेरावा महिना अशीच होत असते.पाण्याची उपलब्धता कमी जास्त प्रमाणात असणे, घेतलेले बी बियाणे व औषध फवारणी करण्यापासून ते उत्पादन शेतातून घेईपर्यंत आणि डोक्यावर असलेला कर्जाचा डोंगर फेडे पर्यंत सगळं कमावलेले त्यातच तर निघून गेलेले असते.

भांडवलात कमी पडलेला सर्वसामान्य शेतकरी जर शेतीत नुकसान झालेच तर नव्याने उभारी घेणार तर कशी ? आधीच भांडवल हे कर्ज स्वरूपात घेतलेले असते.त्यात अशा अडचणी उदभवल्यास तसेही हा सर्वसामान्य शेतकरी जास्त कमवून बसलेला असतोच असे ही नाही.परंतु अशा अनेक शेतकऱ्यांची परिस्थिती अशी सुध्दा असते की जेव्हा उगवेल तेव्हाच अन्नाचा कण हा घरात येत असतो.असा सर्वसामान्य शेतकरी ना मोठा भांडवलदार आहे.ना तो इथल्या भांडवलशाहीचा घटक बनू शकतो.सर्वसामान्य शेतकऱ्यासाठी कृषी प्रदर्शन तर लांबचीच गोष्ट आहे. मुळातच कृषी प्रदर्शन हे भांडवलशाहीचेच प्रतिनिधित्व करणारे असते असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाहीच. ज्याच्या कडे भांडवल उपलब्ध तोच कृषी प्रदर्शनाचा अविभाज्य घटक बनू शकतो.सर्वसामान्य शेतकरी म्हणून जास्त भांडवल गुंतवून एक मोठा गुंतवणूकदार व भांडवलदार होण्याची चिन्हेच धूसर आहेत.असा सर्वसामान्य शेतकरी आणि या शेतकऱ्यास विकसित करण्यासाठी व त्यांना बळकटी आणण्यासाठी कृषी प्रदर्शन नावाचे व सर्वांना आकर्षित करणारे हे आकर्षणवादी सोहळे काही करणार आहेत की नाहीत ? की नुसताच प्रदर्शनातून माल ओढत राहणार आहेत.हे कृषी प्रदर्शन, हे कृषी सोहळे नाहीत तर सर्वसामान्य शेतकऱ्यास अजुन मातीत गाडून टाकणारे सोहळे आहेत.कृषी प्रदर्शन हे भांडवलशाहीकडून सर्वसामान्य शेतकऱ्यास हिणविण्याचा प्रकारच आहे. जिथे सर्वसामान्य शेतकऱ्यांचा विचारच केला जाणार नाही.तिथे हे कृषी प्रदर्शन फक्त इथल्या भांडवली व्यवस्थेला पोसणारेच आहे.असे म्हणताच येऊ शकते.

सर्वसामान्य शेतकरी आणि मोठा भांडवलदार यांच्या मध्ये समतावादी तुलना होणार तरी कशी ? ह्या भांडवलशाहीच्या जगात सर्वसामान्य शेतकरी टिकणार तरी कसा ?सर्वसामान्य शेतकऱ्याने भांडवलदारांच्या बरोबरीने स्पर्धेत उतरणे हे शक्यच नाही.जे आधीच सक्षम झालेले आहेत.त्यांच्या बरोबरीने उभे राहणे म्हणजे सर्वसामान्य शेतकऱ्याला आपले भांडवल तर वाढवावेच लागणार आहे.

सर्वसामान्य शेतकरी जेव्हा मोठा भांडवलदार होईल तेव्हाच तो कृषी प्रदर्शनाचा घटक बनू शकतो. परंतु सर्वसामान्य शेतकऱ्याची काय अवस्था आहे ? ह्या अवस्थेस सुधारणारी ध्येय धोरणे कुठे गेली आहेत ? का फक्त भांडवलदार आणि भांडवलशाहीच पुढे घेऊन जाण्याचा वसा जपला जात असतो. हे असेच चालत राहिले तर सर्वसामान्य शेतकरी आताच्या आधुनिक युगात पुढे येणार तरी कसा ?



सर्वसामान्य शेतकऱ्याने नव्या आधुनिक तंत्रज्ञानाचा घटक बनावे की नाही ? शेतीवर अवलंबून असलेल्या प्रत्येक सर्वसामान्य शेतकऱ्यास आपला विकास साधण्यासाठी तसेच शेती फुलविता फुलविता स्वतःचे जिवन फुलविण्यासाठी बरोबरीच्या स्पर्धेत उतरावेच लागेल. ही संधी सर्वसामान्य शेतकऱ्यास उलब्ध होत असताना त्याचे हात बळकट करण्याची जबाबदारी कृषी प्रदर्शनावर सुद्धा तितकीच आहे.कृषी प्रदर्शनाने नुसते पैसे कमवायचे नसतात तर त्यातून सर्वसामान्य शेतकऱ्याच्या मदतीला हा पैसा कामी आला पाहिजे. आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या घरात सुखाचे दिवस येण्यासाठी व त्यांना आर्थिक मदत देऊ करण्यासाठी हात पुढे आले पाहीजेत. वर्षभर सर्वसामान्य शेतकऱ्यांस येत असलेल्या अडीअडचणी सोडविण्यासाठी झटले पाहिजे.सर्वसामान्य शेतकरी दत्तक घेऊन तो जोपर्यंत सक्षम होत नाही तोपर्यंत त्यास मदत करणारा हात त्याच्या साठीच पुढे आला पाहिजे. होय सर्वसामान्य शेतकरी म्हणून इथल्या सर्वसामान्य शेतकऱ्यास सुद्धा हया भांडवलशाहीच्या स्पर्धेत उतरायचे आहे.तो सुद्धा एक मोठा भांडवलदार आणि गुंतवणूकदार बनला पाहिजे.

भांडवलशाहितीतील प्रगत झालेल्या लोकांचे हे प्रॉडक्ट आणि त्यांची जाहिरात करणारा हा प्रदर्शनातील बाजार सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या दृष्टीने कसलाच उपयोगाचा नसतो.नवे तंत्रज्ञान आणि नवी माहिती शेतकऱ्यांना कृषी प्रदर्शन देत असले तरी अशा तंत्रज्ञानाचा खरच शेतकऱ्यांना फायदा होतो का ? कृषी प्रदर्शनात सहभागी झालेले तंत्रज्ञान आणि विविध कंपन्यांची बी बियाणे औषधे शंभर टक्के खात्रीशीर असतातच का ? शेतकऱ्यांच्या शेतात एखादया चुकीच्या बी बियाणे किंवा औषधा मुळे सुद्धा शेतकऱ्यांची शेती फसत असते.यावर सुद्धा लक्ष जाणे आवश्यक आहे.त्यांचीच जाहिरात आणि त्यांचेच प्रॉडक्टस हेच तर भांडवलशाहीचे मजबूतीकरण कृषी प्रदर्शनातून पाहायला मिळत असते.भांडवलशाहीच्या कृषी प्रदर्शनातून ना सर्वसामान्य शेतकऱ्यांचे हित ना त्यांच्या जीवनाला घडविण्यासाठी विशेष नियोजन बद्ध कार्यक्रम आखला जात असतो.

कृषी प्रदर्शन हे सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी नव्हे तर भांडवलशाहिलाच मजबूत करणारे प्रदर्शन बनत चालले आहे.जी काही कृषी प्रदर्शने सर्वसामान्य शेतकऱ्यांचा विचार करत असतील अशा कृषी प्रदर्शनाबद्दल कौतुक असायला हवेच.परंतु ज्या प्रदर्शनातून भांडवलशाहीला अजून मजबूत केले जात आहे.अशी कृषी प्रदर्शने भांडवलशाहीचीच आहे.हे असेच म्हणावे लागेल.

# भटक्या समाजाची भटकंती कधी थांबणार



प्रा.बाळासाहेब बोराडे

आधुनिक केसरी

**देशात विविध भटक्या जमाती आहेत. त्यापैकीच नाथजोगी समाज आहे. हा समाज महाराष्ट्रातील विविध प्रदेशात विखुरलेला आहे.अनेक जिल्ह्यात नाथजोगी समाजाच्या वस्त्या आढळतात.हा समाज भटकंती करणारा समाज म्हणून ओळखला जातो.भिक्षुकी हा त्यांचा मुख्य व्यवसाय.अज्ञान आणि परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित असणार नाथजोगी समाज विकास प्रवाहापासून कोसो दूर आहे.अन्न, वस्त्र,निवारा,आरोग्य,शिक्षण या मूलभूत गरजांसाठी त्यांच्या जीवन संघर्ष चालू आहे. करणारा आहे.**

नुकताच आपण 'आझादी का अमृत महोत्सव' साजरा केला. डिजिटल इंडिया, मेक इन इंडियाच्या माध्यमातून भारत महासत्ता होण्याची स्वप्नं पहात आहे.परंतु वास्तव चित्र विदारक आहे. अजूनही भटक्या समाजाचे जीवन काळोखमय आहे.
हे जळजळीत वास्तव सत्य आहे. समाजातील शेवटच्या घटकांच्या सर्वांगीण विकासाशिवाय भारत महासत्ता कसा बनेल हा प्रश्न भारतीय समाजाला आणि राजकीय पुढाऱ्यांना निरुत्तर

नाथ संप्रदाय हा भारतातील एक महत्त्वपूर्ण अध्यात्मिक संप्रदाय म्हणून ओळखला जातो. भारतीय संस्कृतीशी या समाजाची नाळ जडलेली आहे.हा संप्रदाय देशाच्या विविध भागात विखुरला आहे.मच्छिंद्रनाथ यांनी या समाजाची स्थापना केल्याचे म्हटले जाते.म्हणून हा समाज नवनाथांना आदर्श व गुरुस्थानी मानणारा आहे.

भिक्षुकी हा नाथजोगी समाजाचा मूळ व्यवसाय. गावोगावी भटकंती करून आपला उदरनिर्वाह चालवतात.कालांतराने प्रवाहानुसार समाजाने व्यवसायात बदल केल्याचे दिसून येते.त्यामुळे आजमितीला हा समाज इतरही व्यवसाय करत असल्याचे दिसून येते.पोटाची खळगी भरण्यासाठी आज इथे तर उद्या तिथे अशी भटकंती करावी लागते म्हणून नाथजोगी समाजाची भटका समाज म्हणून ओळख आहे.

नाथजोगी समाज शिक्षणापासून कोसो दूर आहे.कुटुंबातील सदस्यांच्या गरजा भागविण्यासाठी महाराष्ट्रभर भ्रमंती करावी लागते.त्यामुळे समाजाचे एका ठिकाणी वास्तव्य नसते.म्हणून नाथजोगी समाजातील मुलं शिक्षणापासून वंचित राहतात. आजही या समाजात शिक्षण घेणाऱ्या मुलांचे प्रमाण अत्यल्प आहे. शिक्षणआणि व्यवसायिक कौशल्याचा अभाव या कारणाने वर्षानुवर्षेपासून हा समाज शासन दरबारी दुर्लक्षित राहिला आहे.सरकारी दप्तरी या समाजाचा टक्का फारच अत्यल्प आहे.मागील पंच्याहत्तर वर्षात आपण या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणू शकलो नाही हे सत्य आपणास नाकारता येणार नाही.शासनाने या समाजाचा भटक्या जमाती समावेश केला आहे.तरी नोकरी आणि व्यवसायात या समाजाचे नगण्य स्थान आहे. त्यामुळे या समाजाला अनेक समस्यांचा सामना करावा लागतो आहे. हा समाज स्थिर का होऊ शकला नाही किंवा भटकंती का करतो याचे मुख्य कारण म्हणजे भूमिहीनता.नाथजोगी समाज भूमिहीन असल्या कारणाने त्यास पोटापाण्यासाठी गावोगावी भटकंती करावी लागते.व्यवसाय कौशल्य निर्माण करणाऱ्या विकास संस्था अद्यापही त्यांच्यापर्यंत पोहचल्या नाहीत. या समाजातील तरुणांना इतर व्यवसाय करण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे आर्थिक भांडवल नसते.त्यामुळे उपजीविकेसाठी शासनाकडून कायमस्वरूपी जमीन मिळावी अशी मागणी नाथजोगी सामाजिक संघटनेकडून वारंवार केली जात आहे.

अनेकवेळा समाजावर अन्याय होत असल्याच्या घटना घडत असतात.गैरसमज पसरवले जातात. चोरी किंवा लुटेरुच्या अफवेतून कित्येकदा समाजावर प्राण घातक हल्ले झाल्याच्या घटना घडल्या आहेत.त्या जखमा आजही भळभळत आहेत.यामध्ये कित्येकांना आपला जीवही गमवावा लागला आहे.चुकीच्या पद्धतीने पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाल्याने हा समाज कायद्याच्या कचाट्यात भरडला जात आहे .त्यामुळे आधीच दारिद्र्यात खितपत पडलेला नाथजोगी समाज गुन्हेगारीच्या खोट्या जाळ्यात गोवला जातोय ही समाजव्यवस्थेची शोकांतिका आहे.

नाथजोगी समाजास पक्की घरे नाहीत.शासनाची घरकुल योजना अद्यापही त्यांच्यापर्यंत पोहचली नाही. समाजाच्या वाट्याला पालवरचं जिणे जगावं लागतय.हक्काचं घर मिळावं यासाठी त्यांचा संघर्ष चालू आहे.समाजाचे उत्पन्न कमी असल्याकारणाने या समाजाच्या आर्थिक स्थिती फारच कमकुवत आहे. कसेबसे धंद्यावर पोट भरते.शिल्लक काहीच राहत नाही.म्हणून या समाजाला अनेक संकटाचा सामना करावा लागतो आहे.सामाजिक, शैक्षणिक,आरोग्य आणि आर्थिकदृष्ट्या नाथजोगी समाज आजही मागास आहे.नाथजोगी समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शासन दरबारी प्रयत्न व्हायला हवे.शासनाच्या जनकल्याणकारी योजना गरिबांच्या झोपडीपर्यंत पोहचल्या तरच बलशाली भारताचे स्वप्न पूर्ण होईल.



# सहकार्याचा महामेरू : अष्टपैलू शिक्षक राजेश्वर अम्मावार



दुशांत बाबुराव निमकर
संपर्क क्र. 9765548949

आधुनिक केसरी

**"खऱ्याला खरं नि खोट्याला खोटं म्हणणं म्हणजे शिक्षण" ही शिकवण ज्ञानज्योती सवित्रीमाईंनी दिली.अगदी त्याच धर्तीवर विद्यार्थ्यांना बालवयातच संस्कार मिळावेत यासाठी धडपडणारे उपक्रमशील, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक म्हणून राजेश्वर अम्मावार सर यांचा उल्लेख करावा लागेल.लहान बालकांना समजण्यासाठी कसं शिकवावं याचे प्रात्यक्षिक त्यांच्याकडून घ्यावे वाटते.शिक्षकी पेशात रममाण होऊन विद्यार्थ्यांना भावी पिढी घडविण्याचे सर्वोत्तम कार्य शिक्षकांकडूनच होत असते त्यामुळे इतर शिक्षकांना प्रेरणा मिळेल, असे सहकार्याचे महामेरू म्हटलं तर वावगे वाटणार नाहीच.एखाद्या कार्यात स्वतःला झोकून देऊन तन-मन-धनाने सहकारवृत्ती जोपासून कार्य सिद्धीत नेण्याचे धाडस त्यांच्या नसानसात भिनलेले आहे. आज त्यांचा जन्मदिवस या निमित्याने त्यांच्या व्यतिरेखेत ठासून भरलेले गुण लिहिण्याचा हा प्रपंच. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षणासाठी पैसा नसल्याने कापड दुकानात दररोज दहा रुपये याप्रमाणे मासिक तीनशे रुपये मिळणारे काम करून शिक्षण घेतले.वडील व्यसनाच्या अधीन असल्याने १२ व्या वर्गात शिकत असतांना मृत पावले त्यामुळे वडिलांचा दीर्घकाळ सहवास लाभू शकला नाही.**

कौटुंबिक स्थिती लक्षात घेतली तर आई पेपर मिलच्या सफाई व्यवसायात ठेकेदारीत कामावर होती. त्यांच्या खांद्यावर दोन मुलांचा व एका मुलीचा सांभाळ करून शिक्षणाचा भार पेलवत नव्हताच मुळी.त्यामुळे मोठे भाऊ या नात्याने संसारात मदत करण्याच्या उदात्त हेतूने दुकानात पार्ट टाईम जॉब केले.त्याकाळी ट्युशन लावायला पैसे नसल्याने विजय लेनगुरे या शिक्षकांनी विनाशुल्क ट्युशनला येण्याचे सांगून मदत केली. वर्गात हुशार असून देखील आर्थिक बाजू कमकुवत असल्याने पुढील शिक्षण घेऊ शकत नव्हते. त्याकाळी एक म्हण होती की,"मागता येत नसेल भीक,तर मास्तरकी शीक" म्हणून चंद्रपूर येथे डी.एड करून शिक्षकांची पवित्र नोकरी धारण केली. विद्यार्थी घडविण्याचा ध्यास आणि अध्यापन हाच श्वास समजून आधुनिक पद्धतीने ज्ञानाचे बाळकडू बालकांना देत असतात. प्रथमतः पोंभुरणा तालुक्यातील चेक ठानेवासना, चिमनाहेटी, लिखितवाडा व सध्या भंगाराम तळोधी शाळेत कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना विविध उपक्रमातून बोलतं करण्याचे यथोचित कार्य इमानेइतबारे करीत असतात. चिमनाहेटी लिखितवाडा या शाळेचा चेहरामोहरा बदलविण्यात मोलाची भूमिका स्व. प्रदीप कोहपरे यांच्या मार्गदर्शनाखाली राजेश्वर अम्मावार सरांनी पार पाडली त्यामुळे शाळेतील गुणवत्ता व इतर बाबीमुळे २०१६ सालाचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

शिक्षण हे प्रवाही माध्यम आहे. शिक्षणात होणारे निरनिराळे बदलाला सामोरे जात ज्ञानरचनावादी अध्यापन पद्धतीने बालक शिकू शकतो हा आशावाद सदैव बाळगणारा हाडा-मासाचा शिक्षक म्हणता येईल. तिथून बदली झाल्यानंतर भंगाराम तळोधी या त्यांच्या स्वगावी शाळेत रुजू झालेत. गोंडपीपरी तालुक्यातील पटसंख्येने अधिक असलेली एकमेव शाळा म्हणजे भंगाराम तळोधी होय. दरवर्षी नवोदय विद्यालयात त्या शाळेतील विद्यार्थी पात्र होत असतात. मागील वर्षी देखील त्यांच्या मेहनतीने यश संपादन झाले. नवोपक्रम शाळेत राबवून विद्यार्थ्यांना काव्याच्या प्रांतात पदार्पण करण्याची सुसंधी निर्माण करण्याची कल्पना त्यांनी आखली. साहित्यात नसून देखील आवड,ओढ या नात्याने सदैव सावली बनून ज्येष्ठ मार्गदर्शक बंधू म्हणून माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. शाळेत काव्यसमेलन आयोजित करून विद्यार्थ्यांच्या बालकविता एखाद्या कविमनाच्या व्यक्तीला लाजवेल अश्या असल्याने "शब्दांकूर" प्रातिनिधिक बालकविता संग्रह काढण्यात मोलाची भूमिका त्यांनी वठविली आहे.कोणतीही तमा न बाळगता विद्यार्थ्यांच्या काव्य रचनेचे पुस्तक तयार होण्यासाठी रात्र जागून पूर्ण केले.जीवन गौरव मासिकाच्या वर्धापन दिनी (१३ जानेवारी २०२०) औरंगाबाद येथे प्रकाशित करण्यात आले. त्यात सहसंपादकाची कामगिरी सरांनी पार पाडली. तदनंतर कोरोनाने हाहाकार माजविला. सर्व शाळा बंद पडल्या. शाळेतील विद्यार्थी अध्ययनासाठी



चाचपडू लागले. अश्यावेळी वॉट्सअप्पच्या माध्यमातून ऑनलाइन शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याची योजना नावीन्यपूर्णच! सातत्याने सकारात्मक मूल्याची पेरणी करणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते.आभाळाखालच्या मातीत मेंढपाळ हा व्यवसाय करून जिणं जगणारी त्यांची जमात आहे. त्यामुळे आपला समाज व समाजातील लेकरं शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सदा प्रयत्नरत असतात. आपण ज्या मातीत जन्माला आलो त्या मातीशी नाळ तुटायला नको म्हणून समाज ऋण फेडण्यासाठी झटत असतात.
इतरांना सहकार्य करतांना नानाविध कल्पनेचा भांडार डोक्यात चालतच असतो. शैक्षणिक, सामजिक, साहित्यिक, आरोग्य क्षेत्रात इतरांना प्रोत्साहित करण्यासाठी "शब्दांकुर फाउंडेशन" या संस्थेची स्थापना करण्यात आली आणि त्यात सचिव म्हणून कार्यरत आहे.खरं तर शिक्षक हाच समाज व विद्यार्थ्यांना बांधणारा एक दुवा आहे.
आज माझ्यासाठी आनंदाची व अभिमानाची बाब आहे की, मी त्यांच्या शाळेत आहो. मला ज्या-ज्या वेळी सहकार्य लागत असेल त्या त्या वेळी क्षणाचाही विलंब न लावता मदतीला धावत असतात. माझ्याच बाबतीत नाहीतर इतर व्यक्तींच्या मदतीला सदैव तयार असणारे आगळेवेगळे रसायन आहे.स्वतः आपल्या घरचे काम बाजूला सारून तर कधी धर्मपत्नीच्या विरोधात जाऊन स्तुत्य कार्य करण्यास धजावत असतात.त्यांच्या पत्नी सौ.रेणूताई प्रत्येक शैक्षणिक कार्यात सहभागी होतात. इतरांसाठी झटणाऱ्या व्यक्तीला ईश्वर काहीही कमी पडू देत नाही.त्यांच्या संसारिक जीवनात दोन सुंदर फुले उमलली आहेत. घरी व शाळेत देखील कमी कालावधीत विद्यार्थ्यांच्या गळ्यातील ताईत झालेले अम्मावार सर आहेत.

विद्यार्थ्यांना अध्यापन करतांना शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी आग्रही भूमिका असते. महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समिती शाखा गोंडपीपरीच्या कोषाध्यक्ष, कार्याध्यक्ष पदी राहून प्रामाणिकपणे कार्य केले आहे.शाळेत असतांना देखील कोणतीही डाक बनवीत असतांना अचूक व्हावी हाच अट्टाहास असतो.मी अनुभवलेला पडद्याआड राहून सूक्ष्म निरीक्षण करणारे निरीक्षणकारच आहे. स्वतःला दुसऱ्याच्या कामात झोकून देण्याची वृत्ती ही वाखाण्याजोगी आहे.शाळेत विविध कार्यक्रम आयोजित करणे, इतरांचा सत्कार सोहळा करण्यासाठी पुढाकार घेणे, विदर्भस्तरीय मराठी कविसंमेलन आयोजित करणे हे कार्य मी स्वतः अनुभवलेले असल्याने सहकार्याचा महामेरुच म्हटलं तर चुकीचे होणार नाहीच. तसेच आमच्या भंगाराम तळोधी केंद्राचे केंद्रप्रमुख सुनील मुत्यालवार सर यांची बदली झाल्याने केंद्राचा प्रभार माझ्याकडे आला. त्यामुळे तंत्रस्नेही शिक्षक म्हणून केंद्रप्रमुखाचा अप्रत्यक्ष भार त्यांनी सोसला. त्यातून उतराई होणे शक्य नाही. अनुभवातून चिंतन करून शिकता येते हा त्यांच्या मुखातून पडलेले शब्द मला भावले.सध्या प्राथमिक शिक्षक पतपुरवठा पतसंस्थेत संचालक पदासाठी उमेदवार आहेत. ते नक्कीच निवडून येतील अशी आशा बाळगतो. आपली सहकार्यवृत्ती वाढीस लागावी, पुरस्कार मला नको, माझ्या माणसांना द्या अशी भूमिका ठेवणारे राजेश्वर अम्मावार सरांना दीर्घायुषी लाभो!!हीच वाढदिवसानिमित्य सुयश चिंतितो!!!!

# जनतेच्या सहकार्यातूनच विकासाला नवी दिशा : अप्पर जिल्हाधिकारी डॉ. काळे

आधुनिक केसरी न्यूज



**सेलू :** एक प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करताना अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. विविध प्रसंगांना समोरे जावे लागते. या मध्ये राजकीय नेतृत्वासोबतच जनतेचे प्रेम, स्नेह आणि सहकार्य महत्त्वाचे ठरते. परिसराच्या प्रगतीसाठीही पोषक वातावरण निर्माण होऊन, विकासाला नवी दिशा मिळत असते, असे मत परभणीचे अप्पर जिल्हाधिकारी डॉ.प्रताप काळे यांनी व्यक्त केले.

सेलू (जि.परभणी) येथील विनोद बोराडे मित्रमंडळाच्या वतीने शनिवारी (४ फेब्रुवारी) अधिकारी व सामाजिक संस्था पदाधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी सत्काराला उत्तर देतांना डॉ.प्रताप काळे बोलत होते. अध्यक्षस्थानी यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मुकेशराव बोराडे होते. या वेळी उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, सत्कारमूर्ती डॉ.प्रताप काळे, मुख्याधिकारी देविदास जाधव, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त महात्मा गांधी सेवा संघाचे अध्यक्ष शशीकांत देशपांडे, सचिव विजय कान्हेकर; तसेच तहसीलदार दिनेश झांपले, जिंतूरचे तहसीलदार सखाराम मांडवगडे, संयोजक माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे, प्राचार्य.डॉ.शरद कुलकर्णी, प्रशांत थारकर, अनिकेत पालेपवाड, ज्योत्सना काळे, विमल देशपांडे, भाग्यश्री कान्हेकर, भाग्यश्री जाधव, विजया बोराडे, उर्मिला बोराडे, साईराज बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.आठवणींना उजाळा देत डॉ.प्रताप काळे म्हणाले, की सेलूशी माझे जिव्हाळ्याचे नाते आहे. येथील सव्वा चार वर्षाची उपविभागीय अधिकारी म्हणून बजावलेली सेवा कायम संस्मरणीय ठरणारी आहे. या मातीतील माणसांमध्ये स्नेहसंबंधाची संस्कृती रुजलेली आहे. इथे जो माणूस राहतो,तो सेलूकरांशी कायम नाळ जोडून राहतो. या शहराच्या विकासामध्ये सर्वच राजकीय नेतृत्वांचा, जनतेचा सहभाग आहे. भविष्यातही सेलूच्या विकासाकरिता प्रशासकीयस्तरावरून मला जी मदत करणे शक्य आहे. ती निश्चितपणे करण्याचा ग्वाही काळे यांनी या वेळी दिली. विजय कान्हेकर यांनी सेलू परिसरात सहिष्णू वातावरण असल्याचे नमूद करून, महात्मा गांधी सेवा संघाच्यावतीने दिव्यांगांचे जगण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या वेळी डॉ.प्रताप काळे, देविदास जाधव, शशीकांत देशपांडे, विजय कान्हेकर यांचा दाम्पत्यांचा सन्मान करण्यात आला. सेलू इंडस्ट्रिअल ओनर्स असोसिएशन, सेलू नागरी सहकारी पतसंस्था व विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांतर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक विनोद बोराडे यांनी केले. सूत्रसंचालन सुभाष मोहकरे, तर गिरीश लोडाया यांनी आभार मानले. यानिमित्ताने महागायक मोहंमद आयाज वाद्यवृंदाचा कार्यक्रम झाला. उद्योजक जयप्रकाश बिहाणी, डॉ.संजय रोडगे, रामेश्वर राठी, प्रभुदयाल मंत्री, सर्जेराव लहाने, मुकुंद आष्टीकर यांच्यासह विविध संस्थाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते, कार्यक्रमासाठी मारोती चव्हाण, प्रभाकर सुरवसे, राजेंद्र पवार, अशोक कासार, रामप्रसाद गोरे आदींसह विनोद बोराडे मित्रमंडळाने पुढाकार घेतला.

# दोन चिमुकल्यांचा खून करणारी आई अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरातील सादात नगरात काल सकाळी ११च्या सुमारास आईने रागाच्या भरात तिच्या दोन मुलांचा गळा दाबून खून केला. याप्रकरणी सातारा पोलिसांनी आज पहाटे ४ वा. मुलांच्या आईला अटक केली आहे.. या खुनाचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसल्याची माहिती पोलीस उपायुक्त शिलवन्त नांदेडकर यांनी दिली.





आलिया फाहाद बसरावी (२२) रा. सादातनगर असे अटक केलेल्या आईचे नाव आहे तर आदिबा (६) व अली (४) फाहाद आली बसरावी अशी खून झालेल्या मुलांची नावे आहेत . काल सकाळी ११ च्या सुमारास आरोपी आलियाचे दीर सालेबीन हुसेन बसरावी (३१) यांच्या हा प्रकार लक्षात आला. आरोपी आलिया ही तिच्या मुलांसोबत खोलीमध्ये बसली होती. त्यांनी मुलांना आवाज दिला पण मुले प्रतिसाद देत नव्हती म्हणून त्यांनी आलियाच्या खोलीचा दरवाजा वाजवला. बराच वेळ दरवाजा उघडत नव्हता. शेवटी आलियाने दरवाजा उघडल्या नंतर सालेबीन यांना मुले बेशुधद अवस्थेत आढळून आली. त्यांनी ताबडतोब मुलांना खासगी दवाखान्यात नेले तेथून घाटी रुग्णालयात नेले. तेथील डॉक्टरांनी दुपारी २वा तपासून मयत घोषित केले. तोपर्यंत मयत मुलांच्या कुटुंबियांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. त्यानंतर संध्याकाळी ६ वा. दोन्ही मुलांचे शवविच्छेदन झाल्यावर त्यांचा गळा दाबून खून केल्याचा अहवाल प्राप्त होताच आलियाला अटक केली. 'बस कर दिया' एवढेच उत्तर आरोपी आई पोलिसांना देत आहे. पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक मुळे करत आहेत.

# रमाईचा त्याग महिलांसाठी प्रेरणा : भंतेजी वंगीस

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बाबासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्या प्रत्येक कार्याला समर्थपणे साथ देणाऱ्या रमाईंचा त्याग सर्व परिचित आहे. त्यांचा त्याग आजच्या महिलांसाठी प्रेरणा असल्याचे प्रतिपादन भंतेजी वंगीस यांनी केले. शिवशंकर कॉलनी येथे आयोजित रमाईंच्या १२५ व्या जंयतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. शिवशंकर कॉलनी येथे रमाईंची १२५ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात बुध्द वंदनेने झाली. जमलेल्या महिलांनी पुष्पहार अर्पन करुन वंदन केले. या प्रसंगी भंतेजी वंगीस यांनी उपस्थिताना रमाईंच्या जिवनावर प्रकाश टाकणाऱ्या काही घटना सांगितल्या. लहानपणीच आई वडीलाचे छत्र हरवलेल्या रमाई संबध आयुष्य धीट पणे जगल्या. बाबासाहेबांनी समाजासाठी नव्हे तर जनतेसाठी केलेल्या प्रत्येक आंदोलनात त्यांची साथ दिली. त्यांच्या कोणत्याच कार्यात त्या आडव्या आल्या नसल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे आयोजक ॲड. किरण ढेपे, अमर जाधव, सिध्दार्थ मोकळे, अजय जोगदंडे, मुक्ता ढेपे, संगिता सरदार, इंदूमती जोगदंड, आशिष रोकडे, राहूल सरदार, अखील बलबीर, अशोक काळे, अश्चिनी जोगदंडे, सुरेश मोकळे आदींनी केले.





# 'होल्डिंग हँड्स'ला पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** चांगल्या कामाची दखल घेत दैनिक आरोग्य जागृती व आरोग्य जागृती असोसिएट तर्फे शासकीय कॅन्सर हॉस्पिटल चे डॉ. अरविंद गायकवाड, प्रभारी अधिष्ठाता, सिग्मा हॉस्पिटलचे डॉ. उन्मेष टाकळकर, डॉ. राजन व जे. जे. प्लस हॉस्पिटलचे डॉ. जीवन राजपूत यांच्या हस्ते सन्मान पत्र देऊन होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्थेला गौरविण्यात आले.

सुरेश सिरसीकर संस्थापक व अध्यक्ष असलेल्या औरंगाबादची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था ही देश पातळीवर काम करीत असून दिल्ली, पंजाब, गोवा व कर्नाटकात या संस्थेच्या शाखा आहेत. ही संस्था आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले अनेक उपक्रम राज्य व राज्याबाहेर राबवित असते. करोना मध्ये हया संस्थेने चांगले काम केले असून या संस्थेने करोनामध्ये लोकांच्या मानसिक आरोग्यासाठी देश पातळीवर समूपदेशन केले आहे, यात हजारो लोकांनी याचा लाभ घेतला आहे तसेच अन्न धान्य वाटप ही केले आहे. गरजू लोकांना रेशन मिळवून देण्याचा प्रयत्न या संस्थेने केला आहे.

या पुरस्कार कार्यक्रमाचे प्रास्ताविक दैनिक आरोग्य जागृती व आरोग्य जागृती असोसिएटचे संचालक डॉ. शेख अफसर यांनी केले. यावेळी डॉ. अरविंद गायकवाड व डॉ. उन्मेष टाकळकर यांनी कॅन्सर बाबत जास्तीत जास्त जागृती करून या वाढत्या आजारावर आळा घालण्यासाठी सर्वकष प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी रवींद्र बनकर, अपर्णा मेहता, प्रतिभा शर्मा, प्राची सिरसीकर, सोनिया कुलकर्णी, अविनाश वाघमारे, प्रदीप कोल्हे, शेख यासीन आदीचीं उपस्थिती होती.

# रेल्वे ब्रीजखालील लिकेज काढा अन्यथा आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** शहरातील इंदिरा गांधी चौकातील रेल्वे ब्रिज खालून गेलेली पाणी पुरवठा असणारी पाईपलाईन किंवा ड्रेनेजची पाईप लिकेज झाली असून त्यामुळे तेथे वारंवार पाणी साचून चिखल तयार होत आहे. याचा परिणाम दररोज 20 ते 25 मोटारसायकल स्लीप होवून दुचाकीधारक नागरिक घसरून पडत आहेत. यामुळे नागरिकांना शारीरिक इजा होण्याचे प्रकार वाढले आहेत. तरी सदर ठिकाणचे लवकरात लवकर पाईपचे लिकेज न काढण्यास कॉंग्रेस पक्षाच्यावतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल अशा इशारा कॉंग्रेसचे नेते अमर सुर्यवंशी यांनी पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे दिलेला आहे. यावेळी गणेश पांडुरंग माने, समीर कोळी, शंकर सुरवसे, शिवाजी धोत्रे, कृष्णा दशरथ कवडे, सागर शरद कदम, राजाराम गायकवाड, श्रीकांत माने, अमर गडम, बाळासाहेब आसबे यांच्यासह कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कॉंग्रेसचे नेते अमर सुर्यवंशी म्हणाले



की, इंदिरा गांधी चौकातील रेल्वे ब्रिज खालील लिकेजची समस्या गेल्या अनेक दिवसांपासून सतावत असून याकडे नगरपरिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देवून या लिकेजच्या पाण्यामुळे नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण होवू नये यासाठी तात्काळ अंमलबजावणी करावी व यावर लगेच तोडगा काढावा अशी मागणी केली.

# बस-ट्रकचा अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** देवळा तालुक्यातील उमराणेजवळ महामार्गावर मंगळवारी सकाळी बस आणि मालमोटार यांच्यात धडक होऊन ४० प्रवासी जखमी झाले. यातील आठ जण गंभीर असल्याने त्यांना मालेगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी नऊ वाजता मुंबई-आग्रा महामार्गावरील उमराणेनजीकच्या सांगवी येथे गतिरोधकाजवळ भरधाव नाशिक-चाळीसगांव बसची समोरुन येणाऱ्या मालमोटारीला धडक बसली. या अपघातात बसमधील ४० प्रवासी जखमी झाले. यातील आठ प्रवासी गंभीर जखमी असल्याने त्यांना मालेगांव येथे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींमध्ये वाहन चालक जितू पवार, वाहक योगेश राठोड, नामदेव आहेर, विजय पवार (दिंडोरी), विजया खाडे, पुरुषोत्तम खाडे, सुभाष बोरसे, प्रदीप पाटील, प्रशांत बोरसे, आशा पवार, श्याम विसपुते, कमल साळुंखे, आप्पा मोरे, भालचंद्र चिंचोळे, विजय पवार, मंगला चिंचोले ( सर्व रा.नाशिक) आदींचा समावेश आहे. या सर्व जखमींना उमराणे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# गावठी पिस्तूल सापडल्याने खळबळ

## पंढरपूर गुन्हे प्रकटीकरण शाखेने केले दोन गावठी पिस्टल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ७४ / २०२३ शस्त्र अधिनियम १९५६ चे कलम ३,७,२५ प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयाची माहिती पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार यांना गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम अंबाबाई पटांगणा जवळ अंधारात उभा असून त्याचेकडे पिस्तुल सारखे हत्यार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार हे पंचासह सदर ठिकाणी गेले असता एक इसम लाईटचे उजेडात उभा असलेला दिसला. त्यास चाहुल न लागता घेराव घातला असता तो एकदम गोंधळुन गेला त्याची अंगझडती घेतली असता त्याचेकडे एक देशी बनावटीचा गावठी कट्टा मिळुन आल्याने त्यास गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात येवून सदर आरोपीकडे अधिक कौशल्यपूर्ण तपास करता त्याने त्याचेकडे घरात लपवून ठेवलेला दुसरा देशी बनावटीचा गावठी कट्टा काढून दिला आहे तो तपासकामी जप्त करण्यात आला आहे. मिर्झापूर ही वेबसिरिज पाहून आकर्षण वाटल्याने आपण हे केले असे आरोपीने सांगितले. तसेच त्याने सदरचा गावठी कट्टा हा मुळ उत्तर प्रदेश येथील रहिवासी व सध्या पंढरपूर येथे राहणेस असलेला त्याचा साथीदार याचेकडुन घेतला असल्याचे सांगीतले आहे. सध्या दोन्ही आरोपी क्मा हे पोलीस कोठडी रिमांड मध्ये असून सदरचे देशी कट्टा बाळगण्याचा नक्की उद्देश काय होता या बाबत तपास चालु आहे.

सदरची उल्लेखनीय कामगीरी हि मा. पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे सो, अप्पर पोलीस अधिक्षक हिंमतराव जाधव सो, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग, श्री. विक्रम कदम सो व अरूण फुगे सारे, पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शना खाली पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि चिमणाजी केंद्रे, पोसई दत्तात्रय आसबे, सपोफौ नागनाथ कदम, राजेश गोसावी, पोहेकॉ / ४१९ शरद कदम, पोहवा ३९६ सुरज हेंबाडे, पोहवा १०६३ ढेरे, पोना १७३६ सचिन इंगळे, पोना४८४ सुनिल बनसोडे, पोना १७८९ सचिन हॅबाडे, पोना१६५७ दादा माने, पोना५६२ राकेश लोहार, पोकॉ१२१६ शहाजी मंडले सायब शाखेचे पोका अन्चर आत्तार यांनी केली आहे.




पंढरपूर शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ७४ / २०२३ शस्त्र अधिनियम १९५६ चे कलम ३, ७,२५ मधे अटक केलेले आरोपी नाव पत्ता १) धनाजी सिध्देश्वर आटकळे वय ३८ वर्षे रा. शेगांव दुमाला ता. पंढरपूर (२) सहजराम मताऊ वर्मा वय ३६ वर्षेरा. मनकापूर जिल्हा गोण्डा (उत्तर प्रदेश राज्य) सध्या नागालँड हॉटेल पाठीमागे, पंढरपूर जिल्हा सोलापूर या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## उत्पादन शुल्कचे लाचखोर अधिकारी जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नाशिकसह जिल्ह्यात दर आठवड्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई होत असताना लाचखोरी थांबण्याऐवजी दिवसेंदिवस वाढत आहे. लाचलुचपत विभागाचे अधिकारी कर्मचारी कसोशीने लाचखोरीला आळा बसावा यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु लाचखोरी थांबायचं नाव घेत नाही. अशातच निफाड तालुक्यात पुन्हा लाचखोरीचे प्रकरण समोर आले आहे. निफाड येथील येवला रोडवरील बार चालकाकडून 9 हजार रुपयांच्या लाचेची रक्कम स्वीकारताना राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यासह दोन खासगी व्यक्ती, अशा तिघांना रंगेहाथ अटक करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सदरील कारवाई केली असून, निफाड पोलिसात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकेश संजय गायकवाड या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यासह बारचालकांकडून वसुलीसाठी मध्यस्थी असलेले पंडित शिंदे, प्रवीण ठोंबरे असे लाचखोरांची नावे आहेत. हॉटेल्समधील कामाच्या त्रुटी न काढण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकातील जवान गायकवाड तसेच मध्यस्थी असलेले दोघे खासगी व्यक्ती संशयित शिंदे आणि ठोंबरे यांनी एका हॉटेलचे चार हजारप्रमाणे 12 हजार गेल्या 3 रोजी मागणी केली होती.



# अधीक्षकांच्या आश्वासनानंतर पत्रकांराचे आंदोलन मागे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** पिशोर येथील पत्रकारांना आपमानास्पद वागणुक दिल्याने पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाही करावी यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी पिशोर नाका येथील कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात आले होते. पिशोर पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी यांनी पत्रकारांना वेळोवेळी अपमानीत करणे व अरेरावी ची भाषा करणे यांच्यावर योग्यती कारवाही करावी याबाबत पोलीस अधिक्षक यांना फोन वर संपर्क साधला असता मी स्वःहा लक्ष घालुन योग्य ती कारवाही करेल असे आश्वासन दिले व उपविभागीय पोलीस अधिकारी मुकुंद आघाव यांनी लेखी दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी तालुक्यातील सर्व पत्रकारांची उपस्थीती होती.

# घनसावंगी येथे महाविद्यालय विकास समितीची बैठक

## कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी महाविद्यालयाचा घेतला आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** घनसावंगी येथील मॉडेल कॉलेज येथे आज दुपारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे कुलगुरू प्रो. डॉ प्रमोद येवले यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालय विकास समितीची बैठक संपन्न झाली .यावेळी प्र कुलगुरु डॉ. श्याम शिरसाठ, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ भारती गोरे, कुलसचिव डॉ भगवान साखले, वित्त व लेखा अधिकारी डॉ. प्रदीप कुमार जाधव, इंजिनिअर श्री काळे यांची उपस्थिती होती .यावेळी प्राचार्य डॉ. सतीश दांडगे यांनी सर्व समितीचे सदस्यांना डी.पी.आर. पुस्तिका देऊन स्वागत केले. आणि महाविद्यालयात चालविले जाणारे विविध उपक्रम कार्यक्रम विषयी सविस्तर माहिती कुलगुरूंना दिली. यावेळी कुलगुरू डॉ प्रमोद येवले यांनी मॉडेल कॉलेज घनसावंगी चा विकासासाठी भौतिक सुविधा साठी सर्वतोपरी मदत केली जाईल तसेच संपूर्ण भौतिक सुविधांनी सुसजित असे हे महाविद्यालय असेल यासाठी सर्वतोपरी आर्थिक सहकार्य केले जाईल



असे सांगितले यावेळी त्यांनी महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली महाविद्यालयात सुरू असलेल्या पदवी परीक्षा पाहणी करत कॉपीमुक्त वातावरणात घेत असलेल्या परीक्षेबाबत समाधान व्यक्त केले मुला मुलींसाठी दोन वस्तीग्रहाची निर्मिती लवकरच करण्यात येईल, सुसज्ज मैदान विद्यार्थ्यांसाठी, कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक विभाग साठी आर्थिक तरतूद, तसेच सोलर पंप च्या माध्यमातून संपूर्ण परिसर हरित वन करण्यासाठी प्रयत्न केले जाईल. यावेळी महाविद्यालय परिसरात कुलगुरू डॉ. प्रमोद येवले आणि सर्व सदस्यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी मॉडेल कॉलेज येथे विविध कोर्सेस आणि व्यवसायभिमुख अभ्यासक्रम चालविले जातील त्याचा उपयोग ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या साठी निर्माण होणार आहे असे प्राचार्य डॉ. सतीश दांडगे यांनी सांगितले.



# महिलांसाठी क्रिकेट लीगचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या गेट गोईंग संस्थेने फक्त महिलांसाठी मिसेस फूड राईट क्रिकेट लीग २०२३चे आयोजन ५ मार्च रोजी केले असून स्पर्धेत भाग घेण्यासाठी नाव नोंदणी सुरु करण्यात आली आहे.

बहुतांश महिला स्वतःच्या आरोग्यास प्राधान्य देत नाहीत. स्त्री नोकरी करणारी असो वा नसो स्वतःसाठी वेळ काढणे, स्वतःचे छंद जोपासणे किंवा किमान स्वतःच्या आरोग्याच्या तक्रारींची वेळीच दखल घेऊन त्यावर उपाययोजना करणे याला कधीच महत्व देताना दिसत नाहीत. महिलांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य प्राधान्यक्रमावर यावे, याबाबत महिलांमध्येही जागृती व्हावी यासाठी गेट गोर्इंग ही संस्था मागील दहा वर्षांपासून काम करत आहे. खेळ आरोग्य रक्षणात महत्वाचे ठरतात. त्याचबरोबर महिलांना दररोजच्या धकाधकीच्या आयुष्यातून उसंत आणि आनंद देतात. याचाच विचार करुन गेट गोईंगने मिसेस फूड राईट क्रिकेट लीग २०२३ घेण्याचा निर्णय घेतला आहे असे डॉ . संतोष तोतला यांनी सांगितले.

कोव्हीडच्या संकटात महिलांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. आधिच घरात बंदिस्त असलेल्या स्त्रिया आणखीनच कोंडल्या गेल्या. महिलांना मोकळे आकाश मिळावे, त्यांच्यात नव्या जाणिवा निर्माण व्हाव्यात हाही या स्पर्धेचा उद्देश आहे असे डॉ. प्रिया देशमुख म्हणाल्या. ५ मार्च रोजी होणा-या या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच ८ ते १4वर्षे वयातील मुली आणि ८ ते 12 वर्षांपर्यंतच्या मुलास प्रत्येक संघात स्थान देण्यात येणार आहे. यामुळे प्रथमच आई आणि मुलास एकत्र खेळण्याची संधी मिळेल. एकूण दहा संघ स्पर्धेत सहभागी होतील. नोंदणी केलेल्या नावांमधून संघ तयार करण्यात येतील.विजेत्या संघास भरघोस बक्षिसे आणि प्रत्येक सहभागी खेळाडूस मेडल देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली आहे. नोंदणीसाठी गेट गोईंगच्या वेबसाईटवर जाऊन दि.१० फेब्रुवारी पर्यंत नोंदणी करावयाची आहे. प्रत्येक संघात एक मुलगा किंवा मुलीला स्थान देण्यात येणार असल्याने प्रथम नाव नोंदणी करणा-यास यासाठी प्राधान्य देण्यात येईल. स्पर्धेच्या नोंदणीबरोबरच गेट गोईंगच्या सदस्यत्वाची नोंदणीही सुरु झाली आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

# जलसंधारण अधिकारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात

## 8 लाख 53 हजारांची लाच घेताना पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** कोल्हापुरी बंधाऱ्याच्या कामाचे देयक काढून देण्यासाठी 8 लाख 53 हजारांची लाच स्वीकारणाऱ्या जलसंधारण अधिकाऱ्यास जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले असून पथकाने सदरची कारवाई 6 जानेवारी रोजी औरंगाबाद येथील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ कार्यालयासमोर केली आहे.

यात वैजापूरचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी ऋषीकेश प्रल्हादराव देशमुख (पदभार - उपविभागीय जलसंधारण अधिकारी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद) या लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे.याप्रसंगी ऋषीकेश देशमुख यांच्यासह भाऊसाहेब दादाराव गोरे (लिपिक,महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ कार्यालय औरंगाबाद) या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,ऋषीकेश देशमुख हे वैजापूर येथे उपविभागीय जलसंधारण अधिकारी म्हणून कार्यरत होते दरम्यान त्याच्याकडे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद येथील उपविभागीय जलसंधारण अधिकारी या पदाचा देखील पदभार आहे. घटनेतील तक्रारदार यांनी चौडेश्वरी कंट्रक्शन (परभणी) या कंपनीच्या नावावरती कोल्हापुरी बंधा-याचे गवळी पिंपळी ता. सोनपेठ जि.



परभणी येथील कामाचे देयक १८ लाख व गोविंदपुर ता.पूर्णा जि. परभणी येथील कामाचे देयक १ कोटी १९ लाख रुपये असे एकूण १ कोटी ३७ लाख रुपये देयक काढण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक सुनील कुशिरे यांच्यासाठी ७.५ टक्के प्रमाणे ८ लाख ३ हजार २५० रुपये, स्वतःसाठी व महामंडळ कार्यालयाचे मिळून ५० हजार रुपये असे एकूण ८ लाख ५३ हजार २५० रुपये लाचेची मागणी तक्रारदाराकडे केली होती. मंगळवारी दुपारी औरंगाबाद येथील महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ कार्यालयासमोर ऋषीकेश देशमुख यांना ईनोव्हा कारमध्ये (क्रंमाक एमएच २० एफ जी ५००५) लाच स्वीकरताना एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे. भ्रष्टाचार संबधित काही तक्रार असल्यास तोल फ्री क्रमांक 1064 संपर्क करण्याचे आवाहन औरंगाबाद लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आले आहे.

# जातीवाद्यांच्या निषेधार्थ सर्वधर्मीय मूक मोर्चा काढणार : जोसेफ मलबारी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ख्रिश्चन धर्माबद्दल होणारे जातीय द्वेष व होणारे हल्ले या साठी 8 फेब्रुवारी रोजी सर्व पक्षीय, संघटना यांनी पाठिंबा देऊन हजारो च्या संखेने उपस्तित राहणार आहे. जानेवारी महिन्यात काही समाजकंटकांनी , कार्यकर्त्यांनी छत्तीसगढ या राज्यात नारायणपूर ( जगदालपूर ) या गावातील ख्रिश्चन समाजाच्या चर्चवर हल्ला करून तोडफोड केली . याठिकाणी बंदोबस्ताला असणाऱ्या पोलिस बांधवांना देखील हल्लेखोरांनी मारहाण केली हे अतिशय निंदनीय आहे . सदर घटनेबाबत छत्तीसगडचे मुख्यमंत्री मा.श्री.ना.भुपेश बघेल यांनी तात्काळ सदर घटनेच्या चौकशीचे आदेश देवुन 12 तासामध्ये हल्लेखोरांना अटक केली आहे.

या कारवाईमुळे या देशात अराजकता माजवु पाहणारे काही समाजकंटक धर्मवेळे व संघटनांचा कुरूप चेहरा जगासमोर आला आहे .सदर घटनेची देशपातळीवरून समाजातील विचारवंतांनी व विविध पक्ष व संघटना व अनेक संस्थांनी गांभिर्याने दखल घेवुन ख्रिश्चन धर्मिय लोकांना पाठिंबा दर्शविला आहे . तसेच या घटनेचा निषेध म्हणुन देशात ठिकठिकाणी ख्रिश्चन धर्मियांसह अन्य धर्मियांनी सुध्दा निषेध व्यक्त करून संविधान वाचविण्यासाठी पाठिंबा दिला आहे धुळे जिल्ह्यातील ख्रिश्चन धर्मिय बांधवांसह पुरोगामी व संविधान मानणाऱ्या विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांच्या समवेत मुक मोर्चा काढण्यात येणार आहे . शिस्तबध्द पध्दतीने व शांततेने या मोर्चाचे निवेदन आपणास आपल्यापुढे सादर करण्यात येणार आहे या साठी प्रमुख मागण्या आहेत. छत्तीसगड या राज्यातील नारायणपूर या गावातील चर्चवर हल्ला करणाऱ्या समाजकंटकांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा . या देशातील अल्पसंख्येने असणारे ख्रिश्चन बांधवांना आर्थिक लाभ मिळवुन देण्यासाठी प्रत्येक राज्यात मदर टेरेसा आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून ख्रिश्चन धर्मियांच्या आर्थिक प्रगतीसाठी प्रोत्साहन देण्यात यावे, ख्रिश्चन धर्मियांच्या देशाच्या अल्पसंख्याक समाजात समावेश असुनही त्यांना अद्यापपावोते अल्पसंख्याक असल्याचे दाखले शासन स्तरावरून उपलब्ध करून दिले जात नाहीत . त्यांना अद्यापही साधारण जातीचा दाखला देण्यात येतो ते ताबडतोब बंद करून त्यांना अल्पसंख्याक दाखला देण्याबाबत शासन स्तरावरून आदेश निर्गमीत करावेत, देशामध्ये स्त्रिश्चनांसह हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शिख, जैन अन्य धर्मियांच्या प्रार्थनास्थळावर हल्ले करणाऱ्या व धर्मगुरूंना मारहाण करणाऱ्या प्रवृत्ती विरूद देशातील अतिरेक्यांसाठी वापरल्या जाणाऱ्या कायद्यान्वये कारवाई करण्याचे कायदे संसदेत पारीत करण्यात यावेत, ख्रिश्चन धर्मियांना दफनविधीसाठी जागा उपलब्ध करून मिळावी अश्या मागण्यासाठी सर्व धर्मीय मूक मोर्च्या निघणार आहे.



# बोरिवली क्रीडा महोत्सव २०२३ चे रंगारंग उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**बोरिवली :** स्पोर्ट्स अँड कल्चरल असोसिएशन आणि आमदार सुनील राणे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित बोरिवली क्रीडा महोत्सव २०२३ चे रंगारंग उद्घाटन जनरल अरुणकुमार वैद्य एमएचबी कॉलनी मैदान, गोराई रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई येथे झाले. यावेळी श्री गोपाळ शेट्टी, श्री सुनील राणे, श्रीमती वर्षा राणे उपस्थित होते. १२ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत बॉक्सिंग, तायक्वांदो, ज्युडो, कराटे, किक बॉक्सिंग तलवारबाजी, वुशू, मल्लखांब, व्हॉली बॉल, कुस्ती, फुटबॉल, क्रिकेट, कॅरम, बुद्धिबळ, धावणे मॅरेथॉन, स्केटिंग, सायकल मॅरेथॉन, ट्रायथलॉन, ट्रायथलॉन. नेमबाजी, दोरी उडी, बॉडी बिल्डिंग, बास्केटबॉल या खेळांचे आयोजन करण्यात येणार आहे. या क्रीडा महोत्सवात विविध क्रीडा प्रकारातील ५०००-७००० खेळाडू सहभागी होणार आहेत. आ. सुनील राणे. एस.के. यांच्या दूरदृष्टी आणि सक्षम नेतृत्वाखाली गेल्या वर्षी आयोजित बोरिवली क्रीडा महोत्सव. या वर्षीही बोरिवली स्पोर्ट्स अँड कल्चरल असोसिएशनने आमदार श्रींच्या सक्षम नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली भव्य क्रीडा महोत्सव आयोजित करण्याची तयारी केली आहे. बोरिवली क्रीडा महोत्सवाचे भव्य उद्घाटन ०४ फेब्रुवारी २०२३ रोजी सायंकाळी ६.३० वाजता एमएचबी ग्राउंड, गोराई रोड, बोरिवली येथे विविध क्रीडा प्रकारातील मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. बोरिवली क्रीडा महोत्सव हा असाच एक कार्यक्रम आहे जो सहभागी खेळाडूंमध्ये खेळाबद्दल उत्साह निर्माण करेल. बोरिवलीच्या जनतेसाठी बोरिवलीच्या आरोग्य, विकास आणि सुशोभीकरणासोबतच क्रीडा महोत्सव या भागाच्या विकासाला नवी दिशा देतो. तसेच राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर हुशार विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल. विजेत्या संघांना आणि खेळाडूंना नजीकच्या भविष्यात अधिक चांगली कामगिरी करण्यास प्रवृत्त करण्यासाठी आकर्षक बक्षिसे, पदके आणि ट्रॉफी देऊन पुरस्कृत केले जाईल.

# बालरोगतज्ञ संघटनेच्या नूतन कार्यकरणीची निवड

आधुनिक केसरी न्यूज






**औरंगाबाद :** बालरोगतज्ञ संघटनेच्या नूतन कार्यकरणीची निवड करण्यात आली असुन डॉ. ललीत उणे (अध्यक्ष), डॉ. सुहास रोटे (सचिव), डॉ. प्रशांत चव्हाण (कोषाध्यक्ष) या प्रमाणे प्रमुख पदांची निवड एकमताने करण्यात आली. या प्रसंगी औरंगाबाद बालरोगतज्ञ संघटनेचे डॉ. दत्ता कदम, डॉ. ऋषीकेश ठाकरे, डॉ. राजेंद्र खडके, डॉ. निखील पाठक, डॉ राजेंद्र वैद्य, डॉ मंदार देशपांडे, डॉ प्रशांत जाधव, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. अमोल जोशी, डॉ. संध्या कोंडपल्ले, डॉ. मंजूषा शेरकर, डॉ. वर्षा वैद्य यांच्यासह इतर २०० बालरोगतज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण नूतन अध्यक्ष डॉ. ललीत उने यांनी केले व विशेष मार्गदर्शन माजी अध्यक्षा डॉ. राजश्री रत्नपारखी यांनी केले. या संघटनेचे मुळ कार्य लहान मुलांच्या आजारासंदर्भात जनमानसात जनजागृती करुन लहान मुलांना वेळीच होणाऱ्या आजारापासून सावध कसे राहावे या बाबत मार्गदर्शन करणे, हे या संघटनेचा मुळ हेतु आहे. याच कार्यक्रमात केंद्रीय बालरोग संघटनेच्या सदस्यपदी डॉ. रेणू बोराळकर यांची निवड झाल्या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.



# तीनदिवसीय शस्त्र प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पवनपुत्र विजय व्यायाम शाळेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यंदाच्या शिवजयंती निमित्ताने विद्यार्थी तसेच धुळेकर जनतेला शिवकालीन शस्त्राची माहिती देण्याच्या उद्देशाने एक विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील गल्ली क्रमांक ६ मधील पवनपुत्र व्यायाम शाळेच्या चौकात १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी या प्रदर्शनाचे उद्घघाटन करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनाचे उद्घघाटन श्रीमंत छत्रपती संभाजीराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात येणार आहे . या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी धुळ्याचे माजी तथा धुळे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन श्रीमंत राजवर्धनजी कदमबांडे हे राहणार आहेत. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा खासदार डॉ. सुभाष भामरे हे राहणार असून कार्यक्रमास, धुळे ग्रामीणचे आमदार कुणाल बाबा पाटील, आमदार अनिल भाऊ भाईदास पाटील, आमदार मंजुळाताई गावित, माजी आमदार चंद्रकांत भैय्या रघुवंशी , धुळ्याचे आमदार डॉ. फारुख शाह, माजी परिवहन मंत्री गुलाबराव देवकर, राष्ट्रवादीचे युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष महेबूबभाई शेख, सूरज चव्हाण, रविकांत वरपे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांच्यासह सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहे. पवनपुत्र व्यायामशाळेने शस्त्र प्रदर्शनाच्या माध्यमातून ही अनोखी पर्वणी उपलब्ध करुन दिली असल्याने धुळेकर नागरीकांनी या शस्त्र प्रदर्शनाचा लाभ घेऊन माहिती घ्यावी, असे आवाहन शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने अमित पवार , सुमित पवार आदींनी केले आहे.

# महात्मा फुले जन्माला आले नसते तर भारतातील स्त्रिया शिकल्या नसत्या : प्रा.डॉ. ऋषिकेश कांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** लोटस इंग्लिश स्कूल दि बुध्दिष्ट इंटरनॅशनल स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा 6 फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या प्रसंगी लोटस व बुध्दिष्ट इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा वैशाली राजीव खंडारे तर महाराष्ट्राचा मुकुटमणी डॉक्टर ऋषिकेश कांबळे, फुले शाहू आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ भाष्यकार होते हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

प्रमुख अतिथी म्हणून डॉ संघर्ष साळवे, डॉ. मधुकर दिवेकर, रोशनी ठाकूर,अनिता दिवेकर,ज्योती सोनवणे, डॉ मारुती अवसरमोल,माणिकराव ढाकरगे इत्यादी उपस्थित होते. या स्नेहसंमेलनानिमित्त मौलाना आझाद संशोधन केंद्र येथे बोलताना डॉक्टर ऋषिकेश कांबळे आपल्या



मार्गदर्शकपर भाषणात म्हणाले की, भारतात महात्मा फुले जन्मले नसते तर भारतातील स्त्रिया शिकल्या नसत्या सर्वप्रथम त्यांनी सावित्रीबाईला शिक्षण देऊन पहिली शिक्षिका बनवले नंतर पुण्यातील भिडे वाडा येथे मुलींची पहिली शाळा काढली आणि बहुजनांची मुले-मूली शिकू लागली. बाबासाहेबांनी पुढे घटनेत महिलांना स्वावलंबी बनवण्याचा कायदा करून महिलांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा केला असे म्हणाले.

ज्योती पवार यांनी विद्यार्थ्यांना बोधपर चिमणीची गोष्ट सांगितली. प्रमुख अतिथी म्हणून आदर्श शिक्षिका अनिता दिवेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेची प्रगती अति उत्तम असून वरच्यावर शाळेचा विकास होत आहे. या ठिकाणी सर्व जाती धर्माचे मुलं मुली शिकत असून भारतीय संविधानातील समानतेचा मार्ग शिक्षणातून फुले व आंबेडकर विचारधारा मुलांपर्यंत पोहोचवण्याचे काम शाळेतील संपूर्ण शिक्षकवर्ग करत आहे ही बाब खरच कौतुकास्पद आहे असे त्या म्हणाल्या. डॉ. संघर्ष साळवे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले,आज मला मुले बघून लहान झाल्यासारखे वाटले,मी माझ्या बाल अवस्थेत पुन्हा गेलो, मुलांनी खूप शिकले पाहिजे. मुला मुली मध्ये कुठलाही भेदभाव न करता आपण मुलींनाही खूप शिकू द्यावे हीच या ठिकाणी अशा व्यक्त करतो असेही ते म्हणाले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in


नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
• घाऊक आणि किरकोळ • किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे • प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर घर संसार
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

# विशाल गिरी यांच्या हस्ते विहीर खोदकामाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील निंबायती येथील एकात्मिक कृषी व ग्रामीण विकास संस्था सन २००० पासून सोयगाव तालुक्यात प्रत्येक गावात शासनाच्या विविध योजना पोहोचण्या करीता सातत्याने प्रयत्नशील आहे. विधवा, परितक्त्या, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंब, आदिवासी वंचित महिलांचे आर्थिक सबलीकरण व त्यांचे कौटुंबिक व शासकीय हक्क मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहे. गावातील दारिद्र्य कमी करून, उपजीविकेचे साधने निर्माण करण्याकरिता गावा - गावात बचतगटाची मोठी उभारणी करून विविध व्यवसाय, उद्योग उभारणी करुन खूप मोठा बदल करण्याचे श्रेय संस्थेला आहे. आज तालुक्यात बचत गट हे रेशन दुकान व विविध व्यवसाय चालवताना दिसतात, त्याच बरोबर महिला सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत कामात मोठया प्रमाणात नेतृत्व करत आहे. या सर्व महिलांना एकल महिला संघटना / कोरो इंडिया / CII फाउंडेशन नवी दिल्ली यांचं सहकार्याने विविध प्रशिक्षण देऊन नेतृत्व विकास साधला. संस्थेने कोव्हीड - १९ महामारी संकटात आदिवासी व स्थलांतरित कुटुंबाना मोफत धान्य किट १६००० कुटुंबला वाटप करण्यात आले. या करीत के इ एम हॉस्पिटल संशोधन केंद्र पुणे, गुंज संस्था मुंबई, वर्ल्ड पल्स या संस्थांनी आर्थिक मदत केली. कोव्हीड - १९ लसीकरण करीता संस्थेने तालुक्यात जाणीव जागृती करून मोठ्या प्रमाणात



महिलांना जागृत केले. या सर्व कामाची योग्य दाखल घेऊन के इ एम हॉस्पिटल संशोधन केंद्र पुणे व इम्पॅक्ट युके यांच्या सहकार्याने सोयगाव तालुक्यातील ६ आदिवासी गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्या करिता खोदकाम करणारे कार्य हाती घेतले. या करीता एकात्मिक कृषी व ग्रामीण विकास संस्थचे अध्यक्षा - श्रीमती मीनाक्षी बिराजदार यांनी सोयगाव तालुक्यातील महिलांचे प्रश्न व्यवसाय, रोजगार, आरोग्य, शिक्षण, पाणी, उपजिविका हे प्रश्न जागतिक स्तरापर्यंत मांडले आज ते सोडवण्यासाठी विविध संस्था पुढे येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आज निंबायती गाव इथे मा. सरपंच - विशाल गिरी, उपसरपंच - सलमान तडवी, नूरजय तडवी, नारायण राठोड, रोहिदास जाधव, माजी सरपंच - राजू पाटील, समा तडवी व मीनाक्षी बिराजदार यांच्या हस्ते विहीर खोदकामाचे उदघाटन करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संभाजी नागने, करीम तडवी, अनुप तडवी, असरफ तडवी, जुबेर तडवी, सांडू तडवी, शमीनाबाई तडवी, नब्बास तडवी, नूरखा तडवी, ताहेराबी तडवी, जुबेदाबी तडवी, बनोबाई तडवी यांचे सहकार्य लाभले.



# सोनगीर टोल यांची दादागिरी मराठी माणूस खपवून घेणार नाही : भीम आर्मी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील सोनगीर येथे टोल नाक्यावर कार्यरत असलेले कर्मचारी यांना किरकोळ कारणास्तव कामावरून काढण्यात आले. यासाठी हा झालेला गैरप्रकारामुळे भीम आर्मी न्याय मिळवून देण्याचे काम करीत आहे. काही मागण्या मान्य न झाल्यास भीम आर्मीचे मोठे आंदोलन करण्यात येईल व या टोल संदर्भात भ्रष्ट अधिकारी यांच्या संदर्भात पुरावा सादर करून यांच्यावर कारवाईची मागणी करू असे या पत्रकार परिषद मध्ये सांगण्यात आले.

सोनगीर टोल प्रशासनातील हा मुजोर अधिकारी पोलिसांना दरमहा काही ठराविक रक्कम गिफ्ट म्हणून देतो. त्यामुळे पोलीस दबावात काम करतात आणि टोल ऑफिस सांगेल तशी ड्युटी बजावतात असा आरोप भीम आर्मीने केला आहे. या मुजोर अधिकाऱ्याला राजकीय पाठबळ असल्याची माहिती मिळाली आहे, ते कोणते पुढारी आहेत याचा आम्ही शोध घेत आहोत असे सांगण्यात आले. सोनगीर टोल प्रशासनातील अश्या या अनैतिक कृत्य करणाऱ्या परराज्यातील अधिकाऱ्यांना संपूर्णपणे नियमबाह्य जाऊन सोनगीर टोलचेच २-३ अब्र विकलेले आपलेच मराठी कर्मचारी आर्थिक लोभापोटी मदत करीत आहेत टोल प्रशासनातील एक स्वयंघोषित जीएम आर्थिक गैरव्यवहार ( मुच्छीवाला ) याचा धुळे ते पळासनेर हायवेवरील सर्व हॉटेल बांधवांकडून व अतिक्रमण धारकांकडून वसुली करतो. भिम आर्मीकडे तशा तक्रारी आल्या आहेत . सोनगीर टोल प्रशासनातर्फे केलेल्या कार्यवाहीबद्दलचे सर्व पुरावे ( वार्निंग लेटर ) भिम आर्मीच्या हाती लागले आहे . जनतेला आयुष्यभर टोल भरत राहावा लागेल . अशा धनधाकड व मुजोर परराज्यातील अधिकाऱ्यांवर व त्यांच्या सहकाऱ्यांवर कार्यवाही करावी . म्हणून सोनगीर टोल प्रशासनातील मुजोर अधिकाऱ्यांवर कार्यवाही संदर्भात धुळे जिल्ह्यातील भिमआर्मी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे या संदर्भात आज भीम आर्मीच्या वतीने पत्रकार परिषद देखील घेण्यात आली प्रामुख्याने आठ ते दहा कर्मचाऱ्यांवर टोल कंपनीचे अधिकारी अन्याय करीत असून या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी येत्या पंधरा दिवसात याबाबत दखल घेतली गेली नाही तर भीम आर्मी स्टाईलने सोंडगे टोलवर आंदोलन चढण्यातील असा इशारा देण्यात आला आहे यावेळी धुळे जिल्हाध्यक्ष संजय चव्हाण , महासचिव संजय अहिरे , उपाध्यक्ष भैय्यासाहेब वाघ , वरिष्ठ उपाध्यक्ष किशोर उशिरे , जिल्हा प्रवक्ते बसीम शेख , कोशाध्यक्ष उत्तम झनके या ठिकाणी उपस्थित होते .

# मोफत आरोग्य तपासणीतून शरीरात छुप्या अवस्थेतील रोगांचे निदान : जे.के.जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील लोकांची सामाजिक बांधिलकी जपत जे.जा विकास मंच महा माया सेवाभावी संस्था आधार बहुद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीर राचे आयोजन करण्यात आले होते.

मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्या मागचा उद्धेश तालुक्यातील नागरिक व युवकांचे आरोग्य उत्तम राहावे व त्यांनी समाज,राज्य,व राष्ट्र ऊभारनीत सक्षमपणे सहभाग घेऊन स्वतः ही ऊत्तम आरोग्यदायी जीवन जगावे हाच आहे असे प्रतिपादन राज्याचे माजी उद्योग संचालक जे, के,जाधव यांनी स्टेशन रस्त्यावरील जीवन गंगा परिसरात आयोजित मोफत रोग निदान व मोती बिंदू शस्त्र क्रिया,व रक्त तपासणी शिबिरात सोमवार (ता.०६) रोजी केले ,कार्यक्रम अध्यक्ष डॉ.अभिजित अन्नदाते होते. त्यांनीही आरोग्य बाबत सर्वांनी जागरूक राहण्याचे आवाहन केले, ,तर प्रमुख उपस्थितीत मराठवाडा चेंबर्सचे उपाध्यक्ष काशिनाथशेठ गायकवाड,किराणा असोसिएशन चे प्रकाश शेठ बोथरा,माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, वरिष्ठ पत्रकार शांताराम मगर, पंकज साळुंके, मंगेश भागवत यांची उपस्थिती होती,लायन्स क्लब ऑफ चिकलठाणा, आनंद हॉस्पिटल वैजापूर, सोमवंशी हॉस्पिटल व मेडिस्टर पॅथॉलॉजी च्या तज्ज्ञ डॉक्टर्स नी रुग्ण तपासणी केली व योग्य उपचार सुचविले. नेत्र रुग्ण, दंत रुग्ण, रक्तदाब रुग्ण व ईतर आजार रुग्ण असे २४३ रुग्णांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टर्सनी केली.

या प्रसंगी साई माऊली ग्रुप चे महेंद्र काटकर,राम उचित, मनोज गायकवाड, प्राचार्य डॉ. भिंगारदेव, भुजाडे, सय्यद, प्रा. स्वाती शिंदे, शांताराम मगर यानी सहभाग नोंदविला,सूत्र संचलन धोंडीराम राजपूत यांनी केले, आभार पंकज साळुंके यांनी मानले.





# औराळा येथील सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी केला शिंदे गटात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील औराळा येथील सरपंच चंद्रकांत बागुल व ग्रामपंचायत सदस्य दिशांत जिवरख ,दिनेश वाघ ,व दीपक जिवरख यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र भारतीय यांच्या मार्गदर्शनाखाली काही तरुणांनी बाळासाहेब ठाकरे शिवसेनेत नुसताच प्रवेश केला. बाळासाहेबांची शिवसेनेचे पालकमंत्री संदीपान भुमरे ,बाळासाहेबांची शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष भरतसिंग राजपूत यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला.

याप्रसंगी औराळाचे माजी सरपंच सुभाष रिंढे, सोमनाथ वाघचौरे, किशोर वाघचौरे, सचिन पवार, सागर वाघचौरे, संदीप वाघचौरे आदींसह सह ग्रामस्थांनी यांचा अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जंगलातांडा येथे पौष्टिक तृणधान्य २०२३ कार्यक्रमांतर्गत तृणधान्याचे आहारातील महत्त्व व अंमलबजावणी करा : आर.जी. गुंडीले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील जंगलाचा धडा येथे आर.जी.गुडीले मंडळ कृषि अधिकारी फर्दापूर पौष्टिक तृणधान्याची आहारातील व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने सर्व स्तरावरुन प्रयत्न केले जात आहे. यासाठी भारत सरकार व महाराष्ट्र राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने २०२३ हे वर्ष पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोयगाव येथील कृषि विभागामार्फत जंगलातांडा येथे मार्गदर्शन करण्यात आले.

यात शेतकरी तसेच गावातील शेतकरी गट, महिला बचत गट व वैयक्तिक लाभ घेणारे लाभार्थी व तरुण वर्ग यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आपल्या दैनंदिन जीवनात आपण कोणत्या प्रकारचे तृणधान्याचे सेवन केले पाहिजे जेणेकरून आपले शरीर सुदृढ राहील याबाबतची माहिती आर.जी. गुंडीले मंडळ कृषि अधिकारी फर्दापूर यांचे मार्फत देण्यात आली.

तसेच आहारात प्रामुख्याने ज्वारी पिकाच्या सेवनामुळे होणारे फायदे याविषयीची माहिती एम.पी. सैंदाणे कृषि अधिकारी सोयगाव यांचे मार्फत देण्यात आली यात ज्वारीतील न्युट्रास्युटिकल गुणधर्मामुळे मानवाचे बरेचशे आजार दूर करण्यात मदत होते, भरपूर प्रमाणात तंतुमय पदार्थ आणि हळुवारपणे विघटन होणाऱ्या स्टार्चमुळे रक्तातील कोलोस्टेरॉल, हृदयविकार, आतड्याचे आजार, बद्धकोष्टता इ. साठी उपयुक्त आहे असे सांगण्यात आले. आजच्या कार्यक्रामात ए.एस. महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगाव यांनी प्रधानमंत्री सुक्ष्म आन प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती दिली व योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले.

आजच्या कार्यक्रमात प्रामुख्याने आर.जी. गुंडीले मंडळ कृषि अधिकारी फर्दापूर, एम.पी. सैंदाणे कृषि अधिकारी सोयगाव, एच.बी. देशमुख कृषि पर्यवेक्षक सोयगाव, ए.एस. महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगाव, एस.एस.चव्हाण कृषि सहाय्यक जंगलातांडा, यांनी मार्गदर्शन केले सदरील कार्यक्रमाला गावाचे लोकनियुक्त सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील, प्रगतीशील शेतकरी, कृषि मित्र व गावातील ग्रामस्त उपस्थित होते.



# वैजापूरच्या सर्वांगीण विकासात लक्ष देणार

## केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** हे शहर मराठवाड्याचे प्रवेश द्वार आहे, या शहराचे प्रलंबित प्रश्न औद्योगिक वसाहत, विनायक साखर कारखाना, रामकृष्ण उपसा जलसिंचन योजना,व रस्ते विकास या कडे जातीने लक्ष देऊन हे प्रश्न येत्या काही दिवसात मार्गी लावणार असल्याचे ठोस आश्वासन केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ,भागवत जी कराड यांनी रविवार(ता,०५)रोजी येथील एका कार्यक्रमात उपस्थित जनसामुदायाला दिले,धोंडीराम राजपूत यांनी वरील प्रलंबित प्रश्न  तसेच काही रेल्वे रोटेगावला थांबव्या म्हणून उपस्थित केले होते ,यावर मंत्री महोदय यांनी वरील आश्वासन दिले,समृद्धी महामार्गाने जाणारा गॅस ही वैजापूरला मिळवून देणार असेही ते बोलले,वैजापूर ग्रामीण भागातील रस्ते या साठी विशेष निधी केंद्र सरकार कडुन मिळऊन देणार विकास बाबत वैजापूर-गंगापूर या दोन्ही तालुक्याकडे लक्ष पुरविणार असे ही डॉ. कराड यांनी सांगितले. अध्यक्ष स्थानी माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ नाना बागडे होते, त्यांनी कौशल्य पूर्ण शिक्षण वर भर देत मुलां-मुलींना बौद्धिक शिक्षणाची गरज त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी आ.रमेश, पा. बोरनारे, बाळासाहेब संचेती, देवगिरी बँक चेअरमन किशोर शितोळे, सभापती राधकीसन पठाडे यांचे समयोचित भाषणे झाली.

मोहन आहेर, एन.डी. डिघुळे, मनोज चोपडा, प्रभाकर गुंजाळ, भास्कर आहेर, पल्लवी आकाश आहेर यांनी सहभाग नोंदविला. सूत्र संचलन व आभार धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. मोहन आहेर, ऐन. डी. डिघुळे यांनी परिश्रम घेतले. साळुंके सुनील, काझी सर, सूर्यवंशी,  त्रिभुवन यांनी सहकार्य केले.



# छोट्या भावाकडून थोरल्या भावावर प्राणघातक हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यातील हडसूने गावात वर्षानुवर्षे सुरू असलेल्या घर हिस्सा वाटणी च्या वादातून संतापलेल्या लहान भावाने मोठ्या भावाला जबर मारहाण करून गंभीर दुखापत केली आहे. दोघं भावांमध्ये वाद इतका टोकाला गेला की लहान भावाने मोठ्या भावाला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप करीत शिवदास पाटील विरोधात धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. मोकाट फिरत असलेल्या आरोपीला अटक करावी अशी मागणी या दाम्पत्यांनी केली आहे याबाबत सविस्तर माहिती अशी की देविदास पाटील यांना त्यांचा लहान भाऊ शिवदास पाटील याने घरगुती किरकोळ वादातून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला त्यात त्यांच्या डोक्याला व दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली आहे. यावेळी देविदास पाटील यांनी बोलताना सांगितले की, आम्ही परिवारासह हडसूने गावात एकत्र राहतो आम्ही शेती व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो आमच्या गावातच माझा लहान भाऊ शिवदास भास्कर पाटील राहतो, रस्त्यालगत असलेल्या शेतातील घरात सध्या वडिलोपार्जित देविदास पाटील यांचे जुने घर आहे. पती देविदास पाटील यांच्याच ते नावे घर आहे तसेच वडिलांच्या जुन्या घराच्या वाटणी वरून हा वाद इतका विकोपाला गेला की शिवदास पाटील या लहान भावाने आपल्या मोठ्या वहिनी ज्योती पाटील आणि भाऊ देविदास पाटील यांना गावात बेदम मारहाण करीत जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असा गंभीर आरोप देविदास पाटील यांनी केला आहे. या संदर्भात ज्योती देविदास पाटील यांनी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून आरोपी शिवदास भास्कर पाटील यांना तात्काळ अटक करून त्याच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी पाटील दांपत्याने केली आहे. सदर संशयित आरोपी विरोधात  गुन्हा दाखल झाला असून अद्याप आरोपीला अटक झाली नसून त्याला अटक करावी अशी मागणी पाटील दांपत्याने केली आहे.



# मद्यधुंद मुलाने घर पेटविले

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** दोन मुले असणाऱ्या महिलेशी लग्न लावून देण्यास आईने नकार दिल्याने संशयित मुलाने रागाच्या भरात घराला पेटविल्याने संसारोपयोगी सामान जळून खाक झाले. या प्रकरणी सटाणा पोलीस ठाण्यात संशयिताविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सटाणा तालुक्यातील ठेंगोडे शिवारात बेबी पवार कुटूंबासमवेत राहतात. शनिवारी रात्री त्या घरी एकट्या असतांना त्यांचा मुलगा अंकुश दारू पिऊन आला. आईने जेवण दिल्यानंतर अंकुशने त्यांच्याशी मागील भांडणाची कुरापत काढून आवडणाऱ्या मुलीशी लग्न लावून दे, असा तगादा आईकडे लावला. आईने संबंधित महिला आपल्या जातीची नसून तिला दोन मुले असल्याने तुझे तिच्याशी लग्न लावून देणार नाही, असे सांगितले.

# ॲड. बाहेती यांना इंस्पिरेशनल युथ अवॉर्ड २०२३ प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्री माहेश्वरी मंडळाच्या वतीने जेम्स ऑफ माहेश्वरी अवॉर्डस २०२३ अंतर्गत ॲड. अक्षय बाहेती यांना इंस्पिरेशनल युथ अवॉर्ड २०२३ ने सन्मानित करण्यात आले. ॲड. अक्षय बाहेती यांच्या नावावर रक्तदानाच्या जागतिक विक्रमाची नोंद आहे. त्यांनी अवघ्या ३१ वर्षाच्या वयात तब्बल ५० वेळा रक्तदान करून हा जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. तसेच रक्ताची गरज कोणाला भासल्यास अर्ध्या रात्रीही ते मदतीसाठी धावून जातात. ॲड. अक्षय बाहेती यांनी तातडीने रक्त उपलब्ध व्हावे यासाठी विविध सामाजिक क्षेत्रातील लोकांना एकत्र आणून एक चळवळ उभी केली आहे. अगदी कमी वयात रक्तदानाच्या चळवळी साठी करत असलेल्या कार्याची दखल घेऊन श्री माहेश्वरी मंडळाच्या वतीने इंस्पिरेशनल युथ अवॉर्ड २०२३ प्रदान करण्यात आले.





# क्रीडा स्पर्धेत आरोग्य विभागाचे घवघवीत यश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** जि.प. कर्मचारी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत आरोग्य विभागाचे घवघवीत यश जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या वतीने दरवर्षी शासकीय कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते त्याचाच भाग म्हणुन यावर्षी खुलताबाद येथे घृष्णेश्वर महाविद्यालय मैदानावर क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उदघाटन गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, गट शिक्षण अधिकारी विलास केवट, तालुका आरोग्य अधिकारी किरण शिंदे यांनी केले. दोन दिवसापासून सुरु असलेल्या या स्पर्धेत आरोग्य कर्मचाऱ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवीला प्रा.आ केंद्र येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.रमेश शेळके यांनी 600 मिटर धावणे या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला, डॉ.जगदीश पाटील यांनी बुद्धीबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला, प्रतीक्षा जाधव यांनी 400 मीटर धावणे या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला,डॉ सोनिया चौथमल यांनी गोळाफेक आणि थाळीफेक यात द्वितीय क्रमांक पटकावला. ज्योती काळे यांनी धावणे आणि भालाफेक यात तृतीय क्रमांक तर पवन थोरात यांनी 400 मीटर धावणे यात द्वितीय क्रमांक पटकावला. सर्व विजयी कर्मचाऱ्यांचे तालुका आरोग्य अधिकारी किरण शिंदे आणि मान्यवरांनी अभिनंदन केले.आणि जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सशक्त स्त्री सशक्त राष्ट्र निर्मिती करू शकते : प्रतिमा मोरखंडे




आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** आज महिला सर्वच क्षेत्रात आगेकूच करीत आहेत. उद्योग क्षेत्रातही महिलांनी आता गगनभरारी घेतली असून, महिलांचे सक्षमीकरण राष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी महत्त्वाचे आहे. कारण, सशक्त स्त्री सशक्त राष्ट्र निर्माण करू शकते, असे प्रतिपादन माणदेशी फाउंडेशनच्या समन्वयिका प्रतिमा मोरखंडे यांनी केले.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या युवती कल्याण मंडळाच्या वतीने सोमवार, दि. 6 फेब्रुवारी 2023 रोजी महिला उद्योजक या विषयावर एक दिवसीय व्याख्यानपर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार तर मंचावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बालाजी कांबळे, युवती कल्याण मंडळाच्या प्रभारी डॉ.प्रिया वर्मा, माणदेशी फाउंडेशनच्या प्राजक्ता शेळके, गायत्री वाघमारे, संगीता राऊत, देवकन्या सूर्यवंशी आदींची उपस्थिती होती. व्याख्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रिया वर्मा यांनी करून आयोजन मागील भूमिका विशद केली. पाहुण्यांचा परिचय कु.वैष्णवी सगरे हिने केले. यावेळी बोलताना प्रतिमा मोरखंडे म्हणाल्या, महिला सक्षमीकरण हा देशाच्या विकासाचा मार्गबिंदू आहे. पुढील पिढीला शिक्षित करण्यासाठी महिला शिक्षित झाल्या पाहिजेत. विकासात्मक क्रांती घडविण्यासाठी महिला पुढे येणे आवश्यक असून, उद्योग जगतात महिला क्रांती घडवून आणतील, असेही सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार म्हणाले, सर्वच क्षेत्रात महिला पुढे येत आहेत. एखादी गोष्ट चिकाटीने करण्याची हातोटी महिलांकडे असते. महिला सक्षमीकरण झाल्यास भारत देश विकसित होण्यास वेळ लागणार नाही, असेही ते म्हणाले. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. बालाजी कांबळे यांनीही महिला सक्षमीकरण काळाची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी रोहिणी शिंदे आणि जान्हवी येचेवाड यांनी तर शेवटी आभार प्रज्ञा कदम हिने मानले. व्याख्यान कार्यक्रमात 319 विद्यार्थिनींसह महिला प्राध्यापक, युवती कल्याण मंडळ सदस्य उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवती कल्याण मंडळ सदस्य प्रा. स्वप्नाली माणिकशेट्टी, प्रा .शितल चेरेकर, प्रा.आकांक्षा दरगड, प्रा.नुरजहाँ सय्यद आदींनी परिश्रम घेतले.